नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १८९ * * नागपूर * शुक्रवार, दिनांक १० ऑक्टोबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## सोने वधारले : १.२३ लाख प्रती तोळा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९ :
आज, ९ ऑक्टोबर रोजी सलग चौथ्या दिवशी सोने आणि चांदीच्या किमतींनी सर्वकालीन उच्चांक गाठला. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशननुसार, २४ कॅरेट सोन्याचा १० ग्रॅमचा भाव ४७२ रुपयांनी वाढून १,२२,५७० रुपयांवर पोहोचला. पूर्वी तो १,२२,०९८ रुपयांवर होता. चांदीचा भावही १,४०० रुपयांनी वाढून १,५४,१०० रुपयांवर पोहोचला. काल तो १,५२,७०० रुपयांवर पोहोचला होता.

या वर्षी आतापर्यंत सोन्याच्या किमतीत अंदाजे ४६,४०८ ने वाढ झाली आहे. ३१ डिसेंबर २०२४ रोजी, २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत ७६,१६२ होती, जी आता १,२२,५७० वर पोहोचली आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## बालकांचे प्राणहरण

मध्य प्रदेशमधील नागपूरलगत छिंदवाडा जिल्ह्यामध्ये एका कफ सिरपच्या म्हणजेच खोकला कमी करण्याच्या औषधाच्या प्राशनामुळे आतापर्यंत बावीस बालकांचा मृत्यू झालेला आहे. सर्वात अस्वस्थ करणारी बाब म्हणजे याबाबतीत मध्य प्रदेश सरकार कोणतीही जबाबदारी घ्यायला तयार नाही. ३ सप्टेंबर रोजी मध्यप्रदेशातील एका शाळेतल्या काही बालकांचा बळी गेला होता. त्यानंतर इतरही बालकांचा जीव गेला पण तोपर्यंत मध्यप्रदेश सरकारने कोणतीही गंभीर दखल घेतली नव्हती. त्यातील अनेक बालकांचे मृत्यू हे नागपूरमध्ये आल्यावर झालेले आहेत ही अत्यंत बेजबाबदारपणाची आणि निलाजरेपणाची कमाल आहे. छिंदवाड्याच्या अधिकाऱ्यांनी सर्वात आधी या बालकांचा एका कफ सिरपमुळे मृत्यू झालेला आहे हे स्वीकारलेच नाही. पण जेव्हा अनेक पुरावे हाती आले तेव्हा सुद्धा या घटनेला फारसे महत्त्व मध्य प्रदेशामधील या लोकांनी अजिबात दिले नाही. या सिरपग्रस्तांच्या मृत्यूचे कारण शोधून काढण्यासाठी जी सामग्री छिंदवाड्याहून भोपाळला पाठवली गेली ती साध्या पोस्टाने म्हणजेच साध्या डाकेने पाठवण्यात आली होती. ती सामग्री पाच दिवसांच्या नंतर छिंदवाड्याहून भोपाळला पोहोचली आणि त्यानंतर सहा दिवसांनी अहवाल आला. त्यामध्ये त्या बालकांचा कोल्ड्रिप नावाच्या सिरपमुळेच मृत्यू झाला आहे निष्पन्न झाले. ज्या कफ सिरपमुळे ही बालके दगावली त्यामध्ये ज्या द्रवाची जास्तीत जास्त मात्रा चार टक्क्यांच्या वर जाता कामा नये अशी नियमावली होती. ती मात्रा या कफ सिरपमध्ये जवळजवळ ४८ टक्क्यांच्या वर पोहोचलेली होती. याबाबतीमध्ये मध्यप्रदेश सरकारने कडक कारवाई करण्याऐवजी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला असे सांगितले जाते. खरे तर जी तपासणी करण्यासाठी मध्य प्रदेश सरकारला दहा ते बारा दिवस लागले. तो तपासणी अहवाल तामिळनाडू सरकारने २४ तासांच्या आत तपासणी करून जाहीर केला आणि त्या सिरप निर्माण करणाऱ्या कंपनीवर पूर्णपणे बंदी घालून त्यांच्यावर कारवाई करण्याचा निर्णय घेतला. इकडे मध्य प्रदेशचे आरोग्यमंत्री कोणतीही जबाबदारी घ्यायला तयार नाहीत. त्यांनी फक्त दाखवण्यासाठी एका सरकारी डॉक्टर असलेल्या अधिकाऱ्याला फक्त निलंबित केलेले आहे. असे हे अतिशहाणे आरोग्य मंत्री म्हणतात की, हे सिरप तामिळनाडूमध्ये तयार होते त्यामुळे ही जबाबदारी तामिळनाडूची आहे. याचाच दुसरा अर्थ असा की ज्या आपल्या राज्यामध्ये औषधी विकल्या जातात आणि त्या घातक आहेत असे दिसल्यावरही ते सरकार आणि त्या सरकारचे आरोग्यमंत्री ही बाब गंभीरपणे घ्यायला अजिबात तयार नाहीत. कारण त्यांच्या एकूण व्यक्त होण्यावरून तसेच दिसते आहे. ज्या घरातील नवजात बालके अशाप्रकारे मृत्युमुखी पडत आहेत त्यांच्या आई-बाबांना किती वेदना होत असतील हे मध्यप्रदेशच्या निर्लज्ज सरकारला कसे कळत नाही. आत्तापर्यंत २२ बालके मरण पावली गेली, अजूनही अनेक बालके गंभीर अवस्थेमध्ये आहेत, पण मध्य प्रदेश सरकार आणि त्यांचे अधिकारी यांच्या चेहऱ्यावर कोणत्याही प्रकारचा तणाव जाणवत नाही. आजकाल प्रत्येक जोडप्याला फार तर एक किंवा दोनच मुले असतात, अशा स्थितीमध्ये ज्यांचा जीव गेला आहे त्या बालकांच्या कुटुंबीयांना धीर तरी कसा धरवणार. या प्रकरणातून एकच धडा घेतला पाहिजे तो म्हणजे कोणतेही औषध घेण्यापूर्वी डॉक्टरचा सल्ला घेतला पाहिजे, त्याचा विचार सर्वांनीच केला पाहिजे. ज्या बिचाऱ्या निरपराध बालकांना जीव गमवावा लागला, त्यांना आमची मनापासून भावपूर्ण श्रद्धांजली!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी

# भारत-ब्रिटन भागीदारी महत्वाचा आधार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
भारत आणि ब्रिटन वेगवेगळ्या क्षेत्रात नैसर्गिक भागीदार आहेत. या संबंधांना लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य यासारख्या मूल्यांवरचा परस्पर सामायिक विश्वास आहे. भारत आणि ब्रिटन दरम्यानची ही वाढती भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार ठरली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ झाले असून, व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी निर्माण झाल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांचे संयुक्त निवेदन

ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. मुंबईतील राजभवन येथे आज त्यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा झाली. या चर्चेनंतर नरेंद्र मोदी व कीर स्टार्मर यांनी संयुक्त निवेदन जारी केले. त्यावेळी प्रधानमंत्री मोदी बोलत होते.

मोदी म्हणाले, या करारामुळे व्यापार आणि रोजगार निर्मिती वाढेल आणि ग्राहक तसेच उद्योग क्षेत्र दोघांनाही लाभ मिळेल. दोन्ही देशांतील उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधींची शिखर परिषद, सीईओ मंच आणि जागतिक फिनटेक महोत्सव यांच्या माध्यमातून सहकार्याच्या नव्या शक्यता समोर आल्याचेही त्यांनी नमूद केले.

आजच्या बैठकीत दोन्ही नेत्यांमध्ये इंडो-पॅसिफिक आणि पश्चिम आशियातील स्थैर्य, तसेच युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षावरही विचारांची देवाणघेवाण झाली. युक्रेन आणि गाझाच्या मुद्द्यावर भारत संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून शांतता पुनप्रस्थापित करण्यासाठीच्या सर्व प्रयत्नांचे समर्थन करतो. इंडो पॅसिफिक क्षेत्रात सागरी सुरक्षा विषयक सहकार्य वाढविण्यासाठी वचनबद्ध असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले.

आम्ही ब्रिटनची औद्योगिक तज्ञता आणि संशोधन क्षमता भारताच्या प्रतिभा व व्याप्तीशी जोडत आहोत. गेल्या वर्षी सुरू केलेल्या भारत-ब्रिटन तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमातून नवोन्मेषाला चालना मिळत आहे, असेही मोदी म्हणाले.

भारत आणि युके यांच्यातील संरक्षण सहकार्य अधिक बळकट होत असून, दोन्ही देश संयुक्त उत्पादनाच्या दिशेने पावले टाकत आहेत. दोन्ही देशांच्या सैन्यदलांमध्ये सैन्य प्रशिक्षण सहकार्य करार झाला असून, भारतीय वायुसेनेचे उड्डाण प्रशिक्षक आता युकेच्या रॉयल एअरफोर्समध्ये प्रशिक्षक म्हणून काम करणार आहेत.

भारताची गतिशीलता आणि युकेची तज्ञता मिळून एक अद्वितीय सुसंवाद निर्माण होतो. आमची भागीदारी प्रतिभा, तंत्रज्ञान आणि विश्वासावर उभी आहे. आम्ही दोन्ही देशांच्या लोकांसाठी उज्ज्वल भविष्य घडवू, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

भारत आणि ब्रिटन यांच्यातील मानवी बंध हेच या नात्याचे खरे वैशिष्ट्य आहे. हे दोन देशांदरम्यानचे, लोकांदरम्यानचा, मनांदरम्यानचा जिवंत पूल आहे, असे ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी आज मुंबईत संयुक्त निवेदनादरम्यान सांगितले.

कीर स्टार्मर म्हणाले, भारत-युके एकत्र येऊन आधुनिक आणि भविष्याभिमुख भागीदारी निर्माण करत आहेत. यामुळे दोन्ही देशांच्या नागरिकांसाठी नव्या संधी निर्माण होतील. युके-भारत सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार पूर्ण करणे हा ऐतिहासिक टप्पा आहे. या करारामुळे आयात शुल्क कमी होईल, बाजारपेठांमध्ये अधिक प्रवेश मिळेल, रोजगारनिर्मिती होईल आणि दोन्ही देशांतील जनतेचे जीवनमान उंचावणार आहे. कराराच्या आर्थिक लाभांपलीकडे जाऊन, आत्मविश्वास आणि परस्पर सहकार्याचा भाव हे भारत-युके संबंध अधिक दृढ करत असल्याचेही कीर स्टार्मर यांनी नमूद केले.

### ब्रिटनची ९ विद्यापीठे भारतात कॅम्पस उघडणार

ब्रिटनची ९ विद्यापीठे भारतात आपले कॅम्पस उघडतील. ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टार्मर यांनी मुंबईत ही घोषणा केली. स्टार्मर आणि पंतप्रधान मोदी यांनी गुरुवारी सकाळी झालेल्या द्विपक्षीय चर्चेत व्यापार करारावर स्वाक्षरी केली.

यानंतर, पंतप्रधान मोदी म्हणाले की, या करारामुळे दोन्ही देशांमधील आयात सुलभ होईल. व्यापार वाढून तरुणांना रोजगार मिळेल. युकेमध्ये वास्तव्यास असलेले १८ लाख भारतीय हे दोन्ही देशांमधील मैत्रीचे जिवंत उदाहरण आहे. त्यांनी ब्रिटिश समाज आणि अर्थव्यवस्थेत दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असून दोन्ही देशांतील मैत्री आणि विकासाच्या पुलाला बळकटी दिली आहे, असेही प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले.

### सरन्यायाधीशांवर बूटफेक प्रकरण

## खा. लंकेंचा अनोखा निषेध

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ९ :
सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने बूट फेकून मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी देशभरातून संताप व्यक्त होत आहे.



या वकिलाचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार नीलेश लंके यांनी आज एक अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. नीलेश लंके यांनी थेट वकील राकेश किशोर यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी वकिलाला संविधानाच प्रत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो भेट देत त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली.

नीलेश लंके यावेळी म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाचे संविधान निर्माण केले. संविधानाचे संरक्षण करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाची आहे. भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्याबाबत जो प्रकार घडला, तो एका व्यक्तीचा अवमान नसून संपूर्ण देशाचा अवमान होता. जे कृत्य घडले, त्याचा शांततेच्या मार्गाने निषेध करण्यासाठी मी आंबेडकरांचा फोटो आणि संविधानाची प्रत घेऊन येथे आलो आहे.

### विषारी कफ सिरप उत्पादक कंपनीच्या संचालकाला अखेर अटक



■ वृत्तसंस्था, छिंदवाडा, दि. ९ :
मध्य प्रदेशात २३ मुलांच्या मृत्यूला कारणीभूत कोल्ड्रिफ कफ सिरपची निर्मिती करणारी कंपनी श्रीसन फार्माचे संचालक गोविंदन रंगनाथन यांना अटक करण्यात आली आहे. मध्य प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने तामिळनाडूतील चेन्नई येथे छापा टाकतरंगनाथन यांना अटक केली. रंगनाथनवर २०,००० रुपयांचे बक्षीस होते. तो त्याच्या पत्नीसह फरार होता. चेन्नईमध्ये, रंगनाथनचे २००० चौरस फूट क्षेत्रफळाचे अपार्टमेंट सील करण्यात आले आहे.

# सामाजिक न्याय विभागाचा निधी पुन्हा वळवला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
महायुती सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी निधी मिळवण्यासाठी सरकारने पुन्हा एकदा सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याची माहिती समोर आली आहे.

या वेळेस ४१०.३० कोटी रुपयांचा निधी सामाजिक न्याय विभागाकडून घेऊन सप्टेंबर महिन्याचा हप्ता वितरित करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. त्यामुळे आता सामाजिक न्याय विभागाच्या योजनांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज्य सरकारच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने यासंदभार्तील शासन निर्णय बुधवारी जारी केला. या निर्णयानुसार लाडकी बहीण योजनेसाठी विभागाअंतर्गत ३९६० कोटी रुपयांचा एकूण निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी सप्टेंबर महिन्याच्या हप्त्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडील रक्कम वळवण्यात आली आहे.

सामाजिक न्याय विभागाकडे संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना आणि दिव्यांग कल्याण योजना अशा महत्त्वाच्या कल्याणकारी योजना आहेत. मात्र, या योजनांवरील काही निधी आता लाडकी बहीण योजनेकडे वळवण्यात आला आहे.

त्यामुळे या योजनांसाठी हात आखडता घ्यावा लागणार, अशी स्थिती निर्माण झाली आहे. महिला व बालकल्याण विभागाकडून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत की, उपलब्ध निधीचा वापर करताना अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील लाभार्थ्यांना प्राधान्य द्यावे.

सरकारकडून जुलै २०२४ पासून ऑगस्ट २०२५पर्यंत १४ हप्त्यांची रक्कम पात्र महिलांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.




## हे तर शरद पवारांचे पाप..

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ९ :
राज्याचे जलसंपदा मंत्री (कृष्णा व गोदावरी खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी शरद पवार यांच्यावर मराठा आरक्षणवरून टीका केली. बुलढाणा अर्बन पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांचा अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा स्थानिक सहकार विद्या मंदिरमध्ये आज, गुरुवारी पार पडला. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मराठा व ओबीसींमधील आजच्या वादाचे, संघषार्चे खापर तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावर फोडले.



नागपूरमध्ये उद्या ओबीसींचा मोर्चा असून अध्यादेश रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत विखे पाटील म्हणाले, ओबीसी नेत्यांच्या गैरसमजातून हे घडत आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता हैदराबाद गॅझेटची प्रक्रिया सुरू आहे. ओबीसींच्या आरक्षणाला अजिबात धक्का लागणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीच्या नेत्यांनी दिली आहे. त्यामुळे ओबीसी नेत्यांनी कोणताही गैरसमज करून घेऊ नये, अशी माझी विनंती आहे.

ओबीसींना आरक्षण देताना मराठा समाजाने कधी विरोध केला नाही. हे पाप शरद पवार यांनी १९९४ मध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असताना केले आहे. त्यावेळी मराठा समाज ओबीसीमध्ये समाविष्ट केला असता तर हा विषयच राहिला नसता. यामुळे या पापाचे धनी शरद पवार असल्याचे विखे पाटील यांनी ठासून सांगितले.



# सचिन घायवळवर दहा वर्षांत एकही गुन्हा दाखल नाही : योगेश कदम



**मुंबई :** कुख्यात गुंड निलेश घायवळच्या भावाला शस्त्र परवाना मंजूर केल्याचा ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांच्या आरोपांना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. शस्त्र परवाना देण्याचे अधिकार आपल्याला नसून, तो पोलिस आयुक्तांच्या सहीने दिला जातो, असे स्पष्ट करत त्यांनी आरोपांचे खंडन केले. सोबतच सचिन घायवळवर दहा वर्षांत एकही गुन्हा दाखल नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन मी सद्सद्विवेक बुद्धीने निर्णय घेतल्याचेही योगेश कदम यांनी म्हटले. सचिन घायवळला योगेश कदम यांच्या स्वाक्षरीने शस्त्र परवाना देण्यात आल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे. ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेचे आमदार अनिल परब यांनी आज पत्रकार परिषद घेत गृहराज्यमंत्र्यांवर गंभीर आरोप केलेत. तसेच त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. आता या आरोपांवर योगेश कदम यांनी माध्यमांशी संवाद साधताना स्पष्टीकरण दिले. पोलिस आयुक्तांच्या सहीनेच शस्त्र परवाना दिला जातो, हे विरोधकांना कदाचित माहीत नसेल. मी याबाबत पूर्णपणे सविस्तर माहिती आवश्यक असल्यास आजच पत्रकार परिषद घेऊन देणार आहे, असे योगेश कदम म्हणाले. मी काल सोशल मीडियाच्या माध्यमातून जे स्पष्टीकरण दिले, त्याबाबत विरोधक टीका करत आहेत. पण मी एवढेच सांगेन, या खुर्चीवर बसलेलो असल्यापासून प्रलंबित गुन्हे किंवा गुन्हे दाखल असलेल्या एकाही व्यक्तीला शस्त्र परवाना देण्यासाठी शिफारस झालेली नाही.

# ई-बस प्रवास होणार अधिक परवडणारा

## प्रवाशांसाठी मासिक व त्रैमासिक पास योजना सुरु : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक




**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी महामंडळाने) प्रवाशांच्या सोयीसाठी आणि ई-बस सेवेला अधिक प्रतिसाद मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता राज्यातील ई-बस प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, या पास योजनांचा मुख्य उद्देश नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने दररोज एकाच मार्गावर प्रवास करणाऱ्या नियमित प्रवाशांना ई-बस सेवेकडे आकर्षित करणे हा आहे. सध्या महामंडळाच्या ताफ्यात ई-बस प्रकल्पातील ४४८ बस आणि शिवाई प्रकल्पातील ५० ई-बसेस कार्यरत आहेत. भविष्यात या बसेसची संख्या आणखी वाढवण्याचा मानस आहे.

अनेक प्रवाशांकडून ई-बस सेवेत पास प्रणालीची मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर महामंडळाने प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा प्रवास देण्यासाठी ही योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. महामंडळाच्या या निर्णयामुळे दैनंदिन प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि आरामदायी प्रवासासाठी ई-बसचा वापर वाढण्यास मदत होईल, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

### पास योजनेच्या प्रमुख वैशिष्ट्ये

**उपलब्धता :** ९ मीटर ई-बस, १२ मीटर ई-बस आणि ई-शिवाई सेवेमध्ये हे पासेस उपलब्ध असतील. (ई-शिवनेरी बससेवा वगळून)

**मासिक पास :** (३० दिवस) : २० दिवसांच्या प्रतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ३० दिवसांसाठी पास दिला जाईल.

**त्रैमासिक पास :** (९० दिवस) : ६० दिवसांच्या प्रतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ९० दिवसांचा पास उपलब्ध होईल.

**सेवा वर्गातील लवचिकता :** उच्च सेवा वर्गाचा पास (ई-बस) वापरून प्रवासी निमआराम किंवा साध्या बसमध्येही प्रवास करू शकतील.

**फरक भाडे नियम :** निमआराम किंवा साध्या बसच्या पासधारकांना ई-बसने प्रवास करायचा असल्यास, दोन्ही सेवांतील भाड्यातील फरक १००% दराने भरून तिकीट घेऊन प्रवास करता येईल.

# कारचा भीषण अपघात

**चालक गंभीर जखमी**

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** मुंबईतील पश्चिम द्रुतगती महामार्गावर म्हणजेच ह गुरुवारी पहाटे एक भीषण अपघात झाला. पहाटे अडीचच्या सुमारास बीएमडब्ल्यू आणि पोर्शे कारमध्ये धोकादायक शर्यत सुरू असताना, नियंत्रण सुटल्याने पोर्शे कार दुभाजकावर आदळली. या अपघातात पोर्शे कारचा चालक गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, बीएमडब्ल्यू कारचा चालक पोलिसांच्या ताब्यात असून, जोगेश्वरी पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बोरिवलीकडून अंधेरीच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर दोन्ही लक्झरी कारची शर्यत सुरू होती. साक्षीदारांच्या म्हणण्यानुसार, या दोन्ही कारचा वेग 150 किलोमीटर प्रतितास होता. जोगेश्वरी मेट्रो स्थानकाजवळ पोर्शे कारचा चालक गाडीवरील नियंत्रण गमावून बसला आणि गाडी थेट दुभाजकावर जोरदार आदळली.

अपघात इतका भीषण होता की, पोर्शे कार चार ते पाच वेळा पलटी झाली, तर तिचा समोरील भाग पूर्णपणे चेंदामेंदा झाला. एअरबॅग उघडल्यामुळे चालकाचा जीव थोडक्यात बचावला असला तरी त्याला गंभीर दुखापत झाली आहे.

अपघातानंतर आसपासच्या नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि जखमी चालकाला पोलिसांच्या मदतीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले. जोगेश्वरी पोलिस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा करून वाहनांची तपासणी केली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बीएमडब्ल्यू कारचा चालक ताब्यात घेतला असून, त्याची चौकशी सुरू आहे. प्राथमिक तपासात दोन्ही कारमध्ये शर्यत सुरू होती, असे संकेत पोलिसांना मिळाले आहेत.

एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, रात्री दोनच्या सुमारास दोन महागड्या गाड्या अतिवेगाने जात होत्या. काही क्षणातच मोठा आवाज झाला. आम्ही बाहेर आलो तेव्हा पोर्शे कार दुभाजकावर उलटलेली दिसली. चालक आत अडकला होता. पोलिस आले आणि त्याला बाहेर काढून रुग्णालयात नेले.

# मकोकाचा आरोपी सचिन घायवळला शस्त्र परवाना कसा?

## पदाचा राजीनामा द्यावा : सुषमा अंधारे



**मुंबई :** राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी कुख्यात गुंड नीलेश घायवळचा भाऊ सचिन बन्सीलाल घायवळ याला शस्त्र परवाना दिल्याचा गंभीर आरोप ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीस परवाना देणे हे कायदा व सुव्यवस्थेला धक्का देणारे आहे. योगेश कदम यांनी या प्रकरणी आपल्या पदाचा गैरवापर करून गुन्हेगाराला बळ दिले. त्यामुळे त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी अंधारे यांनी केली आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या की, योगेश कदम यांनी आपल्या अधिकारांचा गैरवापर करत एका गुंडाला अभय देण्याचा आणि त्याला बळ पुरवण्याचा प्रयत्न केला आहे, त्यामुळे त्यांना पदावर राहण्याचा कोणताही अधिकार नाही. सुषमा अंधारे यांनी  वर पोस्ट करत म्हटलंय की, काल कुख्यात गुंड नीलेश घायवळचा भाऊ सचिन बन्सीलाल घायवळ शस्त्र परवाना प्रकरणांमध्ये गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, शस्त्रपरवाना देत असताना कुठलाही गुन्हा दाखल नव्हता. सचिन घायवळ याच्यावर फक्त खुनाचा गुन्हा नाही तर मकोका अंतर्गत सुद्धा गुन्हे दाखल होते. विशेष अशा व्यक्तीला शस्त्र परवाना दिला जाऊ नये असा पोलिसांचा अहवाल होता. तरीसुद्धा योगेश कदम यांनी स्वतःच्या अधिकार कक्षेमध्ये हा विशेष परवाना देऊ केला.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात १५ टक्के वाढ

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना 15 टक्के इतकी भरघोस मानधन वाढ देण्यात येणार आहे. त्याबाबत शासन मान्यता देण्यात आली असून राज्यभरातील पन्नास हजारावर कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या या निर्णयामुळे राज्यभरातील कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून आनंद व्यक्त होत असून आरोग्यमंत्र्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

कर्मचाऱ्यांचा आरोग्य यंत्रणा राबवण्यामध्ये एनएचएम महत्त्वाचा वाटा असून त्यांच्या उर्वरित मागण्याबाबतही शासन सकारात्मक असल्याचे प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. दहा वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना एक वेळची बाब म्हणून सेवेत कायम करणे, एनएचएम कर्मचाऱ्यांना अंतर्गत सामाजिक सुरक्षा लाभ देणे. कर्मचाऱ्यांचा गंभीर आजार,अपंगत्व, मृत्यू अशा संकटात आर्थिक सहाय्य देण्यासाठी एनएचएम कर्मचारी कल्याण निधी उभारणे, अति दुर्गम



व नक्षलग्रस्त भागात कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांना विशेष भत्ता देणे, सन 2016-17 पूर्वी सेवेत आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनातील तफावत दूर करणे, यासह इतर मागण्याच्या बाबत शासन सकारात्मक असुन, पुढील कार्यवाहीसाठी सादर केला आहे. या निर्णयामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढेल आरोग्य विभागाची यंत्रणा अधिक परिणामकारक होईल, असा विश्वास प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागात विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.एच.एम.) अंतर्गत अनेक पदावर कंत्राटी तत्त्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांची गेले अनेक वर्षापासून भरीव मानधन वाढीची मागणी होती.

त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासनाने 15 टक्के मानधन वाढ देण्याचा निर्णय केला आहे. सद्यस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियानात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

# सांगली बँकेच्या नोकर भरतीला स्थगिती

**■ महासागर प्रतिनिधी, सांगली, दि. ९ :** राज्यातील महायुती सरकारने सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेतील नोकर भरतीला तत्काळ स्थगिती दिली आहे. रयत क्रांती संघटनेचे आमदार सदाभाऊ खोत यांनी ही माहिती दिली. या नोकरी भरती रद्द करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना धक्का दिल्याचा दावा केला जात आहे. सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेतील विविध 559 जागांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. पण भाजप आमदार गोपीचंद पडळकर व रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी या भरती प्रक्रियेत अनियमितता होत असल्याचा दावा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या भरतीला स्थगिती देण्याची मागणी केली होती.

# अनिल परबांकडून योगेश कदमांच्या राजीनाम्याची मागणी



**मुंबई :** महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी पुन्हा एकदा गंभीर आरोप केले आहेत. मुख्यमंत्र्यांचे अभय असल्यामुळेच कदम यांनी राज्यात 'थैमान' घातले आहे, तसेच त्यांनी पुण्यातील एका कुख्यात गुंडाच्या भावाला, ज्याच्यावर खून आणि खंडणीचे गुन्हे दाखल होते, त्याला शस्त्र परवाना मंजूर केल्याचा धक्कादायक दावा परब यांनी केला आहे. अनिल परब यांनी कदम यांच्या हाकालपट्टीची मागणी करत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे सांगितले. अनिल परब यांनी सांगितले की, योगेश कदम यांचे अनेक कारनामे मी पुराव्यांसह यापूर्वी विधिमंडळात मांडले आहेत. मात्र, मुख्यमंत्री प्रत्येक वेळी त्यांची पाठराखण करतात. मुख्यमंत्र्यांची काय अडचण आहे, हे माहिती नाही; पण यामुळे 'मंत्र्यांनी काहीही केले तरी चालते, कारण आम्हाला अभय आहे,' असा संदेश जनतेत गेला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खेडच्या सभेत जाऊन 'योगेश, मी तुज्या पाठीशी आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोल्यात स्थापण्यासाठी समिती नेमावी



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला येथे सुरू करण्याच्या कार्यवाहीसाठी तीन सदस्यीय समिती नेमावी. या समितीने उपकेंद्रासाठी योग्य जागेची पाहणी करून सविस्तर आराखडा सादर करावा, असे निर्देश सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

मंत्रालयात उच्च व तंत्रशिक्षण विभागाची बैठक झाली. राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार रणधीर सावरकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, सहसचिव संतोष खोरगडे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, विद्यापीठाचे रजिस्ट्रार तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. येथील कलाकृती पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहाव्यात, याकरिता आधुनिक सुविधांसह आर्ट म्युझियम उभारावे. यावेळी सर जे. जे. कला महाविद्यालयाच्या समृद्ध कलावैभवाचे जतन, संवर्धन आणि प्रदर्शनासाठी आधुनिक तंत्रज्ञानयुक्त आर्ट गॅलरी उभारण्याच्या आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या गॅलरीत संस्थेतील ऐतिहासिक व दुर्मिळ कलाकृतींचे डिजिटल दस्तऐवजीकरण, विद्यार्थ्यांसाठी संशोधन व अभ्यासासाठी खुले प्रदर्शन विभाग, तसेच आधुनिक कलाप्रदर्शनासाठी स्वतंत्र दालन उभारण्याबाबतही चर्चा झाली.

बैठकीस तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे प्राचार्य राजीव मिश्रा, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, सहसचिव संतोष खोरगडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# पुण्यात १३ लाखांचा कफ सिरप साठा जप्त

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ९ :** खोकल्यावर उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या दोन कंपन्यांच्या कफ सिरपमध्ये धोकादायक रसायन  डायथिलीन ग्लायकॉल प्रमाणापेक्षा जास्त आढळल्याचे उघड झाल्यानंतर महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनानेमोठी कारवाई केली आहे. एफडीएकडून 13 लाख रुपयांचा कफ सिरप साठा जप्त करण्यात आला असून, त्याची विक्री आणि वितरण तातडीने थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या प्रकरणामुळे केवळ औषध उत्पादक कंपन्यांमध्येच नव्हे, तर वैद्यकीय क्षेत्रातही मोठी खळबळ उडाली आहे. रेडनेक्स फार्मास्युटिकल्स प्रा. लि. आणि ह्यशेप फार्मा प्रा. लि. या गुजरातमधील दोन कंपन्यांच्या सिरपमध्ये हे विषारी रसायन आढळले असून, ही कारवाई सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. एफडीएकडून अलीकडेच पुणे विभागातून विविध कफ सिरपचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते.

## महाराष्ट्राचा सुपूत्र आता बिहारच्या राजकारणात

# आयपीएस शिवदीप लांडे यांचा राजकारणात प्रवेश

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** बिहारमध्ये कधी काळी सुपर कॉप आणि सिंघम म्हणून प्रसिद्ध असलेले माजी आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे यांनी अखेर राजकारणात अधिकृत प्रवेश केला आहे. कठोर, प्रामाणिक आणि जनतेशी जोडलेली प्रतिमा असलेल्या लांडे यांनी येत्या बिहार विधानसभा निवडणुकीत दोन मतदारसंघ जमालपूर आणि अररिया येथूल अपक्ष उमेदवार म्हणून लढण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे बिहारच्या राजकीय वतुर्ळात मोठी चर्चा रंगली आहे. महाराष्ट्राचा हा सुपूत्र आता बिहारच्या राजकारणात काय कमाल दाखवतो? हे पाहावे लागेल.

शिवदीप लांडे यांनी काही महिन्यांपूर्वी पोलिस सेवेतून स्वेच्छा निवृत्ती घेतली होती. तेव्हा पासूनच त्यांच्या राजकारणात प्रवेशाबाबत चर्चा सुरू होती. त्यांनी हिंद सेना पार्टी नावाने नवा राजकीय पक्ष स्थापन करण्याची तयारी केली होती. मात्र पक्षाची अधिकृत नोंदणी वेळेत न झाल्याने ते अपक्ष उमेदवार म्हणूनच रिंगणात उतरणार आहेत.



शिवदीप लांडे यांनी निवडणुकीत उतरतानाच स्पष्ट संदेश दिला आहे की, त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू भ्रष्टाचारविरोधातील लढा आणि जनसेवा असेल. त्यांनी सांगितले की, मी पोलीस सेवेत असताना गुन्हेगारी, माफिया आणि भ्रष्टाचाराविरोधात कठोर भूमिका घेतली. आता राजकारणात आलो आहे, ते ही जनतेसाठी.

बिहारमध्ये परिवर्तन घडवण्याचा निर्धार केला आहे. लांडे यांनी आपल्या कार्यकाळात बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये गुन्हेगारीवर अंकुश ठेवला होता.


# मनाचे श्लोक नावाचा चित्रपट म्हणजे संत वाङ्मयाचा अपमान

## हिंदू समाज चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही : हिंदु जनजागृती समितीचा इशारा

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :** राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामी महाराज यांनी रचलेल्या मनाचे श्लोक या पवित्र धार्मिक ग्रंथाच्या नावाचा वापर करून त्याच नावाने मराठी चित्रपटाची निर्मिती करणे, हा हिंदूंच्या श्रद्धेचा बाजार मांडण्यासारखे आहे. हा समर्थ रामदासस्वामींचा अपमानच आहे. उच्चतम नैतिक मूल्ये शिकवणाऱ्या ग्रंथाचे नाव केवळ मनोरंजन, व्यावसायिक लाभ आणि सवंग प्रसिद्धीसाठी वापरणे, हा कोट्यवधी श्रीरामभक्तांच्या आणि समर्थभक्तांच्या धार्मिक भावना पायदळी तुडवण्याचा प्रकार आहे. संतपरंपरेचा हा अपमान हिंदू समाज कदापि सहन करणार नाही. जर या चित्रपटाचे नाव तात्काळ बदलले नाही, तर हिंदू समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करेल आणि चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही. शासन आणि सेन्सॉर बोर्डाने याची तातडीने गंभीर दखल घेऊन मनाचे श्लोक हे पवित्र नाव चित्रपटाच्या शीर्षकातून हटवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक  सुनील घनवट यांनी केली आहे.

सुनील घनवट पुढे म्हणाले की, "या संदर्भात समितीच्या वतीने शासन व सेन्सॉर बोर्डाला निवेदन देण्यात येणार असून, संबंधितांना कायदेशीर नोटीसही पाठवली जाईल. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली कोणी कुराण किंवा बायबल यांसारख्या धार्मिक ग्रंथांची नावे वापरून चित्रपट बनवण्याचे धाडस करेल का? आणि जरी केले, तरी सेन्सॉर बोर्ड त्याला परवानगी देईल का? मग केवळ हिंदूंच्याच धार्मिक भावना वारंवार का दुखावल्या जातात? यापूर्वी द डा विंची कोड आणि विश्वरूपम यांसारख्या चित्रपटांमुळे अनुक्रमे ख्रिस्ती व मुस्लिम धर्मीयांच्या भावना दुखावल्याने अनेक राज्यांत त्यांच्या प्रदर्शनावर बंदी घालण्यात आली होती. या चित्रपटाच्या बाबतीतही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी चित्रपट निमार्ते, दिग्दर्शक आणि सेन्सॉर बोर्ड जबाबदार असतील." घनवट पुढे म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने लाल बाबू प्रियदर्शी विरुद्ध अमृतपाल सिंग [(2015) 16 रउउ 795] या खटल्यात स्पष्ट केले आहे की, 'रामायण'सारख्या पवित्र ग्रंथांच्या नावांचा वापर व्यावसायिक फायद्यासाठी मक्तेदारी म्हणून करता येत नाही. या तत्त्वानुसार मनाचे श्लोक हे नाव चित्रपटासाठी वापरणे कायद्याच्या आणि नैतिकतेच्या विरोधात आहे. भारतीय न्याय संहिता कलम २९९ नुसार हेतुपुरस्सर धार्मिक भावना दुखावणे हा एक गंभीर, दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे; तसेच सिनेमॅटोग्राफ कायदा १९५२च्या कलम ५-ब नुसार सामाजिक सलोखा आणि नैतिकता धोक्यात आणणाऱ्या कोणत्याही चित्रपटाला प्रमाणपत्र न देण्याची जबाबदारी सेन्सॉर बोर्डाची आहे.



# महाराष्ट्रात डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याच्या औषध विक्रीवर बंदी

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :** मध्य प्रदेश-राजस्थानात कफ सिरप सेवनामुळे बालकांचे मृत्यू झाल्याने महाराष्ट्र अन्न आणि औषध प्रशासन (एफडीए) सतर्क झाले आहे. डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याच्या औषधाची विक्री करू नका असे आदेश एफडीएने औषध विक्रेत्यांना दिले आहेत, अशी माहिती राज्य औषध नियंत्रक डॉ. डी. आर. गव्हाणे यांनी दिली. बाल मृत्यूसाठी कारणीभूत ठरलेल्या कोल्ड्रिफ सिरपच्या (समूह क्र:एस आर १३) साठ्यावर महाराष्ट्राच्या एफडीएने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. या औषधात डायइथिलीन ग्लायकोल हा विषारी घटक मिसळलेला असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यातील सर्व किरकोळ विक्रेते, वितरक आणि रुग्णालये येथे तपासणी सुरू केली आहे.

विषारी कफ सिरपचा साठा आढळल्यास तो गोठवावा आणि त्वरित नष्ट करण्याचे स्पष्ट निर्देश सर्व



औषध निरीक्षक व सहाय्यक आयुक्त यांना देण्यात आले आहेत. राज्यातील अधिकारी तामिळनाडू औषध नियंत्रण विभागाशी समन्वय साधून महाराष्ट्रातील वितरणाचा मागोवा घेत आहेत. मुंबई, ठाणे व कल्याणमधील अनेक औषध विक्रेत्यांकडून डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याच्या औषधांची विक्री होत असल्याचा दावा ऑल फूड ड्रग व लायसन्स होल्डर फाऊंडेशनचे अध्यक्ष अभय पांडे यांनी केला आहे. बुधवारी फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी मुंबई-ठाणे- कल्याणमधील अनेक औषध विक्रेत्यांकडे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खोकल्यांच्या औषधांची खरेदी केली यावेळी बहुतांशी विक्रेत्यांनी डॉक्टरांच्या चिठ्ठीची विचारणा न करताच त्यांना खोकल्याच्या औषध देण्यात आल्याचे पांडे यांनी सांगितले.यावेळी त्यांनी बिलही दाखवले.

मध्य प्रदेशात विषारी कोल्ड्रिफ कफ सिरपमुळे मृत्युमुखी पडलेल्या मुलांची संख्या बुधवारी २० वर पोहोचली. नागपूरमध्ये दाखल आणखी एका मुलाचा मृत्यू झाला आहे.

मध्य प्रदेशचे आरोग्यमंत्री राजेंद्र शुक्ला म्हणाले की, नागपुरात अजूनही ५ मुले दाखल आहेत. दरम्यान, मध्य प्रदेश एसआयटीने या प्रकरणाचा तपास अधिक तीव्र केला आणि तामिळनाडूमध्ये छापा टाकला. तपास पथक कांचीपुरम जिल्ह्यातील सुंगुवरचत्रम येथे पोहोचले, जिथे श्रीसम फार्मास्युटिकल्सचा कारखाना आहे. तेलंगणाच्या औषध नियंत्रण प्रशासनाने गुजरातमध्ये उत्पादित रिलीफ व रेस्पिफ्रेश या दोन कफ सिरपच्या वापरावर बंदी घातली आहे.

# जीएसटी निरीक्षक, अधीक्षकाला लाच घेताना रंगेहात अटक

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) रचलेल्या सापळ्यात वस्तू आणि सेवा कर विभागातील (जीएसटी) अधीक्षकासह निरीक्षक अडकले. एका व्यावसायिकाला जीएसटी प्रमाणपत्र देण्यासाठी या दोघांनी २५ हजार रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदारांचा तयार कपड्यांचा व्यवसाय आहे.

सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार तक्रारदाराने सांताक्रूझ येथील वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) विभागाच्या (पश्चिम) कार्यालयाकडे जीएसटी नोंदणीसाठी अर्ज केला होता. पाहणीनंतर जीएसटीकडून प्रमाणपत्र दिण्यात येणार होते. त्यानुसार वस्तू आणि सेवा कर विभागातील निरीक्षकाने पाहणी केली होती. परंतु प्रमाणपत्र देण्यास तो टाळाटाळ करीत होता. सकारात्मक पाहणी अहवाल आणि त्याआधारे नोंदणी प्रमाणपत्र हवे असल्यास २५ हजार रुपये देण्याची मागणी त्याने केली.

तक्रारदाराच्या कंपनीत काहीच त्रुटी नव्हत्या. त्याला लाच द्यायची नव्हती. त्यामुळे त्याने या संदर्भात केंद्रीय अन्वेषण विभागाकाकडे (सीबीआय) तक्रार केली. यानुसार सीबीआयने बुधवारी वस्तू आणि सेवा कर कार्यालयात सापळा रचला. लाचेची रक्कम स्वीकारताना अधीक्षक आणि निरीक्षाला अटक करण्यात आली. या दोन्ही अधिकाऱ्यांच्या निवासस्थानीही छापे घालण्यात आले.

# जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा

■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. ९ :**

जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करण्यासह शेतकऱ्यांच्या अन्य मागण्यांसाठी बुधवारी शिवसेनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. शिवसैनिकांनी घोषणा देत परिसर दणाणून सोडला. जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदनही सादर केले.



जिल्ह्यात यंदा जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर अशा संपूर्ण मान्सूनच्या कालावधीत अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. परिणामी शेतमालाचे उत्पादन प्रचंड घटणार आहे. नुकसान भरपाईसाठी शिवसेनेने ८ ऑक्टोबर रोजी आंदोलन केले. आंदोलनात शिवसेनेचे उपनेते तथा आमदार नितीन देशमुख, जिल्हा प्रमुख गोपाल दातकर, पूर्वचे प्रमुख राहुल कराळे, विकास पागृत, सुरेंद्र विसपुते, महिला आघाडीच्या सरिता वाकोडे, संगीता राठोड , शुभांगी भटकर, वर्षा पिसोडे, अंजना आवटे आदी सहभागी झाल्या.

जिल्ह्यात जून महिन्यात अतिवृष्टीमुळे ४ हजार २१५ हेक्टर क्षेत्रातील पिकांची हानी झाली. चार तालुक्यातील १६३ गावांमधील ७ हजार ५७७ शेतकऱ्यांचे ६ कोटी ५ लाख ५६ नुकसान झाले होते. ही मदत मंजूर होऊन बाधित शेतकऱ्यांना वितरीत होणे सुरु आहे. जुलै महिन्यातील अतिवृष्टीचा फटका . ७ हजार ३१ हेक्टर क्षेत्रा-वरील पिकांना बसला होता . ११ हजार ५९७ शेतकऱ्यांचे ६ कोटी २१ लाखांचे नुकसान झाले होते. ही मदत २३ सप्टेंबर रोजी मंजूर झाली. ऑगस्ट महिन्यात १ लाख ६ हजार ६४९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. अतिवृष्टीचा फटका १ लाख २० हजार ६९७ शेतकऱ्यांना बसला आहे.

भरपाईसाठी ९२ कोटींची आवश्यकता असून, संयुक्त अहवाल महसूल, कृषी व जिल्हा परिषदेच्या यंत्रणेकडून शासनाला २४ सप्टेंबर रोजी पाठवण्यात आला. जिल्ह्यात १६ व २९ सप्टेंबर या कालावधीत अतिवृष्टीमुळे १११ गावे बाधित असून,२९ हजार ३२७ हे. क्षेत्राचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल आहे.

आश्वासन गेले कुठे? कर्जमाफीवरून आ. देशमुख व जिल्हा प्रमुख दातकर यांनी महायुतीवर टीकास्त्र डागले. विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी विद्यमान व पूर्वीच्या सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्तीचे आश्वासन दिले होते; पण जवळपास एक वर्ष उलटूनही या विषयावर कोणताही निर्णय सरकारने घेतला नाही. त्यामुळे आश्वासनांचे काय झाले? असा सवाल करण्यात आला.

## विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त संतप्त
# झाडावर चढून अनोखे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
**भंडारा , दि. ९ :**

भिंतीना कायम ओल आहे, घरांना भेगा पडल्या आहेत. विजेच्या बोर्डांमध्ये करंट असतो. सांडपाणी वाहून जाऊ शकत नाही. पाण्यामुळे साप, विंचू, रानडुकरांचा मुक्तसंचार असतो. दिवस-रात्र जीव मुठीत घेऊनच जगावे लागते. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना गावाच्या स्थितीबाबत संपूर्ण माहिती असूनही पुनर्वसनाबाबत चालढकल केली जात आहे. अखेर संतप्त प्रकल्पग्रस्तांनी विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी ६ ऑक्टोबरपासून आंदोलन सुरू केले. हे आंदोलन मंगळवारी चिघळले. आंदोलनकर्त्यांपैकी काही महिला जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील झाडावर चढल्या. जोपर्यंत मुख्यमंत्री



व्हिडिओ कॉलद्वारे बोलून समस्यांचे समाधान करत नाही, तोपर्यंत खाली न उतरण्याचा निर्णय त्यांनी घेतला. गोसेखुर्द प्रकल्पामुळे बाधित झालेल्या भंडारा तालुक्यातील २७ गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मागील अनेक दिवसांपासून रेंगाळत आहे. प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्यावतीने यासाठी वारंवार आंदोलन केले जाते, मात्र तोडगा निघत नाही. कारधा, सुरेवाडा, खमारी, करचखेडा ही गावे यामुळे अधिकच प्रभावित झाले आहेत. कारधा, करचखेडा येथील घरांना कायमच धोका असतो. ज्या गावांमधील कुटुंब अक्षरश: जीव मुठीत घेऊन जगत आहेत. अशा परिस्थितीत या गावांचे पुनर्वसन करण्यात यावे, सुरबोडी गावाचे २०१३ च्या कायद्यानुसार पुनर्वसन व्हावे, आदिवासींच्या जमिनी अधिग्रहित केल्याने ते भूमिहीन झाले असून त्यांना जमिनी परत द्याव्या, भूखंड मंजूर करण्यात यावे, तातडीने घरांची मोजमाप करून मोबदला देण्यात यावा यासह अनेक मागण्यांना घेऊन प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती आंदोलन करीत असते. दरम्यान, सोमवार, ६ ऑक्टोबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर याच मागण्यांना घेऊन प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन सुरू आहे.

# देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा
## भीमशक्ती सामाजिक संघटनेचा आंदोलनाचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. ९ :**

सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या दिशेने एका वकिलाने बुट फेकण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी मंगळवारी भीमशक्ती सामाजिक संघटनेने केली. संबंधितांवर कठोर कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ एका प्रकरणाची सुनावणी करत होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एक वकील डेस्कवर गेला, त्याने त्याचा बूट काढला आणि सरन्यायाधीशांवर फेकण्याचा प्रयत्न केला. न्यायालयाच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला पकडले आणि घेऊन गेले. कोर्टातून बाहेर पडताना वकिलाने घोषणाबाजी केली, 'आम्ही सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही.' या घटनेनंतर, सरन्यायाधीशांनी न्यायालयात उपस्थित असलेल्या वकिलांना त्यांचे युक्तिवाद सुरू ठेवण्यास सांगितले. मध्य प्रदेशातील खजुराहो येथे भगवान विष्णूच्या ७ फूट उंच, शिरच्छेदित पुतळ्याच्या जीर्णोद्धारावर सरन्यायाधीश गवई यांच्या टिप्पण्यांमुळे वकिलाला राग आला असावा असे मानले जात आहे. सरन्यायाधीशांनी मूर्तीचा खटला फेटाळून लावत म्हटले की, 'जा आणि देवाला ते स्वतः करायला सांगा. तुम्ही भगवान विष्णूचे कट्टर भक्त असल्याचा दावा करता, जा आणि त्यांची प्रार्थना करा. दरम्यान सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट फेकण्याचा केलेला प्रयत्न हा भारतीय न्यायव्यवस्थेवर, संविधान व लोकशाही वर थेट हल्ला आहे, असे म्हणत या घटनेचा भीमशक्ती सामाजिक संघटना जिल्ह्याच्या वतीने निषेध करण्यात आला. भीमशक्तीचे प्रा. विजय आठवले, भूषण गायकवाड, मधुसूदन भटकर, अनिल गवई, प्रा. डॉ. बाळकृष्ण खंडारे, अनिल तायडे, प्रा. सुनील कांबळे, संदेश गवई, विद्याधर मोहोड, सुशील कांबळे, किशोर सिरसाट, बाळकृष्ण सिरसाट, दिनेश खोब्रागडे, शैलेंद्र लंकेश्वर, रमेश आठवले अश्वजीत सिरसाट पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात निषेध करण्यात आला. राष्ट्रपती यांचे नावे निवासी जिल्हाधिकारी विजय पाटील यांना निवेदन देण्यात आले. संघटनेने निवेदनात हल्लेखोर राकेश किशोर तसेच त्याला प्रोत्साहन देणाऱ्या संघटनांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्यात यावी. घटनेचा तपास स्वतंत्र केंद्रीय तपास यंत्रणेकडून करण्यात यावा. देशभर पसरत असलेल्या जातीय व धार्मिक कट्टरतेच्या प्रचारावर बंदी घालावी.

## भाजपा जिल्हा अध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांच्या उपस्थिती दारू बंदीची घोषणा



■ महासागर प्रतिनिधी
**धारणी, दि. ९ :**

धारणी शहारा लगत असलेल्या बासपाणी गावातील नागरिकांनी मेळघाट जिल्ह्याचे भारतीय जनता पार्टी अध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गावात दारू बंदीची घोषणा केली.

गावात दारूचे होणारे दुष्परिणाम बघता दारू बंदी करणे आवश्यक झाल्याचे गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी आपली प्रतिक्रिया दिली, दारू बंदीसह गाव व्यसनमुक्त बनविण्याचा आमचा संकल्प असेल असे गावकरी बोलले, दारूमुळे अनेक कुटुंब बर्बाद झाल्याचे उदाहरणे आहे, म्हणून गावात दारू बंदीचा निर्णय घेण्यात आला. जो कोणी दारू पिऊन अथवा कोणाच्या घरी दारू आढळल्यास त्यावर विशेष दंडात्मक कार्यवाही करण्याचा निर्णय सुध्दा गावकऱ्यानी यावेळी घेतला, जिल्हा अध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांनी बासपानी येथील दारू बंदी निर्णय लोकहिताचे असल्याने सर्व नागरिकांचे मनपूर्वक आभार मानले, मी जेव्हा आमदार होतो त्यावेळेस मेळघाटातील अनेक गावात दारू बंदी करण्यात आले होते, आता जी गावे दारू बंदी पासून वंचित आहे. त्या सर्व गावांनी तत्काळ आपल्या गावात दारू बंदी चा निर्णय घ्यावा असे आव्हान या वेळी भिलावेकर यानी केले.

यावेळी मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते, सोबतच ग्राम पंचायत सरपंच, पोलीस पाटील, आळा पटेल, भाजपाचे नेते साबुलाल जी पाटणकर, येणोरकर सर उपस्थित होते.

## प्रयत्नांची पराकाष्ठा केली, तर ध्येयपूर्ती सहज शक्य : प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. ९ :**

विद्यार्थ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून कल्पकतेला मूर्त रूप देण्याचा प्रयत्न केला, तर ध्येयप्राप्ती पासून कोणीच अडवू शकणार नाही. 'आयडीयाथॉन' च्या माध्यमाने विद्यापीठाने ही संधी उपलब्ध करून दिलेली असून परिश्रम व सर्जनशीलता दाखवणे गरजेचे आहे. संशोधकांनी या संधीचे सोने करायला हवे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. पीएम उषा अंतर्गत विद्यापीठाच्या नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळ व संशोधन - नवोपक्रम फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा आणि नवसंशोधनातून रोजगार निर्मिती व्हावी, याकरीता आयोजित 'आयडीयाथॉन' या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून जाधव लेलँड प्रा.लि. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी कश्मिरा जाधव उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी कश्मिरा जाधव विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, कोणत्याही उद्योगात दर्जा अत्यंत महत्वाचा असतो. ग्राहकांना दर्जेदार उत्पादन देण्यावर भर देणे गरजेचे आहे. प्रत्येक क्षेत्रात आवड निर्माण करा, सतत शिकत रहा, जागतिकीकरणाच्या युगात डोळे उघडे ठेवून इतर देशांमध्ये विज्ञान - तंत्रज्ञानाने कशी प्रगती केली, याचे भान ठेवणे गरजेचे असून योजनांची आखणी करा, त्यावरच थांबू नका, तर प्रत्यक्ष कृती करा, तपासा व कार्यरत रहा असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीताने झाली. अध्यक्ष व प्रमुख अतिथींचे डॉ. अजय लाड व डॉ. स्वाती शेरेकर यांनी स्वागत केले. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची उपयोगिता आणि उद्देश सांगितला. डॉ. स्वाती शेरेकर यांनी नवोपक्रम मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन सर्जनशीलता व संशोधनाला वाव देणा-याविविध उपक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. आयडीयाथॉनचे परिक्षक सर्वश्री प्रा. एस.डी. कोवे, डॉ. शारदा देवरे, प्रा. डी. आर. सोळंके, प्रा. के. सी. मोरे, डॉ. प्रतिक देशमुख, श्री अनुप मडघे यांचा प्र-कुलगुरूडॉ. महेंद्र ढोरे व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
विद्युत काम

मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी) भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेलवेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून मागवत आहेत. निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/23, कामाचे नाव:- सोलापूर विभागातील दौंड-सोलापूर विभागातील मलठण स्टेशनवर प्रत्येक दिशेने एक लांब पल्ल्याच्या लूप लाईनची तरतूद करण्याच्या संदर्भात कामाचा विद्युत टीआरडी भाग. अंदाजे किंमत: १,२२,४०,७०३.६२, बिड सिक्युरिटी: २,११,२००/-, पूर्णता कालावधी: १२ महिने, ऑफरची वैधता: ६० दिवस, वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: ०३/११/२०२५ दुपारी ३.०० वाजता. ANJ-60

सतारकाम व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

### हरविल्या बाबत जाहीर नोटीस

आम जनतेस कळविण्यात येते की (१) श्री त्रिंबकराव नागपूरकर व (२) सौ रेखा त्रिंबकराव नागपूरकर यांची मुदत ठेवी (फिक्स डिपॉझिट) विदर्भ प्रीमियर च्या रसीद हरविलेले आहे ज्याचे रसीद क्र. खालील प्रमाणे आहे.

(1) R.No. 073375, (2) 073380 (3) 05557 (4) 0076152 (5) 026847 (6) 026846 (7) 026804 (8) 026845 (9) 026802 (10) 026803

वरील कागदपत्रांच्या खूप शोध घेतले असता वरील कागदपत्र मिळाले नाही. जर कुणास वरील कागदपत्र मिळाले तर त्यांनी खालील संपर्क क्रमांकावर संपर्क साधावे किंवा खालील दिलेल्या पत्त्यावर येऊन भेटावे.

सौ. मनीषा तुषारराव मांडेकर
मो. 9860690150
पत्ता : फ्लॅट नं. A/२०१बजरंग कॉम्प्लेक्स नागपूर

# कार्यालय नगर पंचायत बेसा-पिपळा
जिल्हा - नागपूर ४४००३७
ई-मेल : npbesapipla@gmail.com

जा.क्र.नप.बे.पि/बांध/कावि/३७३७/२०२५-२६
कार्यालय नगर पंचायत बेसा पिपळा
दिनांक :- ०८/१०/२०२५

**ई-निविदा सूचना**

मुख्याधिकारी तथा प्रशासक नगर पंचायत बेसा पिपळा, जि. नागपूर यांचा वतीने नगर पंचायत बेसा-पिपळा हदीतील सन २०२५-२०२६ नगरपंचायत निधी, नगरपंचायत विकास निधी अंतर्गत/इतर अनुज्ञेय निधी अंतर्गत ३ कामाकरिता बि-१ दोन लिफाफा पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांच्या नोंदणीकृत संस्था/एजेन्सी/व्यक्तीकडून निविदा मागविण्यात येत आहे. वरील कामाची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने करावयाची आहे, निविदा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in तसेच कार्यालयीन वेळेवर संबंधित विभाग मध्ये दिनांक ०९/१०/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे. करिता योग्य त्या वर्गातील कंत्राटदाराने निविदा सादर करावी.

स्वा-
(भारत बा. नंदनवार)
प्रशासक
नगर पंचायत बेसा पिपळा

## MAHAGENCO — e-TENDER NOTICE - 083 / 2025-26

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website **https://eprocurement.mahagenco.in.**

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0607 CHP1 | 3000062066 | HIRING OF VEHICLES FOR HANDLING COAL AT CHP-I (210 MW) TPS KHAPERKHEDA (AS AND WHEN REQUIRED BASIS). | 12.18 |
| TN0608 CM2 | 3000062076 | CLEANING, CLEARING & LIFTING OF DEBRIS / GARBAGE AT VARIOUS LOCATION IN 500 MW TPS KHAPERKHEDA. (AS & WHEN REQURIED BASIS). | 8.30 |
| TN0609 AHP1 | 3000062081 | PROCUREMENT OF NON-LUBRICATED ECCENTRIC PLUG VALVES FOR AHP-1. | 32.54 |
| TN0610 CHP1 | 3000062103 | SUPPLY OF STEEL WIRE ROPE, VARIOUS SIZE WIRE ROPE SLINGS AND D SHACKLES FOR LIFTING/SHIFTING OF MATERIAL AND DAY TO DAY MAINTENANCE WORKS IN CHP-I (4 X 210), TPS KHAPERKHEDA. | 5.91 |
| TN0611 BM2 Refloated | 3000062124 | BIENNIAL WORK CONTRACT FOR MECHANICAL MAINTENANCE OF COAL MILLS, COAL FEEDERS & SEAL AIR FANS AT UNIT NO. 5,500 MW, TPS KHAPERKHEDA. | 145.95 |
| TN0613 BM1 Refloated | 3000062167 | WORK OF ANNUAL OVERHAUL MAINTENANCE OF AIR PRE-HEATER FOR UNIT NO. 1. | 25.93 |
| TN0614 MIS | 3000062142 | COMPREHENSIVE BI-ANNUAL MAINTENANCE CONTRACT FOR CCTV SURVEILLANCE SYSTEM AT KHAPERKHEDA TPS FOR 2 YEARS | 10.72 |
| TN0615 OS1 | 3000062143 | BIENNIAL WORK CONTRACT FOR PROVIDING SERVICES OF PHARMACIST, NURSE AND FIRST AID ATTENDANTS AT DISPENSARY TPS, KHAPERKHEDA. | 26.15 |
| TN0618 CHP1 Refloated | 3000062198 | REPAIR OF VARIOUS VEHICLES AT TPS KHAPERKHEDA | 12.37 |
| TN0619 BM1 | 3000062237 | WORK FOR HOT PA FAN, FD FAN & ID FAN MAINTENANCE FOR UNIT NO. 1 TO 4 ON AS & WHEN REQUIRED BASIS. | 19.88 |

**Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.**

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda

## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
### ( HMP Department) Quotation Notice

Commissioner NMC invites Quotation for the following works. These Quotation can be purchased by the registered contractors of NMC from NMC's HMP. The terms & conditions of Quotation are available on NMC's website. **(www.nmcnagpur.gov.in).** The sale and purchase of Quotation can be done through Personaly from HMP Office.

| Quotation No. | Name of Work | Estimated Cost | B.I. No. |
|---|---|---|---|
| 1 | Supply of Labour for Recarpeting various BT Roads included in Phase-1 N.M.C. Area Through Hot Mix Plant Dept. By Team No. 2 For Hanuman Nagar Zone No. 3, Nehrunagar Zone No. 5, Gandhi Zone Mahal no. 6, Satranjipura Zone No. 7, Lakadganj Zone No. 8 | 842972 | A22001330805 |
| 2 | Supply of Labour for Recarpeting Various BT Roads Including in Phase -1 N.M.C. Area Through Hot Mix Plant. Dept. By Team No. 01 for Laxminagar Zone No. 01, Dharmpeth Zone No. 02, Ashinagar Zone No. 09, Manglwari Zone No. 10 | 702458 | A22001330805 |

**Note : (1)** Cost of Blank Quotation form including GST : **Rs. 590/-** & Tender sale/submission start date: **09.10.2025. (2)** Tender submission and date/sales end date **15.10.2025 up to 5.00 pm. (3)** Date of opening of Tender (if possible) **16.10.2025 up to 5.00 pm. (4)** Right to reject any or all Tender without assigning any reasons is reserved by the Municipal Commissioner N.M.C. Nagpur. **(5)** Eligibility criteria and mode of submission shall be as stated in Tender Form. **(6)** Supply of labour shall be within 3 days after work orders. **(7)** contractor has to visit site before submition of Tendes. **(8)** Time is essence of contract.

Advt No. 551 PR Date 09.10.2025 — **Executive Engineer (Hot Mix Plant), NMC, Nagpur**

PN/25551

## HARI GOVIND INTERNATIONAL LIMITED
("HGIL" OR "TARGET COMPANY")
CIN: L99999MH1989PLC050528
Regd. Office: 125, Wardhman Nagar Nr. Radha Krishna Mandir, Nagpur, Maharashtra, India, 440008
PH: 09373126605 Email: hgil.ngp@gmail.com; Website: www.hgil.in

Recommendations of the Committee of Independent Directors ("IDC") of Hari Govind International Limited (**"Target Company"**) in relation to the Open Offer (**"Offer"**) made by Shaju Thomas (**"Acquirer 1"**) and Linta Purayidathil Jose (**"Acquirer 2"**), (hereinafter collectively referred to as **"Acquirers"**) to the public shareholders of the Target Company (**"Shareholders"**) under Regulations 3(1) & 4 of SEBI (Substantial Acquisition of Shares and Takeovers) Regulations, 2011, as amended (**"SEBI SAST Regulations"**).

| | | |
|---|---|---|
| 1 | **Date of Meeting** | October 09, 2025 |
| 2 | **Name of the Target Company** | Hari Govind International Limited |
| 3 | **Details of the Offer pertaining to Target Company** | The offer is a mandatory offer to acquire upto **22,16,500 Equity Shares** representing 26.00% of the expanded share capital of the Target Company on a fully diluted basis, as of the tenth working day from the closure of the tendering period of the open offer, from the eligible shareholders of the Target Company for cash at a price of ₹10.00/- per equity share.<br>The offer has been made pursuant to Share Purchase Agreement and a Preferential Allotment entered into between the Acquirers and Sellers on May 24, 2025<br>The public announcement dated May 14, 2025("PA"), the detailed public statement published on May 20, 2025, ("DPS"), the draft letter of offer dated May 28, 2025 ("DLOF"), and the letter of offer dated October 08, 2025 ("LOF") have been issued by Marwadi Chandarana Intermediaries Brokers Private Limited ("Manager to the Offer") on behalf of the Acquirer. |
| 4 | **Name of the Acquirers and PACs** | Shaju Thomas (**"Acquirer 1"**) and Linta Purayidathil Jose (**"Acquirer 2"**), (hereinafter collectively referred to as "Acquirers")<br>PACs: There are no persons acting in concert (PACs) with the Acquirer for the purposes of the Open Offer. |
| 5 | **Name of the Manager to the Offer** | **Marwadi Chandarana Intermediaries Brokers Private Limited**<br>X-change Plaza, Office no. 1201 to 1205, 12th Floor, Building No. 53E, Zone-5, Road 5E, Gift City, Gandhinagar - 382355, Gujarat, India;<br>**Tel. No.**: 022-69120027;<br>**Email:** mb@marwadichandarana.com<br>**Website:** lb.marwadichandaranagroup.com<br>**Contact Person:** Radhika Maheshwari / Jigar Desai<br>**SEBI Registration Number.**: INM000013165 |
| 6 | **Members of the Committee of Independent Directors ("IDC")** | 1.Rishin Rasheed - Chairman<br>2.Reveesh Moolamkuzhiyil Varghese - Member<br>3.Aruna Mahesh Menkudale - Member |
| 7 | **IDC Member's relationship with the Target Company (Director, Equity shares owned, any other contract / relationship), if any** | IDC members are Independent Directors on the Board of the Target Company. They do not have any Equity Holding in the Target Company. None of them have entered into any other contract or have other relationship with the Target Company and its Directors. |
| 8 | **Trading in the Equity shares/other securities of the Target Company by IDC Members** | The IDC Members have not traded in the securities of the company in the last 12 months and period from the date of the PA and till the date of this recommendation |
| 9 | **IDC Member's relationship with the Acquirers (Director, Equity shares owned, any other contract / relationship), if any** | The IDC Members do not have any relationship with the Acquirers |
| 10 | **Trading in the Equity shares/other securities of the Acquirers by IDC Members** | None of the members of the IDC have traded in any of the equity shares/ securities of the Acquirer during the: (a) 12 months period preceding the date of the PA; and (b) period from the date of the PA and till the date of this recommendation. |
| 11 | **Recommendation on the Open Offer, as to whether the Offer, is or is not, fair and reasonable** | The IDC has perused the PA, DPS, DLOF and LOF issued by the Manager to the Offer on behalf of the Acquirer, in connection with the Open Offer.<br>Based on the above, the IDC is of the opinion that the Offer Price of INR 10 (Indian Rupees Ten only) per Equity Share is in accordance with the applicable regulations of the SEBI (SAST) Regulations and appears to be fair and reasonable.<br>Further, IDC members confirm that the Target Company has not received any complaint from the shareholders regarding the open offer process, valuation price or method of valuation. |
| 12 | **Summary of reasons for recommendation** | IDC has taken into consideration the following for making the recommendation:<br>IDC has reviewed (a) The Public Announcement (**"PA"**) dated May 14, 2025 in connection with the Offer issued on behalf of the Acquirers, (b) The Detailed Public Statement (**"DPS"**) which was published on May 20, 2025, (c) The Letter of Offer (**"LOF"**) dated October 08, 2025, (d) The Corrigendum dated September 12, 2025 and (e) The Corrigendum 2 dated October 09, 2025.<br>Based on the review of PA, DPS, LOF, Corrigendum, Corrigendum 2, the IDC is of the opinion that the Offer Price of ₹10.00 per equity share for public shareholders by the Acquirers is in line with the regulation prescribed by SEBI under the Regulations and prima facie appears to be justified. However, the Public Shareholders should independently evaluate the Offer and take informed decision in the matter.<br>This statement of recommendation will be available on the website of the Target Company at: www.hgil.in |
| 13 | **Details of Independent Advisors, if any.** | None |
| 14 | **Details of Voting Pattern** | The recommendations were unanimously approved by the members of the IDC present at the meeting of the IDC held on October 09, 2025. |
| 15 | **Any other matter to be highlighted** | None |

To the best of our knowledge and belief, after making proper enquiry, the information contained in or accompanying this statement is, in all material respect, true and correct and not misleading, whether by omission of any information or otherwise, and includes all the information required to be disclosed by the Target Company under the SEBI (SAST) Regulations.

**For and on behalf of the IDC of Hari Govind International Limited**
Sd/-
**Rishin Rasheed**
**Chairman of IDC**

**Place: Mallapuram**
**Date: October 9, 2025**

# जगातील एक अब्जाहून अधिक लोक मानसिक आजारी
## आव्हाने आणि समाजाची जबाबदारी

जगभरात दरवर्षी १० ऑक्टोबर हा दिवस जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ मानसिक आजारांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी नसून, मानसिक आरोग्याला समाजात प्राथमिकता देण्याचा एक व्यापक प्रयत्न आहे. आधुनिक जगातील दैनंदिन ताणतणाव, सामाजिक स्पर्धा, आर्थिक अस्थिरता आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढलेल्या संवादाच्या पद्धतींमुळे मानसिक आरोग्याची स्थिती गंभीर होत चालली आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२५ मध्ये प्रकाशित 'World Mental Health Today' अहवालानुसार, जगभरात सुमारे एक अब्जाहून अधिक लोक मानसिक आजारांनी ग्रस्त आहेत. ही आकडेवारी केवळ संख्यात्मक तथ्य नाही, तर ही मानवतेसमोरील गंभीर आव्हाने आणि मानसिक आरोग्य सेवांमध्ये असलेल्या अंतराचे स्पष्ट प्रमाण आहे.

------------------

मानसिक आरोग्य समस्या ही केवळ रुग्णालयात उपचार घेण्याच्या गरजेपुरती मर्यादित नसून, ती व्यक्तीच्या संपूर्ण जीवनशैलीशी संबंधित आहे. जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या मानसिक आरोग्याच्या व्याख्येनुसार मानसिक आरोग्य ही अशी स्थिती आहे, ज्यामध्ये व्यक्ती आपल्यातील क्षमता ओळखून तिचा व्यवस्थित उपयोग करू शकते, तसेच जीवनातील ताणतणावास सामोरे जाण्यास मानसिक आरोग्य सक्षम स्थिती आहे, मानसिक सुदृढ व्यक्ती उत्पादकपणे कार्य करू शकते आणि समाजासाठी योगदान देऊ शकते.

म्हणजेच मानसिक आरोग्याचा अर्थ केवळ मानसिक आजार नसणे नव्हे, तर जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता, समाजात सक्रिय सहभाग, आणि आत्मस्वीकृती यासह व्यक्तीची पूर्ण मानसिक क्षमता आहे.

मानसिक विकार अनेक प्रकारचे असतात, जसे की नैराश्य, चिंता विकार, बायपोलर डिसऑर्डर (द्विध्रुवीय विकार), स्किझोफ्रेनिया (ज्या रोगामध्ये विचार, भावना व कृती यांमध्ये फारकत पडत जाते असा मानसिक रोग), पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (आघातानंतरचा ताण विकार), आणि व्यसनाधीनता या विकारांमुळे केवळ व्यक्तीच नाही तर कुटुंब, समाज आणि आर्थिक स्थिती देखील प्रभावित होते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, नैराश्य आणि चिंता विकार हे सर्वाधिक सामान्य आहेत, आणि त्यांचा परिणाम दीर्घकाळ टिकतो. मानसिक आजार हे अपंगत्वाचे दुसरे सर्वात मोठे कारण आहेत, ज्यामुळे रोजगार, उत्पन्न आणि सामाजिक सहभागावर प्रतिकूल परिणाम होतो.

जागतिक पातळीवर, मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढली तरी, अजूनही अनेक लोकांना योग्य सेवा मिळत नाहीत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, मानसिक आरोग्यासाठी जागतिक आरोग्य बजेटचे फक्त २% निधी राखीव आहे, जो आर्थिक दृष्ट्या अत्यल्प आहे.

उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये प्रति व्यक्ती ६५ अमेरिकन डॉलर्स इतका खर्च होतो, तर कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये केवळ ०.०४ अमेरिकन डॉलर्स इतका खर्च केला जातो. या सुविधांच्या कमतरतेमुळे सुमारे ८०% मानसिक आजारी लोकांना आवश्यक उपचार मिळत नाहीत.

भारतामध्ये मानसिक आरोग्याचे संकट अधिक गंभीर आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षण (NMHS) २०१५-१६ नुसार, भारतात १८ वर्षांवरील १४% लोक मानसिक विकारांनी ग्रस्त आहेत. परंतु, केवळ १०-१२% लोकांनाच उपचार मिळतात. उर्वरित ८८-९०% लोकांना आवश्यक उपचार मिळत नाहीत, ज्यामुळे उपचार दरी अत्यंत मोठी आहे.

या सर्वेक्षणानुसार, मानसिक विकारांमध्ये





डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

नैराश्य, चिंता विकार, आणि मद्यपान विकार हे सर्वाधिक आढळले. उपचार न मिळण्याची कारणे विविध आहेत, ज्यात सामाजिक कलंक, अज्ञान, आणि उपचारांच्या उपलब्धतेची कमतरता यांचा समावेश होतो.

ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा अजूनही दुर्लभ आहेत. अनेकदा मानसिक विकारांना समाजात भूतबाधा, दैवी शाप, कमजोरी अशा चुकीच्या समजुतींशी जोडले जाते. या अज्ञानामुळे रुग्णांना योग्य वैद्यकीय उपचाराऐवजी पारंपारिक उपाय, झाडफुंक, जादूटोणा किंवा धार्मिक मार्गांचा आधार घ्यावा लागतो, ज्यामुळे आजार अधिक तीव्र होतो आणि समाजातून तुटतो.

महिलांचे मानसिक आरोग्य हा विशेष लक्ष देण्यासारखा भाग आहे. कौटुंबिक हिंसा, लैंगिक अत्याचार, सामाजिक असमानता, आणि घरगुती जबाबदाऱ्या यामुळे महिलांमध्ये मानसिक विकारांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत दुप्पट आहे.

मातृत्वोत्तर नैराश्य देखील या समस्येचा एक गंभीर भाग आहे. या सर्व कारणांमुळे महिलांच्या मानसिक आरोग्यावर सामाजिक दृष्ट्या गंभीर परिणाम होतो आणि त्यांना उपचार घेण्यास अडचणी येतात. तरुण पिढीमध्ये मानसिक आरोग्याची स्थिती अधिक चिंताजनक आहे.

शैक्षणिक दडपण, करिअरची चिंता, कौटुंबिक अपेक्षा, आणि सोशल मीडियावरील तुलना या सर्वांमुळे नैराश्य, चिंता विकार, आणि एकाकीपण यांचे प्रमाण वाढले आहे. भारतात दरवर्षी १३,००० हून अधिक विद्यार्थी आत्महत्या करतात, जी शिक्षण प्रणालीतील गंभीर त्रुटी आणि मानसिक आरोग्याविषयीच्या अज्ञानाचे स्पष्ट उदाहरण आहे.

मानसिक आरोग्य सेवांमध्ये तज्ज्ञांची कमतरता, संसाधनांचा अभाव, आणि समुदाय आधारित सेवा मॉडेल्सची कमतरता यामुळे उपचार घेणे कठीण झाले आहे. भारत सरकारने २०१७ मध्ये मानसिक आरोग्य सेवा कायदा (Mental Healthcare Act) लागू करून मानसिक आरोग्याला कायदेशीर मान्यता दिली आहे. यामध्ये मानसिक आरोग्य सेवा सर्वांसाठी उपलब्ध करणे, रुग्णांच्या अधिकारांचे संरक्षण करणे, आणि मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करणे यांचा समावेश आहे. District Mental Health Programme (DMHP) आणि National Mental Health Programme (NMHP) यांसारख्या कार्यक्रमांद्वारे ग्रामीण व शहरी भागात मानसिक आरोग्य सेवांचे जाळे मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी व्यापक जनजागृती करणे आवश्यक आहे. शाळांमध्ये भावनिक शिक्षण, महाविद्यालयांमध्ये मानसिक आरोग्य क्लब, आणि ग्रामपंचायतींमध्ये समुदाय आधारित समुपदेशन सुरु करणे यामुळे मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढेल. रुग्णांना योग्य उपचार मिळवण्यासाठी प्रोत्साहन मिळेल आणि सामाजिक कलंक कमी होईल.

व्यक्तिगत पातळीवर मानसिक आरोग्य टिकवण्यासाठी योग, ध्यान, विपश्यना, व्यायाम, निसर्गाशी संबंध, संगीत आणि संवाद या सर्व गोष्टी अत्यंत उपयोगी आहेत. भावनिक साक्षरता वाढवणे, आत्मस्वीकृती, आणि सहानुभूती यांचा विकास देखील मानसिक आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

मानसिक आरोग्य ही केवळ वैयक्तिक समस्या नाही, तर ती सामाजिक, आर्थिक आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) २०२५ मध्ये प्रकाशित 'World Mental Health Today' अहवालानुसार, जगातील एक अब्जाहून अधिक लोक मानसिक आजारांनी ग्रस्त आहेत, आणि या संख्येत नैराश्य आणि चिंता विकार सर्वाधिक आहेत.

या गंभीर समस्येवर उपाय शोधण्यासाठी शासन, समाज, शाळा, महाविद्यालये, कुटुंबे आणि व्यक्तींनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे, उपचारांची उपलब्धता सुनिश्चित करणे, अंधश्रद्धा दूर करणे, आणि सकारात्मक मानसिक आरोग्याचा प्रचार करणे या सर्व गोष्टी आवश्यक पाऊले आहेत.

१० ऑक्टोबर रोजीचा जागतिक मानसिक आरोग्य दिन केवळ औपचारिक दिवस नसून, तो आपल्याला मानसिक आरोग्याच्या गंभीरतेची जाणीव करून देणारा आणि बदलासाठी प्रेरित करणारा दिवस आहे.

प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे, आजारांवर लवकर उपचार घेणे आणि समाजातील इतर व्यक्तींना प्रोत्साहन देणे यासाठी सजग राहणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याशिवाय आरोग्य नाही. (There is no health without mental health) ही जागतिक आरोग्य संघटनेची शिकवण आज आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक ठरते.

# भ्रष्टाचार डायन खाएं जात..
## (व्यंग्यात्मक कटाक्षपूर्ण विश्लेषण)

या काही दिवसांत मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये विषारी कफ सिरपमुळे एक डझनपेक्षा जास्त बालकांचे मृत्यू झाले आहेत. संपूर्ण देश हादरला आहे. सर्वत्र संताप व्यक्त होत आहे, चौकशी समित्या स्थापन केल्या जात आहेत, पत्रकार परिषदांमध्ये कारवाईचे मोठमोठे आश्वासन दिले जात आहे.

पण प्रश्न असा आहे – ही पहिलीच वेळ आहे का? नाही साहेब! ही तर आपल्या यंत्रणेची जुनी सवय आहे – आधी चूक करा, मग चौकशी समिती बनवा, काही दिवस लोकांचा राग सहन करा आणि मग परत तेच ढाकाचे तीन पात.

1986 मध्ये मुंबईत विषारी कफ सिरपमुळे 14 मुलांचा मृत्यू झाला, दिल्लीमध्ये 33 मुलांचा. 2020 मध्ये जम्मूमध्ये 12 बालकांनी प्राण गमावले. 2022 मध्ये भारतीय कफ सिरपमुळे गांबिया आणि उझबेकिस्तानमध्ये अनेक निरपराध मुलांचा बळी गेला. इतकेच नव्हे तर WHO लाही हस्तक्षेप करावा लागला. प्रत्येक वेळी ठोस कारवाईचे आश्वासन दिले गेले, प्रत्येक वेळी चौकशी झाली आणि प्रत्येक वेळी निकाल तोच, तातडीची कारवाई आणि नंतर सर्व थंड.

अलीकडेच कोल्ड्रिफ सिरपने राजस्थान, मध्य प्रदेशमध्ये हाहाकार माजवला. या सिरपमध्ये विषारी रसायन होतं की नाही – यावर परस्परविरोधी निवेदनं येत आहेत. पण हा विरोधाभास नवा नाही, हा तर सिस्टिमचा जुना आजार आहे.

केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटना (CDSCO) दर महिन्याला ड्रग अलर्ट जारी करते. ऑगस्ट 2025 मध्ये हिमाचल प्रदेशातील 31 कंपन्यांच्या 38 औषधांचे नमुने फेल झाले. उत्तराखंड, पंजाब, मध्य प्रदेशमधील 56 औषधे गुणवत्ता चाचणीत नापास झाली. जुलैमध्ये 143 नमुने फेल. जूनमध्ये 188 नमुने फेल.

यामध्ये बनावट औषधेही होती आणि सरकार म्हणते, सॅम्पल तर विशिष्ट बॅचचे होते, ते मागे घेण्यात आले. पण कोणीही सांगत नाही की मागे घेण्याआधी किती औषधे रुग्णांच्या रक्तात मिसळली होती!

आता ही गुणवत्तेची बीमारी केवळ औषधांपुरती मर्यादित नाही. थोडं रस्त्यांकडे पाहा, खड्डे वर्षभर सुट्टी न घेता ड्युटीवर असतात. पावसाळ्यात तर जणू त्यांना प्रमोशन मिळतं, छोटे खड्डे तलाव आणि मोठे खड्डे सरोवर बनतात.

इंग्रजांच्या काळात बांधलेले पूल आजही शंभर वर्षांनंतर मजबुतीने उभे आहेत. आणि आपले पूल? 15-20 वर्षांतच दुरुस्तीसाठी बंद किंवा कोसळण्याच्या प्रतीक्षेत असे फलक लावले जातात. काही पूल तर उद्घाटनाआधीच तडे जातात, जणू काम काही झालंच नाही, फक्त टेंडर आणि कमिशनचा खेळ झाला आहे.

स्वच्छतेबद्दल बोलायचं झालं तर स्वच्छ भारतचा नारा भिंतींवर झळकतो, पण नाल्यांमध्ये फेस आणि रस्त्यांवर कचरा हसत उभा असतो. कर्मचारी पगार वेळेवर घेतात, पण झाडू कदाचित मान्सून संपल्यावर चालतो. महानगरपालिकांमध्ये फाइल्सची स्वच्छता जबरदस्त असते पण रस्त्यांची स्वच्छता देवावर सोडलेली असते.

वाटतं पोलिस विभाग तरी नीट काम करत असेल, पण पोलिस विभागाची अवस्था कुणापासून लपलेली नाही. जर व्यवस्था खरंच प्रामाणिकपणे काम करत असेल तर गुन्हेगारांना रस्त्यावर पाय ठेवायचीही हिम्मत होणार नाही. पण वास्तवात बहुतेक वेळा पोलिस घटनास्थळी नंतर आणि कलेक्शन पॉइंटवर आधी पोहोचतात.

वाहतूक व्यवस्थेची अवस्था तर अजूनच गंमतीशीर आहे. झेब्रा क्रॉसिंग सजावटीसाठी असतात, सिग्नल रेड पेक्षा रेड मीटिंग पॉइंट अधिक असतो. दंड कमी, वसुली जास्त. नियम जनतेसाठी, अपवाद वरून फोन आलेल्यांसाठी.

असं वाटतं की भ्रष्टाचारानं सगळंच खाल्लं, कमीतकमी खाण्यापिण्याच्या गोष्टी तरी वाचल्या असतील, पण नाही – मसाले असोत, दूध, मिठाई किंवा पॅकेटबंद ड्रिंक्स – सगळ्यांचा स्वाद मिलावटीनं अजूनच वाढवला आहे. मानक आहेत, प्रयोगशाळा आहेत, नियम आहेत – पण त्यांचं पालन? जणू लग्नात खुर्ची लावलेली आहे पण बसलेला कोणीतरी दुसराच.

भारताने जेनेरिक औषधांमध्ये आपली ओळख निर्माण केली आहे, पण जर ही निकृष्ट दर्जाची औषधे आणि घटिया उत्पादन असंच चालू राहिलं, तर ही ओळख मिटायला वेळ लागणार नाही. स्वदेशीपासून आत्मनिर्भरतेच्या प्रवासात प्रत्येक उत्पादनात, प्रत्येक विभागात आणि प्रत्येक कामात विश्वासार्ह गुणवत्ता येईपर्यंत हा प्रवास अपूर्णच राहील.



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
9422125656
7020343428


गुणवत्ता आली नाही पण काही विभागांमध्ये बनावट रुग्णांना बनावट चिठ्ठ्या तयार करून औषधे जारी करणे आणि त्यातून मोठ्या रकमा गिळणे यात अधिकारी मागे नाहीत. शेवटी भ्रष्टाचाराची डायन कुणालाही सोडेल असं वाटत नाही, असा कोणता विभाग असेल जो यापासून वाचला असेल! प्रत्येकजण आज नाना प्रकारे पैसा जमा करण्यात मग्न आहे! आपल्या देशात मानक आहेत, कायदे आहेत, प्रयोगशाळा आहेत आणि शपथ घेणारे नेतेही आहेत. पण बांधकामासोबत भ्रष्टाचार जोडला गेला आहे, देखरेखीत व्यवहार घुसला आहे आणि जबाबदारी हवेत विरली आहे.

भ्रष्टाचार डायन खाएं जात.. – ही फक्त एक ओळ नाही, ही देशातील सध्याच्या गुणवत्तेची गोष्ट आहे. जोपर्यंत या डायनवर नियंत्रण मिळवले जाणार नाही, तोपर्यंत ना औषधे सुधारतील, ना रस्ते, ना सिस्टिम आणि तोपर्यंत विकासचे नारे भिंतींवर झळकत राहतील आणि खड्ड्यांमध्ये, रुग्णालयांमध्ये, बाजारात गुणवत्तेची प्रेते सडत राहतील. भ्रष्टाचार डायन खाऊन टाकते, देशाला बरबाद बनवते.

■ ■ ■

# बहुजन नायक कांशीराम : सामाजिक क्रांतीचे शिल्पकार

आज आपण अशा महान व्यक्तिमत्त्वाची जयंती साजरी करत आहोत, ज्यांनी भारताच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात बहुजन समाजाला नवसंजीवनी दिली. मान्यवर कांशीराम हे नाव दलित, वंचित आणि शोषित समाजाच्या न्यायासाठी लढणाऱ्या एका अजरामर योद्ध्याचे आहे.




१५ मार्च १९३४ रोजी पंजाबमध्ये जन्मलेल्या कांशीराम यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजकारणासाठी समर्पित केले. त्यांनी दलित समाजातील अस्मिता, आत्मसन्मान आणि राजकीय सशक्तीकरणाचा नवा अध्याय लिहिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीवर चालत, कांशीराम यांनी ती पुढे नेली आणि तिचे सामाजिक व राजकीय रूपांतर केले. कांशीराम यांची कार्यपद्धती ही सुसूत्र, टप्प्याटप्प्याने बदल घडवणारी होती. त्यांनी सर्वप्रथम BAMCEF (Backward and Minority Communities Employees Federation) ची स्थापना करून सुशिक्षित वंचित घटकांना एकत्र आणले. त्यानंतर DS4 (Dalit Shoshit Samaj Sangharsh Samiti) आणि पुढे बहुजन समाज पार्टी (BSP) च्या स्थापनेतून त्यांनी दलित राजकारणाला मुख्य प्रवाहात आणले.


त्यांचे ब्रीद होते, जो जितना शोषित है, वो उतना संगठित हो.
जिसकी जितनी संख्या भारी,
उसकी उतनी हिस्सेदारी
ही त्यांच्या विचारांची धार होती.

भारतीय राजकारणात केवळ उपस्थिती असून उपयोग नाही, तर सत्ता आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग असणे आवश्यक आहे, हे कांशीराम यांनी सिद्ध केले. त्यांनी दलित समाजाला वोट बँक न बनता शक्ती केंद्र बनवण्याचा मार्ग दाखवला.

त्यांच्या विचारांमुळेच उत्तर प्रदेशमध्ये बहुजन समाज पार्टी सत्तेवर आली आणि बहुजनांचे राजकीय सशक्तीकरण घडून आले. ही घटना भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण वळण ठरली.

आज जरी समाज तांत्रिकदृष्ट्या पुढे गेला असला, तरी जातीय अन्याय, सामाजिक विषमता, आरक्षणविरोधी मानसिकता यांसारख्या समस्या अजूनही टिकून आहेत.

अशा वेळी कांशीराम यांच्या विचारांची पुनःएकदा गरज आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानातून सामाजिक न्यायाची खरी दिशा मिळू शकते.



प्रमोद जांभुळकर
नागपूर.
९८२३९६९०९७

मान्यवर कांशीराम हे केवळ एक नेते नव्हते, तर सामाजिक क्रांतीचे शिल्पकार होते. त्यांच्या कार्यातून व विचारातून आजही लाखो लोक प्रेरणा घेत आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ कार्यक्रम साजरे न करता, त्यांच्या ध्येयांना प्रत्यक्षात उतरवण्याचा संकल्प करूया.

■ ■ ■

# जेन-झीचे मन कसे जिंकाल?

एका एरवी शांत असलेल्या डोंगराळ देशात झालेल्या ?बंडामुळे जगाला सर्वात शक्तिशाली सामाजिक ?गटाबद्दल विचार करण्यास भाग पाडले. हा गट आहे जेन-झी. नेपाळमध्ये सरकार उलथून टाकणारी अलीकडची निदर्शने यासाठी झाली, त्याचे कारण की युवा पिढीने आंदोलनाची सूत्रे हाती घेतली होती. आणि तेही यासाठी, कारण सरकारने त्यांची इंटरनेट सुविधा बंद केली होती. याचा धडा हाच की, तरुणांपासून इंटरनेट सुविधा कधीही हिसकावून घेऊ नका.

भारतातही तज्ज्ञ हे समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत की आपल्या देशातील जेन-झी काय करत आहेत? आणि पुढे काय करेल. १९९७ आणि २०१२ दरम्यान ?जन्मलेल्या तरुणांना जेन-झी मानले जाते. आज हे १३ ते २८ वर्षांचे तरुण आहेत. निर्णय घेण्याच्या क्षमतेबद्दल त्यांना अनेकदा गांभीर्याने घेतले जात नाही, तरीही ब्रँड्स, मनोरंजन क्षेत्रातील व्यक्ती, मीडियातील व्यक्ती, विविध घटक त्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात.

राहुल गांधींचा जेन-झीपर्यंत थेट पोहोचण्याचा हाय-प्रोफाइल प्रयत्न सर्वात नवीन आहे. भारताच्या लोकसंख्येत जेन-झी केवळ संख्येने मोठे नाहीत, तर ते डिजिटल-कनेक्टेडदेखील आहेत. ते इन्स्टाग्राम, रेडिट, डिस्कोर्ड, एक्स वर एकमेकांशी बोलत असतात. मोठे बदल घडवण्याची क्षमता त्यांच्यात आहे.

खरे पाहता, ब्रँड्स किंवा राजकारण्यांसाठी जेन-झी चे ?मन जिंकणं सोपं नाही. काहींनी असे प्रयत्न केले, पण ?अयशस्वी झाले. काहींनी तर जेन-झीचा राग ओढवून घेतला आणि जेन-झीचा राग खूप मोठा असतो. ते तुमचे मीम्स बनवतील, तुम्हाला रद्द (कॅन्सल) करतील, तुमचे व्यवसाय मॉडेल नष्ट करतील, निवडणुकांमध्ये पराभूत करतील, सिनेमे फ्लॉप करतील आणि जसे नेपाळमध्ये झाले, सरकार उलथून टाकतील. जेन-झी कोड क्रॅक करण्याची कोणतीही गुरुकिल्ली नाही. पण कुणी असा प्रयत्न करू इच्छित असेल, तर ही मार्गदर्शक तत्त्वे.

**त्यांच्या बुद्धिमत्तेचा आदर करा:** जेन-झी गुगलसोबत मोठे झाले आहेत. त्यांच्याकडे चॅटजीपीटीही आहे. ते समस्या लवकर सोडवण्यावर बुद्धी खर्च करतात. अनेक गोष्टींसाठी ते इंटरनेटचा उपयोग करतात.

**वास्तविक राहा :** राजकारण्यांनीही जेन-झी प्रति केवळ दिखावा आणि पोकळ प्रतीकात्मकतेपासून सावध राहायला हवे. नुसतेतरुणांसारखे कपडे घालणे, टीकात्मक बोलणे आणि मला तरुण लोक आवडतात असे म्हणण्याने त्यांचं मन जिंकता येणार नाही.

**त्यांच्याशी बोला, ज्ञान देऊ नका :** जुन्या पिढीच्या लोकांना उपदेश करण्याची सवय असते. पण जसं२जेन-झीला वाटतं की हे एकतर्फी भाषण आहे, तसे ते लक्ष देणे बंद करतात. जर तुम्हाला त्यांच्याशी जोडल जायचे असेल, तर ज्ञान वाटू नका.


**पुरोगामी बना:** बहुतेक वयस्कर भारतीय अशा रूढिवादी मूल्यांमध्ये अडकले आहेत, जे जेन-झीसाठी महत्त्वाचे नाहीत. पण जेन-झीची स्वतःची मूल्य-प्रणाली आहे, जी अधिक समावेशक आणि भविष्याभिमुख आहे. रूढिवादी राहून तुम्ही त्यांचे मनजिंकू शकत नाही.

**जेन-झीची भाषा बोला:** ही हिंदी, इंग्रजी किंवा कोणती स्थानिक भाषा नाही, ही डिजिटल भाषा आहे.जर तुम्हाला जेन-झीशी कनेक्ट व्हायचे असेल, तर तुम्हाला ही भाषा येणे आवश्यक आहे. जर तुम्ही ती बोलू शकत नसाल, तर जेन-झीला विसरून जा.

**विनोदाचा वापर करा:** जेन-झीला मीम्स, व्यंग्यआणि हास्य आवडते. तुम्ही स्वतःवर हसू शकत असाल, तर ते तुम्हाला पसंत करतील. पण तुम्ही त्यांना घाबरवण्याचा, नियंत्रित करण्याचा किंवा त्यांचे मतफेटाळण्याचा प्रयत्न केला, तर ते तुमच्यावर टीका करतील. त्यामुळे जेन झीला समजून घ्या.

■ ■ ■

# चहासोबत किंवा चहा प्यायल्यानंतर चुकूनही खाऊ नका हे ५ पदार्थ



बरेच लोक दिवसाची सुरुवात चहाने करतात. चहासाठी लोक वेडे असतात. तसेच काहींना फक्त चहासोबत खायलाही आवडतं.

अनेकजण फरसाण, बिस्किट किंवा अनेक प्रकारचे स्नॅक्स खातात. किंवा काहींना चहा झाला की लगेच नाश्ता करण्याची किंवा काहीतरी स्नॅक्स खाण्याची सवय असते. पण ही गोष्ट फार कमी जणांना माहित असेल की चहासोबत किंवा चहा प्यायल्यानंतर काही पदार्थांचे सेवन करणे आरोग्य बिघडवू शकते.

चहासोबत काय खाऊ नये?

**लिंबू :** काहींना कोरा चहा पिताना त्यात लिंबाचा रस घालतात. पण खरंतर चहामध्ये लिंबू घातल्याने आम्लपित्त आणि अपचन जास्त होऊ शकते. लिंबूमधील आम्ल चहामध्ये मिसळून गॅस आणि छातीत जळजळ होऊ शकते.

**बेसन उत्पादने :** चहासोबत बेसनाचे पदार्थ, जसे की फाफडा, कोणतेही फरसान किंवा स्नॅक्स खाल्ल्याने पोटात जडपणा जाणवू शकतो. बेसन पचायला थोडे जड असते आणि चहासोबत घेतल्यास ते पचनक्रिया मंदावते.

**थंड पदार्थ :** चहा प्यायल्यानंतर लगेचच आईस्क्रीम किंवा दहीसारखे थंड आणि आंबट पदार्थ खाऊ नये. त्याचा पचनक्रियेवर परिणाम होऊ शकतो. चहा गरम असतो त्यानंतर लगेच थंड पदार्थांचे किंवा आंबट पदार्थाचे सेवन केल्यास पोटाचे आरोग्य बिघडू शकते.

**लोहयुक्त पदार्थ :** चहामध्ये टॅनिन असते, जे लोहाचे शोषण कमी करते. म्हणून, पालक किंवा हिरव्या भाज्यांसारखे लोहयुक्त पदार्थ चहासोबत खाऊ नयेत.

**हळद :** चहासोबत हळद खाल्ल्याने ॲसिडिटी आणि गॅस होऊ शकतो. हळद आणि चहा दोन्हीही उष्ण स्वभावाचे असतात, त्यामुळे त्यांचे एकत्र सेवन केल्याने पोटात जळजळ होऊ शकते.

**चहासोबत हे खाणे टाळा**

चहामध्ये लिंबू घालणे टाळा. बेसनापासून बनवलेल्या वस्तू खाऊ नका. चहा प्यायल्यानंतर लगेच थंड पदार्थांचे सेवन करू नका. हळदीच्या चहासोबत लोहयुक्त पदार्थ खाऊ नका.

दरम्यान काहींना जेवण झाल्यावरही चहा पिण्याती तलफ येते. पण असे करणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. कारण त्यामुळे खाल्लेल्या अन्नाचे पचन होणार नाही. तसेच अनेकांना जर सतत किंवा दिवसांतून खूपदा चहा घेण्याची सवय असेल तर ती कमी करणे गरजेचे आहे. चांगल्या आरोग्यासाठी एवढे नक्की करा.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### दखल

दगडालाही
देवपण येण्यासाठी
सोसावे लागती घाव
तसचं स्वतःचं वलय
निर्माण करण्यासाठी
झिझावं लागतं राव..!

कळपात चालणाऱ्या
मेंढ्यांचे कुणालाच
वाटत नाही नवल
पण हटके पाऊलवाट
निर्माण करणाऱ्यांची
दुनिया घेतेच ना दखल..!

उच्चध्येय
अथक परिश्रमानेच
होत असते स्वप्नपुर्ती
याची अनंत उदाहरणे
आहेत भुवरती ..!

## वाचक लिहितात
# कफ सिरपमुळे बालमृत्यू : औषधनिर्मितीतील निष्काळजीपणा...

राजस्थान आणि मध्यप्रदेश या राज्यांत कफ सिरपच्या सेवनानंतर लहान मुलांचा जीव गेला. या घटनेने संपूर्ण देश हादरला आहे. यानंतर केंद्र सरकारने २ वर्षांखालील मुलांना कफ सिरप देण्यावर तात्पुरती बंदी घातली आहे. मध्यप्रदेश आणि तमिळनाडू राज्यांतील सरकारांनी कफ सिरपवर पूर्ण बंदी घातली आहे. मध्यप्रदेशातील पोलिसांनी संबंधित कफ सिरपच्या आस्थापनांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

या घटनेतून औषध बनविणाऱ्या आस्थापनांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारताला फार्मसी ऑफ द वर्ल्ड असे म्हटले जाते. आपला देश जगातील सर्वांत मोठा जेनेरिक औषध उत्पादक देश आहे आणि जागतिक स्तरावर सर्वाधिक लसींचा पुरवठा आपल्या देशातून केला जातो.

या पार्श्वभूमीवर जर अशा गंभीर घटना आपल्या देशात घडत असतील, तर हे औषध बनविणाऱ्या आस्थापनांचे अपयश आहे की जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी केलेला भ्रष्टाचार आहे, असा प्रश्न निर्माण होतो. काही महिन्यांपूर्वी आफ्रिका खंडातील गांबिया देशात भारतीय आस्थापनांच्या कफ सिरपमुळे ७०, तर कॅमेरूनमध्ये ६ आणि उझबेकिस्तान येथे १८ मुलांचा मृत्यू झाला होता.

अशा घटना घडण्यामागे भेसळ, अल्प गुणवत्तेच्या कच्च्या मालाचा वापर आणि भ्रष्टाचार या गोष्टी कारणीभूत असल्याचे नंतर समोर आले. या घटनेनंतर जर भारत सरकारने सतर्क होऊन कफ सिरपच्या निर्मितीवर आणि विक्रीवर लक्ष ठेवले असते, तसेच दोषी आस्थापनांविरुद्ध कठोर कारवाई केली असती, तर ही घटना घडली नसती.

म्हणून आता केवळ कफ सिरपच नव्हे, तर प्रत्येक औषधाची कठोरपणे पडताळणी सरकारने करावी, अशी जनतेची अपेक्षा आहे. तसेच पालकांनीही औषध देताना त्याचे आस्थापन, उत्पादन तारीख आणि डॉक्टरांचा सल्ला हे नक्की तपासून घ्यावे. सुरक्षित औषधनिर्मिती आणि अशा घटनांविरुद्ध कठोर कारवाई याद्वारे भविष्यातील पिढीचे आरोग्य सुरक्षित राहील.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.

# कोटकने अलीकडेच सादर केलेल्या कोटक गोल्ड सिल्व्हर पॅसिव्ह एफओएफ सह दोन धातूंच्या क्षमता खुल्या करा

**मुंबई, ९ ऑक्टोबर :** कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड ने कोटक गोल्ड सिल्व्हर पॅसिव्ह एफओएफ च्या शुभारंभाची सहर्ष घोषणा केली आहे. ही कोटक गोल्ड ईटीएफ आणि कोटक सिल्व्हर ईटीएफ च्या युनिट्समध्ये गुंतवणूक करणारी एक ओपन-एंडेड फंड ऑफ फंड स्कीम आहे. कोटक गोल्ड ईटीएफ आणि कोटक सिल्व्हर ईटीएफ च्या युनिट्समध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन भांडवलवृद्धी देण्याचा या नावीन्यपूर्ण फंडचा हेतू आहे, शिवाय गुंतवणूकदारांना सोने आणि चांदी या दोन मौल्यवान धातूंपर्यंत पोहोच देखील मिळेल. ही स्कीम सार्वजनिक सब्स्क्रिप्शनसाठी ६ ऑक्टोबर २०२५ रोजी उघडून २० ऑक्टोबर २०२५ रोजी बंद होईल.

कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर निलेश शाह म्हणाले, ॲसेट ॲलोकेशन प्रत्येक पिचसाठी सुयोग्य खेळाडू निवडण्यासारखे असते. बाजारात जेव्हा तेजी असते तेव्हा सोने आणि चांदी नेहमी पोर्टफोलियोमध्ये एखाद्या ऑलराऊंडरची भूमिका बजावत असतात. केंद्रीय बँका आपला सुवर्ण संग्रह वाढवत आहेत आणि औद्योगिक संदर्भात चांदीची मागणी वाढत आहे, तर दुसरीकडे इक्विटी मार्केट अस्थिर आहे, अशावेळी, गुंतवणूकदारांनी या धातूंमधून जास्तत जास्त लाभ मिळवला पाहिजे. मौल्यवान धातू पोर्टफोलियोमध्ये जोडण्याचा अर्थ सुसाट धावणे नाही, तर सर्व मोसमांसाठी एक लवचिक टीम उभी करणे असा आहे. कोटक गोल्ड सिल्व्हर पॅसिव्ह एफओएफ केवळ एकाच परिमाणावर डाव न लावता विविधता आणण्याचा एक शिस्तबद्ध मार्ग प्रदान करते. कारण, गुंतवणूकीत अती आत्मविश्वासाने नाही तर योग्य मिश्रण आणि सातत्य यांच्या मदतीने सामना जिंकता येतो.

हा फंड अशा गुंतवणूकदारांसाठी डिझाईन करण्यात आला आहे, ज्यांना सोने आणि चांदीत गुंतवणूक करून दीर्घकालीन भांडवल वृद्धी करण्याची इच्छा आहे. ज्यांना, खास करून व्यापक आर्थिक अनिश्चिततेच्या काळात आपल्या पोर्टफोलियोत पारंपरिक इक्विटी आणि डेट इन्स्ट्रुमेंट्सच्या पलीकडे जाऊन विविधता आणायची इच्छा आहे त्यांच्यासाठी तो अनुकूल आहे. स्वतंत्र ईटीएफ मध्ये गुंतवणूक केल्यास सोने आणि चांदीत पुनर्संतुलन करताना कॅपिटल गेन टॅक्स लागू शकतो, त्याऐवजी हा फंड आंतरिकरित्या वाटप करतो आणि सोने आणि चांदी यांच्यात अदलाबदली करताना कॅपिटल गेन टॅक्स आकर्षित न करता दोन्ही धातूंपर्यंत पोहोचण्याचा मार्ग ऑफर करतो.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून २०२५ फॉर्च्युनर लीडर एडिशन लाँच




**बेंगलुरू, ९ ऑक्टोबर :** २०२४ लीडर एडिशनच्या यशाला अधिक पुढे घेऊन जात टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) २०२५ फॉर्च्युनर लीडर एडिशनच्या लाँचसह अधिक आकर्षक प्रभाव पाडण्यास सज्ज आहे. सुधारित स्टायलिंग व प्रीमियम सुधारणांसह ही नवीन एडिशन रस्त्यावर फॉर्च्युनरच्या आकर्षक उपस्थितीला अधिक ठळकपणे दर्शवते, तसेच ग्राहकांना स्पोर्टीयर आणि अधिक गतीशील अपील देते. नवीन फॉर्च्युनर लीडर एडिशन अद्वितीय कार्यक्षमतेसह समकालीन स्टायलिंगचा शोध घेत असलेल्या एसयूव्हीप्रेमींच्या महत्त्वाकांक्षांची पूर्तता करण्यासाठी काळजीपूर्वक डिझाइन करण्यात आली आहे. फॉर्च्युनरच्या वारसाशी बांधील राहत लीडर एडिशन सर्वोत्तम कार्यक्षमता, विश्वसनीय ऑफ-रोड क्षमता आणि २.८ लिटर डिझेल इंजिनच्या शक्तीसह अपवादात्मक ड्राइव्ह आरामदायीपणा देते.

या लाँचबाबत मत व्यक्त करत टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या सेल्स-सर्विस-युज्ड कार बिझनेसचे उपाध्यक्ष श्री. वरिंदर वाधवा म्हणाले, ''टोयोटामध्ये आम्हाला आमच्या ग्राहकांचे सर्वसमावेशक जीवनशैली प्राधान्यक्रम आमच्या ऑफरिंग्ज नवीन व उत्साहित करत राहण्यास प्रेरित करतात. आम्ही २०२४ फॉर्च्युनर लीडर एडिशनला दिलेली चांगली स्वीकृती व उत्साहपूर्ण प्रतिसादासाठी कृतज्ञ आहोत, ज्यामुळे भारतातील रस्त्यांवर आयकॉन म्हणून एसयूव्हीचा दर्जा अधिक प्रबळ झाला आहे. या विश्वासामधून प्रेरणा घेत आम्हाला २०२५ फॉर्च्युनर लीडर एडिशन लाँच करण्याचा आनंद होत आहे. ही वेईकल स्पोर्टियर, अधिक गतीशील एसयूव्हीचा शोध घेणाऱ्यांसाठी आहे. आम्हाला विश्वास आहे की, ही नवीन एडिशन ग्राहकांना अधिक आनंदित करेल आणि प्रीमियम एसयूव्ही श्रेणीमध्ये मापदंड म्हणून फॉर्च्युनरचा दर्जा अधिक दृढ करेल.''

अनेक नवीन स्टायलिंग घटक जसे नवीन ग्रिल डिझाइनसह फ्रण्ट व रिअर बम्पर स्पॉयलस्ट आणि क्रोम गार्निश २०२५ फॉर्च्युनर लीडर एडिशनच्या आयकॉनिक दर्जामध्ये अधिक भर करतात. काळ्या रंगामधील ड्युअल-टोन रूफ नवीन फॉर्च्युनरच्या प्रीमियममध्ये अधिक आकर्षकतेची भर करते आणि वेईकलची साहसी विशिष्टता वाढवते. काळ्या रंगामधील चकाकणारे अलॉई व्हील्स आणि विशिष्ट हुड एम्बलेम प्रत्येक प्रवासादरम्यान लक्षवेधक उपस्थितीची खात्री देतात.

## डेल टेक्नॉलॉजीजने भारतात दोन नवीन डेल प्रो लॅपटॉप्स लॉन्च



नागपूर, ९ ऑक्टोबर : डेल टेक्नॉलॉजीजने आज भारतात दोन नवीन डेल प्रो लॅपटॉप्स डेल प्रो १४ इसेंशियल आणि डेल प्रो १५ इसेंशियल लॉन्च केले आहेत. हे लॅपटॉप्स सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एसएमबी ) गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहेत. ते विश्वसनीय कार्यक्षमता, टिकाऊपणा आणि दीर्घ बॅटरी आयुष्य परवडणाऱ्या किंमतीत प्रदान करतात. या उत्पादनांमुळे वितरक आणि भागीदारांना विविध क्षेत्रांतील आणि उद्योगांतील ग्राहकांच्या विशिष्ट व्यावसायिक गरजांनुसार सानुकूलित उपाय देण्यास मदत होईल.

नवीन डेल प्रो १४ इसेंशियल आणि प्रो १५ इसेंशियल लॅपटॉप्स सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांसाठी आयटी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी डिझाइन केले गेले आहेत. या लॅपटॉप्समध्ये एकात्मिक सुरक्षा, सुलभ व्यवस्थापनक्षमता आणि विश्वसनीय कार्यक्षमता अशा वैशिष्ट्यांचा समावेश आहे. तसेच, डेल मॅनेजमेंट पोर्टलच्या माध्यमातून ते क्लाउड-आधारित फ्लीट व्यवस्थापन आणि अनुप्रयोग प्रकाशित करण्याची सुविधाही देतात.

लाँचविषयी बोलताना इंद्रजीत बेलगुंडी, वरिष्ठ संचालक आणि महाव्यवस्थापक, क्लायंट सोल्यूशन्स ग्रुप, डेल टेक्नॉलॉजीज इंडिया, म्हणाले, भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एसएमबी) वेगाने बदलणाऱ्या जगात पुढे जात आहेत आणि योग्य तंत्रज्ञान त्यांच्यासाठी खऱ्या अर्थाने गेम-चेंजर ठरू शकते. नवीन डेल प्रो १४ इसेंशियल आणि प्रो १५ इसेंशियल लॅपटॉप्सद्वारे आम्ही परवडणारे आणि व्यवसायास अनुकूल उपाय देत आहोत, जे सुरक्षितता आणि सुलभ आयटी व्यवस्थापन यावर आधारित आहेत. हे उपकरणे उत्पादकता वाढवण्यासाठी तयार करण्यात आली आहेत, ज्यातून दीर्घकालीन यशाला पाठिंबा देण्यासाठी तयार करण्यात आली आहेत, ज्यातून आमचा ग्राहकांच्या वाढीच्या प्रवासातील विश्वसनीय भागीदार राहण्याचा संकल्प अधिक दृढ होतो. या नवीन उत्पादनांद्वारे आम्ही प्रत्येक किंमत श्रेणीत उत्कृष्ट मूल्य देत आहोत, ज्यामुळे आमचे ग्राहक आणि भागीदार यांना त्यांच्या गरजांनुसार सर्वोत्तम उपाय उपलब्ध होऊ शकतात.

## झी टीव्हीवरील कलाकारांनी करवा चौथबद्दल आपले विचार मांडले!

**मुंबई, ९ ऑक्टोबर :** करवा चौथ, भारतातील सर्वात प्रिय सणांपैकी एक, विवाहित जोडप्यांसाठी विशेष महत्त्व राखतो. हा दिवस प्रेम, श्रद्धा आणि निष्ठेची सुंदर अभिव्यक्ती आहे कारण विवाहित महिला पारंपारिकरित्या सूर्योदयापासून चंद्रोदयापर्यंत उपवास करतात, आपल्या पतीच्या दीर्घायुष्य आणि समृद्धीसाठी प्रार्थना करतात. करवा चौथ केवळ एक विधी नाही तर तो जोडीदारांमधील पवित्र नाते आणि त्यांच्या नात्याची ताकद साजरी करण्याचा उत्सव आहे. वर्षानुवर्षे हा सण सुंदरपणे विकसित झाला आहे.

आजकाल अनेक पुरुषही आपल्या पत्नीसोबत उपवास करण्याचा पर्याय निवडतात, जो परस्पर सन्मान, प्रेम आणि समतेचे प्रतीक आहे. जे पूर्वी एकतर्फी विधी म्हणून पाहिले जात असे, ते आता भक्तीची सामायिक अभिव्यक्ती बनली आहे, जिथे दोन्ही जोडीदार एकमेकांच्या कल्याण आणि आनंदासाठी प्रार्थना करतात.

झी टीव्हीवरील कलाकार आर्य बब्बर (जागृति एक नयी सुबह) म्हणाला, माझ्यासाठी हा फक्त विधी नव्हे, तर त्यामागील भावना महत्वाच्या आहेत. हा सण आपला नाते मजबूत करतो आणि आपण एकत्र बांधलेले प्रेम दर्शवतो. जेव्हा ती शेवटी चंद्र पाहून उपवास तोडते, तो क्षण नेहमीच जादुई वाटतो. (जाने अनजाने हम मिले) मधील आयुषी खुराणा कक्कड ने सांगितले, यावर्षी माझ्या लग्नानंतर पहिल्या करवा चौथाची सुरुवात करताना, मला एक वेगळी उत्सुकता आणि भक्तीचा अनुभव होतोय. हा दिवस खरोखरच प्रेम आणि निष्ठेचा अर्थ उलगडतो आणि मला या प्रिय परंपरेचा भाग होण्याचा खूप छान वाटतंय. आणि परिणीता बोरठाकूर (वसुधा) म्हणाल्या, करवा चौथ माझ्यासाठी नेहमीच सर्वात सुंदर आणि अर्थपूर्ण सणांपैकी एक राहिला आहे. हा फक्त एक विधी नाही, तर प्रेम, विश्वास आणि जोडीदार म्हणून आपण जे नाते सामायिक करतो त्याचा हृदयस्पर्शी उत्सव आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन केले



**नवी मुंबई, ९ ऑक्टोबर :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एनएमआयए) याचे उद्घाटन केले. हा देशातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांपैकी एक असून भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रातील एक निर्णायक टप्पा ठरला आहे.

या प्रसंगी पंतप्रधान म्हणाले, मुंबईचा अनेक वर्षांचा प्रतीक्षेचा क्षण आज पूर्ण झाला आहे. आता मुंबईला तिचा दुसरा आंतरराष्ट्रीय विमानतळ मिळाला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ संपूर्ण या परिसराला आशियातील सर्वात मोठा कनेक्टिव्हिटी हब बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

ते पुढे म्हणाले, हे विमानतळ विकसित भारत या संकल्पनेचे जिवंत उदाहरण आहे. ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीवर उभे आहे आणि त्याचे कमळ-प्रेरित डिझाइन आपल्या संस्कृती आणि समृद्धीचे प्रतीक आहे. हे विमानतळ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना थेट युरोप आणि मध्य पूर्वेतील सुपरमार्केट्सशी जोडेल, ज्यामुळे आपल्या शेतकरी, मच्छीमार आणि बागायती उत्पादकांचा ताजा माल जागतिक बाजारात जलद पोहोचेल. तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी वाहतूक खर्च कमी होईल आणि नव्या गुंतवणूकी व उद्योगांसाठी संधी निर्माण होतील. महाराष्ट्र आणि मुंबईतील सर्व नागरिकांना या विमानतळाच्या उद्घाटनाबद्दल मी हार्दिक शुभेच्छा देतो.

अदाणी समूहाचे चेअरमन गौतम अदाणी म्हणाले, हा केवळ एक विमानतळ नाही, तर भारताला जागतिक प्रवेशद्वार म्हणून उभे करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे. हे इन्फ्रास्ट्रक्चर आजच्या गरजा पूर्ण करत असतानाच, पुढील अनेक दशकांसाठी संधी निर्माण करते. हा विमानतळ केवळ प्रवासांना नव्हे, तर एका उभरत्या महासत्तेची धडधड, स्वप्ने आणि आकांक्षा घेऊन पुढे जाईल.

अदाणी एअरपोर्ट्स होल्डिंग्स लिमिटेडचे संचालक जीत अदाणी म्हणाले, एनएमआयए हा भारताच्या विमान वाहतूक प्रवासातील एक माइलस्टोन आहे, जो आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रवासी अनुभवाचा सुंदर संगम आहे. हा छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाला पूरक ठरून मुंबईला जागतिक एव्हिएशन हब म्हणून अधिक मजबूत करतो.

## नागपूर येथील मॅक्स हॉस्पिटलने ५९ वर्षीय महिलेवर एकाचवेळी हिप आणि गुडघ्याची रोबोटिक शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केली



**नागपूर, ९ ऑक्टोबर :** मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर येथील डॉक्टरांनी मध्य प्रदेशातील ५९ वर्षीय महिलेला वर्षानुवर्षे असलेल्या वेदना आणि हालचालींच्या त्रासातून मुक्त करत एकाचवेळी रोबोटिक पद्धतीने हिप आणि गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली.

ही शस्त्रक्रिया मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर येथील जॉइंट रिप्लेसमेंट, आर्थ्रोस्कोपी आणि कॉम्प्लेक्स ट्रॉमा सर्जरी विभागाचे संचालक डॉ. मनोज पाहुकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अत्याधुनिक कोरी रोबोटिक सर्जिकल सिस्टिमच्या मदतीने केलेल्या या शस्त्रक्रियेमुळे अचूकता वाढली, चिरे लहान मारले गेले आणि ऊतकांचे नुकसानही कमी झाले.

रुग्ण गेल्या चार वर्षांपासून गंभीर द्विपक्षीय ऑस्टिओआर्थ्रायटिसने त्रस्त होती, तिचा डावा हिप आणि उजवा गुडघा पूर्णपणे झिजलेला होता. तिची प्रकृती लठ्ठपणा, टाइप २ मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांसारख्या एकाहून अधिक आजारांमुळे अधिक गुंतागुंतीची झाली होती, ज्यामुळे ती शस्त्रक्रियेसाठी उच्च-धोका गटातील रुग्ण ठरली होती. चालण्यासाठी तिला वॉकरचा आधार घ्यावा लागत होता आणि दैनंदिन जीवनातील अगदी मूलभूत कामे करणेही कठीण झाले होते. पारंपरिक उपचारांनी काहीही आराम मिळाला नाही. प्रगत उपचार पर्याय शोधत रुग्णाच्या कुटुंबाने नागपूरमधील मॅक्स हॉस्पिटलमधील तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचा निर्णय घेतला.

सामान्यतः सांध्यांचे प्रत्यारोपण पारंपरिक पद्धतीने एकावेळी फक्त एका सांध्यावर केले जाते; मात्र या केसमध्ये, सखोल तपासणीनंतर, डॉ. मनोज पाहुकर यांनी रुग्णाच्या प्रकृतीनुसार कोरी रोबोटिक सर्जिकल सिस्टम्सच्या मदतीने एकाचवेळी टोटल हिप आर्थ्रोप्लास्टी आणि टोटल नी आर्थ्रोप्लास्टी करण्याचा निर्णय घेतला. रुग्णाच्या आरोग्यस्थितीसाठी ही पद्धत सर्वात योग्य ठरली.

या केसबद्दल बोलताना डॉ. मनोज पाहुकर, संचालक, ऑर्थोपेडिक्स, मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर म्हणाले, रोबोटिक तंत्रज्ञान आणि एन्हान्स्ड रिकव्हरी पद्धतींचा वापर केल्यामुळे आम्ही उच्च-धोका असलेल्या रुग्णाचे जीवन पूर्णतः बदलू शकलो. शस्त्रक्रियेनंतर फक्त १२ तासांतच रुग्णाला मदत घेऊन चालता आले. चौथ्या दिवशी तिला डिस्चार्ज देण्यात आला. केवळ सहा आठवड्यांत ती स्वतःच, वेदनारहित चालू लागली आणि तिने आपली दैनंदिन दिनचर्या पुन्हा सुरू केली. ही पद्धत गंभीर सांध्यांच्या समस्या असलेल्या रुग्णांसाठी नवीन आशेचा किरण आहे.

ही ऐतिहासिक शस्त्रक्रिया केवळ रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट तंत्रज्ञानाच्या बदल घडवणाऱ्या क्षमतेला अधोरेखित करत नाही, तर मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूरला प्रगत ऑर्थोपेडिक उपचार क्षेत्रातील आघाडीचे केंद्र म्हणून पुन्हा सिद्ध करते.

## एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री कशाप्रकारे करवा चौथ साजरा करतात, याबाबत सांगत आहेत!

**मुंबई, ९ ऑक्टोबर :** प्रेम, विश्वास आणि विवाहाच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेला करवा चौथ सण लवकरच साजरा केला जाणार आहे. विवाहित महिला पतीच्या उत्तम स्वास्थ्यासाठी पारंपारिकरित्या सूर्योदयापासून चंद्रोदयापर्यंत उपवास करतात, चंद्र पाहिल्यानंतर उपवास सोडतात. एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री हा खास दिवस आणि त्यांच्यासाठी अर्थपूर्ण असलेल्या प्रथेसाठी कशाप्रकारे तयारी करतात याबाबत सांगत आहेत. या अभिनेत्री आहेत सपना सिकरवार (बिमलेश, 'हप्पू की उलटन पलटन') म्हणाल्या, ''करवा चौथचे माझ्या मनात नेहमी खास स्थान आहे. शूटिंगचे वेळापत्रक कितीही व्यस्त असले तरी मी ही प्रथा कधीच चुकवत नाही, ज्यामुळे हा दिवस अधिक खास आहे. पहाटे सूर्योदयापूर्वी सार्गीसह सुरुवात होते, जी माझी सासू प्रेमाने बनवते. हे मला प्रत्येक पिढीमधील महिलांशी संलग्न असल्याची भावना देतो, ज्यांनी माझ्यापूर्वी हा सण साजरा केला आहे. मला पारंपारिकरित्या लाल रंगाची साडी नेसायला आवडते, तसेच माझ्या हातांवर आकर्षक मेहंदी काढते. माझे पती नेहमी या दिवसाला खास बनवतात. एकदा, त्यांनी माला चंद्राच्या दर्शनासाठी आमची बाल्कनी दिवे व फुलांसह सजवत आश्चर्यचकित केले.'' आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर है') म्हणाल्या, ''यंदा, करवा चौथ माझ्यासाठी अधिक खास आहे, कारण माझे पती सयक दीर्घकाळानंतर माझ्यासोबत असणार आहेत. मी या दिवसाची तयारी आधीच सुरू केली आहे आणि पेस्टल सिल्क साडीसह पारंपारिक दागिन्यांची निवड केली आहे. मी घरी स्वतः माझ्या हातांवर मेहंदी काढणार आहे, मला आजही आमचे पूर्वीचे करवा चौथ आठवतात, जेथे सयकने मला सुरेख इअररिंग्स देत आश्चर्यचकित केले होते, जे मी अनेक महिन्यांपासून पाहत होते. ते फक्त गिफ्ट नव्हते तर त्यामध्ये सामावलेल्या भावनेने माझ्या मनाला स्पर्श केला.''

## सुंदर आठवणींपासून ते धार्मिक विधींपर्यंत: सोनी सबवरील कलाकार सांगत आहेत, करवा चौथ का त्यांच्यासाठी खास आहे!




**मुंबई, ९ ऑक्टोबर :** करवा चौथ एक असे पर्व आहे, ज्यात परंपरा आणि भावना यांचा सुंदर संगम आहे. या दिवशी धार्मिक विधी आणि भक्तीभाव एकत्र येतात आणि चांदण्या रात्री प्रेम साजरे केले जाते. या दिवशी सुवासिनी मेंदी लावतात, पहाटेसाठी सरगीची तयारी करतात आणि मग प्रेम आणि भक्तीने ओतप्रोत मनाने चंद्रोदय होण्याची प्रतीक्षा करतात. देशभरात, खास करून उत्तर भारतात महिला हा सोहळा खूप उत्साहाने आणि आनंदाने साजरा करतात. सोनी सबवरील महिला कलाकार- श्रेनु परिख, करुणा पांडे, वृंदा त्रिवेदी आणि गौरी टोंक या पर्वाशी निगडीत आपल्या सुंदर आठवणींना उजाळा देत आहेत आणि करवा चौथचे महत्त्व सांगत आहेत. या सणाशी असलेले त्यांचे वैयक्तिक नाते कसे आहे, याची ही एक झलक-

गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मालिकेत पार्वतीची भूमिका करणारी श्रेनु परीख म्हणते, मी स्वतः गुजराती असून मराठी घरात लग्न केले असल्याने करवा चौथ हा आमच्या परंपरेचा भाग कधीच नव्हता, पण मला या पर्वाची भावना खूप आवडते. माझ्या अनेक मैत्रिणी या दिवशी अत्यंत उत्साहाने आणि प्रेमाने उपवास करतात आणि ती ऊर्जा कशी ती माझ्या मनात दिसते. माझ्यासाठी, धार्मिक विधीपेक्षा सगळ्यांनी एकत्र येऊन, आनंदाने सण साजरा करण्याचा क्षण अधिक खास असतो. त्यासाठी तयार होणे असो, दिवसभर एकमेकांची थट्टा-मस्करी करणे असो किंवा चंद्राची प्रतीक्षा करणे असो, या सगळ्या छोट्या छोट्या गोष्टींमुळेच हा दिवस खास होतो.

इत्ती सी खुशी मालिकेत नंदिता भूमिका करणारी गौरी टोंक म्हणते, करवा चौथ ही पहिल्यापासून माझ्यासाठी एक सुंदर परंपरा आहे. केवळ उपवास नाही, तर प्रेम, विश्वास आणि माझ्या आणि यशच्या नात्याचा हा उत्सव आहे. हळूहळू एक धार्मिक विधीपेक्षा तो भावनिक विधी झाला आहे. ती सगळी प्रक्रिया मला मनापासून आवडते. तयार होणे, त्या उत्सवाच्या ऊर्जेचा भाग होणे आणि जेव्हा चंद्रोदय होतो तेव्हा तो क्षण दोघांनी एकत्र घालवणे हे सारे खूप छान असते. माझ्यासाठी, हा असा दिवस असतो, जो सहवास, प्रेमाबद्दलची कृतज्ञता, समजूतदारपणा आणि आमची भागीदारी साजरी करतो. वर्षात हा एकच दिवस असला तरी ती भावना हा सण संपल्यानंतर देखील दीर्घकाळ माझ्यासोबत राहते.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, माझ्या मनात करवा चौथचे विशेष स्थान आहे. चंदीगडमध्ये मास्टर्स करत असताना मी एका महिला वसतिगृहात राहायचे, जेथे अविवाहित तरुणी देखील परंपरा म्हणून उपवास करत असत. आम्ही लवकर उठायचो, मेसमध्ये आमच्यासाठी बनवलेली सरगी खायचो आणि मग संपूर्ण दिवस उपवास करायचो. त्यावेळी, आपल्याला चांगला जोडीदार मिळावा या भावनेपेक्षा एकत्र मिळून सण साजरा करण्याची गंमत आम्हाला हवीहवीशी वाटत असे. लग्नानंतर, मी व्यवस्थित उपवास करू लागले, पण आता दिनचर्या खूप धकाधकीची झाल्यानंतर उपवास करणे सोपे वाटत नाही. पण मला त्यातील भावना खूप आवडते. सगळे विधी, तयार होणे, पूजा करणे, चंद्रोदयाची प्रतीक्षा करणे हे सगळे मला फार सुंदर वाटते.

# शब्दकोडे क्रमांक २२३६



**उभे शब्द :-**


१) पाण्याची जागा, तळे, तलाव वगैरे
२) उसाचे पीक
३) समुद्र
४) वेल
५) पांढरे सुगंधी फूल
६) संसर्ग
७) सत्ता
८) युद्धातील एक घोषणा
९) हरिणाची मादी
१३) ओळख
१४) सूर्याचे एक नाव
१६) धाक, दरारा
१७) सारखा
१९) शहरात राहणारा
२०) खूप मोठा, प्रचंड
२३) उद्याच्या नंतरचा दिवस
२४) वाळू
२५) यथाशक्ति
२७) खांबावर आडवी टाकलेली तुळई
२८) दिवसाचा चोविसावा भाग
२९) आतापर्यंत
३१) पुन्हापुन्हा
३३) बगळा
३५) आवेशाने चालून जाणे
३८) दुसऱ्यासाठी खर्च करणे
४०) सुंदर युवती
४१) पारद
४७) हस्तींचा राजा
५०) राजा, सरदार इ थोर व्यक्ती
५१) रत्न
५३) विश्वास, प्रतिष्ठा, अब्रू
५४) अधिकाराचे स्थान
५७) हिन्दुस्थान
५८) पराभव
६०) तारण
६१) लहान मुलगी
६२) गावाची हद्द
६५) ऐट, दिमाख
६६) कुराणातील वचने
६७) चरण्याची जागा
६९) मान्य, आवडलेला
७०) अर्जुनाचे एक नाव
७१) कुबेराचा सेवक
७२) स्वर्गातील एक नृत्यापसरा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**आडवे शब्द :-**

१) भारताच्या पहिल्या पंतप्रधानांचे संपूर्ण नाव
१०) ट्रूम, तरंग, पाण्याची उसळलेली लहर
११) एक तंतुमय वनस्पती
१२) राधानगरी येथे ह्या प्राण्याचे अभयारण्य आहे
१३) परंतु, आणि
१४) ज्वारीचा एका पदार्थ
१५) लंकेचा राजा
१७) पत्नी
१८) यश देणारा
२१) मृत्यू नसलेला
२२) शंकर
२३) पहारा करणारा
२६) एक प्राचीन पर्वत
२८) धातूचा धागा
२९) अजगर
३०) स्वस्तच्या विरुद्ध
३२) प्रत्योत्तर
३४) दिवस
३६) वजन, बोजा
३७) बशीचा जोडीदार
३९) एखाद्या अवयवास मुंग्या येणे
४२) विनाकारण
४३) वेदना, दुःख (हिं)
४४) सारखा
४५) पातक
४६) संताप
४८) पुष्कळ
४९) जासूद
५२) जपजाप्य
५५) किंमत
५६) रीतरिवाज
५८) तसराळे
५९) पत्थर
६३) पुरुष
६४) गवंडी
६६) नाजूक, बारीक नक्षीकाम
६८) बारा वर्षांचा काळ
७०) पोथीचे वाचन
७३) योग्य, उचित
७४) दोन महान ग्रंथ

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



## सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्वितच्या आत्मकेंद्रित आईच्या रूपात अभिनेत्री नेहा एसके मेहताची एंट्री

**मुंबई, ९ ऑक्टोबर :** दिवेकर कुटुंबातील आनंद, संघर्ष आणि त्यांना एकत्र बांधणाऱ्या नात्यांचे हृद्य चित्रण करून सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. सध्याच्या कथानकाला एक रोचक वळण देताना नेहा मेहता ही अभिनेत्री अन्विता (सुंमुल तौकीर खान) च्या नाटकी आईच्या, हेतलच्या भूमिकेत दाखल होत आहे. नेहा एसके मेहता यापूर्वी तारक मेहता का ऊल्टा चश्मा मालिकेत देखील दिसली होती.

हेतलच्या एंट्रीमुळे मालिकेत नाट्य आणि मनोरंजनाची जणू नवी लाट येणार आहे. ती बडबडी आहे, भडक आहे आणि मतलबी आहे. ती नेहमी सगळ्यांचे लक्ष वेधून घेण्याची धडपड करत असते आणि आपले स्टाइलिश आणि ग्लॅमरस व्यक्तिमत्त्व मिरवण्याची एकही संधी ती सोडत नाही. स्वतःची ही सुखवस्तू प्रतिमा जपण्याच्या धडपडीत ती बऱ्याचदा हास्यास्पद ठरते आणि तिच्या या स्वभावामुळे घरात गंमतीजमती होतात. पण, तिच्या या भडक मुखवट्याच्या खाली जी खरी स्त्री आहे, ती असुरक्षित आणि मनी आकांक्षा बाळगणारी स्त्री आहे. हेतल काही सर्वसाधारण असते अशी प्रेमळ आई नाही. हेतल मुलांपेक्षादेखील स्वतःचा विचार आधी करते. आपल्या हुशारीच्या आणि तोऱ्याच्या मागे ती स्वतःचा हळवेपणा लपवत असते, त्यामुळे तिच्या वागण्याचे अनुमान करणे कठीण असते, पण ती मोहक देखील आहे. इत्ती सी खुशी मालिकेत हेतलची भूमिका करणारी नेहा एसके मेहता म्हणते, हृदयातील भावना आणि हलके-फुलके कौटुंबिक क्षण यांची सुंदर सांगड घालणाऱ्या या मालिकेत सहभागी होताना मी खूप रोमांचित आहे. हेतलची भूमिका करण्याचा अनुभव मजेदार असणार आहे! ती बडबडी आहे, नाटकी आहे, उत्साही आहे आणि तिच्यात अनेक अवगुण आहेत. ती आपली कमजोरी लपवत तोरा मिरवते, नाटकीपणा करते, आत्मविश्वास दाखवते पण त्यात गोंधळ माजतो आणि गंमती घडतात. मी आजवर केलेल्या भूमिकांपेक्षा ही व्यक्तिरेखा फारच वेगळी आहे.

## आज का अंदाज

**शुक्रवार १० ऑक्टोबर २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ८ | ४ | ७ | ८ | ९ |
| २३६ | १३० | १६९ | १८९ | २३९ | ११० | १८९ | ४५० |
| ४८९ | २४८ | २६७ | ३७८ | ३६९ | २०० | ३८९ | ५६९ |
| ५६० | ९८० | ३३९ | २२४ | ५०० | ३४८ | ३४० | ६७० |
| १२ | ४२ | ५१ | ८९ | ४३ | ७३ | ८० | ९० |
| १३ | ४३ | ५० | ८० | ४५ | ७६ | ८२ | ९१ |
| १४ | ४५ | ५७ | ८७ | ४८ | ७९ | ८५ | ९२ |

**१० ऑक्टोबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ६१ | ९४ | ०४ |
| ३२ | ६२ | ९५ | ०५ |
| ३३ | ६३ | ९७ | ०७ |
| १२० | ३३९ | १२६ | ११० |
| ३०० | ११२ | २८९ | ४६० |
| २२१ | ७७० | ४७८ | २२६ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ६ ९ ८ ७

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्ही तुमची बहुतेक कामे वेळेवर पूर्ण कराल, ज्यामुळे तुमचा कामाचा ताण कमी होईल. स्वतःची तुलना कोणाशीही करू नका; स्वतःवर विश्वास ठेवा. प्रकृतीला जपा.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्रित असेल. कोणत्याही गोष्टीत घाई करणे टाळणे तुमच्यासाठी चांगले राहील. तुम्ही घरातील कोणतीही अपूर्ण कामे देखील पूर्ण करू शकता. आर्थिक संकट दूर होईल.

**मिथुन :** आज तुमच्या प्रार्थनेला लवकरच फळ मिळेल. तुम्ही तुमच्या कृतींवर लक्ष केंद्रित कराल आणि सकारात्मक राहाल. कोणतीही समस्या तुमच्या स्वतःच्या कृतींद्वारे सोडवली जाईल.

**कर्क :** आज तुम्हाला शारीरिक समस्यांपासून मुक्तता मिळेल आणि बरं वाटेल. कोणाकडेही दुर्लक्ष होणार नाही याची विशेष काळजी घ्या. तुम्ही तुमच्या मित्रांसोबत वेळ घालवण्याचा आनंद घ्याल.

**सिंह :** तुम्हाला अधिकृत कामातही यश मिळेल. भविष्यासाठी आजच नवीन योजना आखा. महत्त्वाच्या गोष्टी गुपित ठेवा, कोणासमोरही बोलू नका, नाहीतर विरोधक खेळ बिघडवू शकतील.

**कन्या :** जर तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करण्याचा किंवा विस्तार करण्याचा विचार करत असाल, तर आजचा दिवस उत्तम ठरेल. आज प्रॉपर्टी व्यवसाय देखील फायदेशीर आहेत.

**तुळ :** आज तुमच्या पालकांकडून जीवनातील महत्त्वाचे धडे शिकाल, जे तुमच्या प्रगतीत उपयुक्त ठरतील. मन अध्यात्माकडे ओढ घेईल. तुम्हाला आज आनंद होईल. सामाजिक कार्यात मन गुंतवाल.

**वृश्चिक :** आज हरतांवर जास्त अवलंबून राहणे टाळल्याने तुमची कामगिरी सुधारेल. मानसिक शांती लाभेल. जोडीदारासोबत आवडत्या ठिकाणी जेवायला जाल, प्रेम वाढेल.

**धनु :** आज तुम्ही एका सामाजिक मेळाव्यात सहभागी व्हाल आणि सर्वजण तुमच्या वागण्याचे कौतुक करतील. तुम्ही स्वतःमध्ये एक बदल घडवून आणाल, ज्याचा भविष्यात तुम्हाला खूप फायदा होईल.

**मकर :** आज, तुम्ही शांतपणे समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला तर सर्व काही ठीक होईल. तुमचा विश्वास आणि आत्मविश्वास अबाधित राहील. आज तुम्ही जे काही हाती घ्याल ते नक्कीच साध्य होईल.

**कुंभ :** कालच्यापेक्षा आजचा दिवस उत्तम जाईल. आज तुम्हाला एखाद्या खास व्यक्तीला भेटण्याची संधी मिळेल, ज्यांचे मार्गदर्शन तुम्हाला प्रगतीसाठी फायदेशीर ठरेल. मुलांसोबत घरी थोडा वेळ घालवा.

**मीन :** आज तुम्हाला नवीन रोजगाराच्या संधी मिळतील, ज्याचा फायदा घेऊन तुम्ही तुमचे भविष्य घडवू शकता. तुम्हाला बजावाच कालानंतर घरी परतण्याची संधी मिळेल आणि सर्वांना भेटून तुम्हाला आनंद होईल.

# बाजार समितीकडून पूरग्रस्तांसाठी ५१ लाखांची मदत

■ महासागर प्रतिनिधी

**खामगाव, दि. ९ :** राज्यभरात अतिवृष्टीमुळे अनेक जिल्ह्यात भीषण पूरपरिस्थिती निर्माण होवुन जनजीवन विस्कळीत झाले होते. यामध्ये शेतकरी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या पार्श्वभुमीवर मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये मदतीचे पैसे पाठवून राज्यातील पुरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पणनमंत्री जयकुमार रावळ यांनी केले होते. मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री त्यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीकडून राज्यातील पुरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये ५१ लक्ष रुपयांची भरीव मदत देण्यात आली. मुंबई येथील मंत्रालयात ७ ऑक्टोबर रोजी माजी आमदार दिलीपकुमार सानंदा व बाजार समितीचे सभापती सुभाष पेसोडे यांनी खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीकडून पुरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी असलेला ५१ लक्ष रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी बुलडाण्याचे पालकमंत्री मकरंद पाटील, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, पणनमंत्री जयकुमार रावळ, जलसंपदा मंत्री गिरिश महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. शेतकरी अडचणीत असताना खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व संचालक वृंद हे त्यांच्या मदतीसाठी धावून आले व सामाजिक बांधिलकी जोपासून राज्यातील पुरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये ५१ लाख रुपयांची भरीव मदत दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाजार समितीचे सभापती व संचालक वृंदांचे कौतुक केले.



# परीक्षा अर्ज भरण्यास विलंब व्हीएमव्हीत विद्यार्थ्यांचा ठिय्या

**अमरावती :** शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेतील (आधीचे विदर्भ महाविद्यालय) विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अर्ज भरताना होणाऱ्या गैससोयींच्या निषेधार्थ मंगळवारी संचालकांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन केले. आंदोलनादरम्यान शिक्षक, विद्यार्थी यांच्यात काहीशी गरमागरम चर्चाही झाली. पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांनी घटनास्थळी पोहोचून दोन्ही घटकांना शांत केले. मागण्या मान्य न झाल्याने सायंकाळपर्यंत हे आंदोलन सुरुच होते. परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी महाविद्यालयात एकच काउंटर आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना तासनब तास रांगेत उभे रहावे लागते. वर्षभरापासून महाविद्यालय प्रशासनाने यात बदल केला नाही. गेल्या आठवड्यात काही मुली चक्कर येऊन पडल्या. परंतु तरीही प्रशासनाने कोणताच बदल केला नाही. ही गैरसोय लक्षात घेता विद्यार्थ्यांनी हा मुद्दा संचालक व संबंधितांच्या लक्षात आणून दिला. परंतु तरीही बदल न झाल्याने त्यांनी 'महाविद्यालय बंद'ची हाक दिली होती. त्याच दरम्यान काहीसा तणावाचा प्रसंग उद्भवला. परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रीया सुलभ करुन देण्याचे आश्वासन वर्षभरापूर्वीच दिले होते. विद्यार्थ्यांच्यामते , मागील सत्रात प्रशासनाने परीक्षा फॉर्म भरण्यासाठी वेळापत्रक, ऑनलाइन पोर्टल देण्याचे मान्य केले होते.

# ...तर कुशल मनुष्यबळात परिवर्तन घडेल : खा. धोत्रे

■ महासागर प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** देशात युवकांची संख्या मोठी आहे. केंद्र व राज्य शासनाकडून युवकांसाठी नव्या युगातील उत्तमोत्तम कौशल्यांचे प्रशिक्षण व रोजगारवृद्धीसाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. काळानुरूप कौशल्य प्राप्त झाल्यामुळे युवा शक्तीचे कुशल मनुष्यबळात परिवर्तन घडेल, असा विश्वास खासदार अनुप धोत्रे यांनी व्यक्त केला. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे 'मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' या अभिनव उपक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. त्यानुसार अकोला येथील आयटीआय येथे खा. धोत्रे यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यक्रम झाला. कार्यक्रमाला आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हा रोजगार सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्राचार्य संतोष साळुंखे, आयटीआयचे प्राचार्य शरदचंद्र ठोकरे. विश्वकर्मा लाभार्थी ग्यानबा तुकाराम बळकार, निदेशक अरविंद पोहरकर आदी याप्रसंगी उपस्थित होते. खासदार धोत्रे म्हणाले की, युवकांचा कौशल्य विकास, तसेच आर्थिक स्वावलंबनासाठी कर्जहमी, प्रोत्साहनपर योजना केंद्र शासनाकडून राबवण्यात येत आहेत. युवा शक्ती हे देशाचे भविष्य आहे. त्यामुळे नवतंत्रज्ञान व काळाची पावले ओळखून तयार केलेले उद्योग- सरेखित नवे अभ्यासक्रम देशात मोठे कुशल मनुष्यबळ निर्माण करतील व देशाची दृढपणे आर्थिक विकासाकडे वाटचाल होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या अभ्यासक्रमाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. संस्थेचे प्राचार्य संतोष साळुंके यांनी या अभ्यासक्रमासाठी इच्छुकांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला कारागिर, स्थानिक कलाकार व पारंपरिक व्यवसायातील तज्ज्ञ यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. विश्वकर्मा लाभार्थी ग्यानबा तुकाराम बळकार यांच्या हस्ते वर्ग कक्षाचे उद्घाटन झाले. उपक्रमाद्वारे कौशल्य शिक्षणाचे विकेंद्रीकरण करण्यात येत असून, अभ्यासक्रमांची निवड स्थानिक मागणी व जनहिताच्या आवश्यकतेनुसार करण्यात आली आहे, अशी माहिती साळुंखे यांनी दिली.



# विद्यापीठाचा युवा महोत्सव २०२५

■ महासागर प्रतिनिधी

**अमरावती, दि. ८ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा युवा महोत्सव २०२५ अमरावती शहरातील श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात सुरू असून युवा महोत्सवाच्या दुस-यादिवशी विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, आदिवासी नृत्य,एकांकिका, मुकनाट, नकला, पाश्चिमात्य वाद्य संगीत, शास्त्रीय वाद्यसंगीत (तालवाद्य), शास्त्रीय संगीत (स्वरवाद्य), भारतीय सुगम संगीत, भारतीय समूहगान वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, स्थळचित्र, पोस्टर मेकिंग अशा विविध कलाप्रकारात आपल्या कलेचे बहारदार सादरीकरण केले. विद्यापीठाच्या युवा महोत्सवामध्ये विद्यापीठ परिक्षेत्रांतर्गत येणा-याअमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम आणि बुलडाणा या जिल्ह्यांच्या २०० महाविद्यालयांचे जवळपास पाच हजार विद्यार्थी, विद्यार्थीनी कलावंत मोठा संख्येने सहभागी झाले आहेत. विद्यापीठाने रितसर उद्घाटन झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणा-या कलाप्रकारास सुरुवात झाली. पहिल्या दिवशी विद्यार्थी कलावंतांनी लोक/आदिवासी नृत्य, एकांकिका, प्रहसन, मुकनाट, भारतीय समूहगान, शास्त्रीय गायनामध्ये उत्तर भारतीय व कर्नाटकी गायन, भारतीय सुगम संगीत, पाश्चिमात्य समूहगान, पाश्चिमात्य एकल गायन अशा कला प्रकाराचे उत्कृष्टरित्या सादरीकरण केले. प्रश्नमंजुषामध्ये लेखी परीक्षा व त्यानंतर अंतिम फेरी घेण्यात आली. त्यानंतर चित्रकला व स्थळ छायाचित्रण अशा कला प्रकारामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचे सादरीकरण केले. १० ऑक्टोबर पर्यंत सदर युवा महोत्सव चालणार असून समारोपीय समारंभामध्ये युवा महोत्सवातील उत्कृष्ट सादरीकरण करणा-या संघाचा मान्यवरांच्या हस्ते गौरव केला जाणार आहे.

युवा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडिया, विद्यापीठ विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांच्या नेतृत्वात निवड समिती अध्यक्ष निखिलेश नलोडे, सदस्य डॉ. सावन देशमुख, डॉ. शर्मिला देशमुख, डॉ. प्रशांत बाळे, डॉ. श्री विजय शर्मा, डॉ. सीमा देशमुख, डॉ. निलेश कडू तसेच महाविद्यालयातील युवा महोत्सव समन्वयक डॉ. तीर्थराज राय, डॉ. माया वाटाणे, डॉ. सोनल चांडक, डॉ. सुनिता धोपटे, विद्यापीठातील श्री संतोष वानखडे, श्री सुधीर देशमुख आदी परिश्रम घेत आहेत.

# संघर्ष शेतकरी संघटनेचा तहसीलवर मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी

**पुसद, दि. ८ :** तालुक्यात व उपविभागात ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिसकावून घेतला आहे. शासनाने नुकसानीसाठी भरीव मदत करावी, अशी मागणी संघर्ष शेतकरी संघटनेने तहसीलदारांना निवेदनातून केली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पंढरीनाथ गोडसे (पाटील), प्रदेश अध्यक्ष कल्पना संतोष चव्हाण, विदर्भ अध्यक्ष संतोष चव्हाण, वैभव सूर्यवंशी जिल्हाध्यक्ष, अमोल कदम तालुकाध्यक्ष यांच्या नेतृत्वात दि. ६ ऑक्टोबर रोजी संघर्ष शेतकरी संघटनेने आक्रोश मोर्चा काढून तहसीलदार महादेवराव जोरवर यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा, ओला दुष्काळ जाहीर करून प्रति हेक्टरी ५० हजार नुकसानभरपाई द्यावी आदी मागण्या केल्या आहेत. यावेळी वैभव सूर्यवंशी, अमोल कदम विष्णू जाधव आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी आपले मत मांडले.




## Change Of Name

MY OLD NAME WAS **SALEHA SEMEEM**. NOW MY NEW NAME IS **SALEHA SHAIKH.**
**ADD :** 114/A PRASHANT NAGAR NAGPUR 440013

MY OLD PASSPORT NO. **J9733025.** MY OLD NAME WAS **SHAMSUL HAQUE**. NOW MY NEW NAME IS **SHAMSUL HAQUE ANSARI MOHAMMAD YUNUS ANSARI.**
**ADD :** H.NO. 2277-741, BEHIND NIT GROUND GALLI NO.2, GARIB NAWAZ PILI NADI NAGPUR

MY OLD NAME WAS **SAPANA GULABRAO VAIRAGADE**. NOW MY NEW NAME IS **SWAPNA DHANRAJ SAKHA-RKAR.**
**ADD :** PLOT NO. A10 JAITALA ROAD DNYANDIP NAGAR NAGPUR

MY OLD NAME WAS **MOHD AKRAM**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD AKRAM ABDUL SATTAR QURESHI.**
**ADD :** AZAD NAGAR NAI BASTI TEKA NAGPUR - 440017

MY OLD NAME WAS **KAMARJAHAN**. NOW MY NEW NAME IS **QAMAR JAHAN MOHAMMAD AKRAM QURESHI.**
**ADD :** AZAD NAGAR NAI BASTI TEKA NAGPUR - 440017

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **N1903003.** MY OLD NAME WAS **AJAY KUMAR**. NOW MY NEW NAME IS **AJAYKUMAR BADRIPRASAD RAI.**
**ADD :** HOUSE NO 263/6 GAJANAN NAGAR, KANDRI, KANHAN, NAGPUR 441404

MY OLD NAME WAS **WAKEEL ANSARI/WAKEEL AHMAD**. NOW MY NEW NAME IS **WAKEEL AHMAD ANSARI.**
**ADD :** P.NO.371, KABRASTAN ROAD, BHANKHEDA, MOMINPURA, NAGPUR - 440018

MY OLD NAME WAS **SHABANA PARVEEN/SHABANA ANJUM**. NOW MY NEW NAME IS **SHABANA PARVEEN ANSARI.**
**ADD :** P.NO.371,KABRASTAN ROAD, BHANKHEDA, MOMINPURA,NAGPUR - 440018

MY OLD NAME WAS **NASRIN PARVEEN**. NOW MY NEW NAME IS **NASRIN AZARUDDIN KAZI.**
**ADD :** WARD NO.1, AT-POST AKOLA BAZAR, TQ - AKOLA BAJAR, YAVATMAL, 445109

MY OLD NAME WAS **ALFIYA WAJAHAT MIRZA**. NOW MY NEW NAME IS **ALFIYA WAJAHAT MIRZA BAIG.**
**ADD :** MIRZA ENGINEERING WORKS, CHHOTA BAZAR, CHANDRAPUR - 442401, MAHARASHTRA, INDIA.
MOBILE NO.:- 09422137694


## महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

प्र.क्र. १६८/प्रस्तु-३/तह.नाग (शहर)/कावि-६१८/२०२५ दिनांक : २९/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अर्जदार श्री. राजेश जेम्स बर्नाड, रा. क्वार्टर नं. १५४/६६, न्यु सोमवारी पेठ, रघुजी नगर, नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार श्री. राजेश जेम्स बर्नाड, रा. क्वार्टर नं. १५४/६६, न्यु सोमवारी पेठ, रघुजी नगर, नागपूर यांनी त्यांचे वडिलोंच मृत्युची तारखेची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांचे वडील नामे जेम्स बर्नाड मृत्यु दि. १७/०१/२०१३ रोजी बोरकर हॉस्पीटल, नागपूर येथे झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वत: जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

## महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

प्र.क्र. १६६/प्रस्तु-३/तह.नाग (शहर)/कावि-६२२/२०२५ दिनांक : ०६/१०/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अर्जदार श्री. राजेश जेम्स बर्नाड, रा. क्वार्टर नं. १५४/६६, न्यु सोमवारी पेठ, रघुजी नगर, नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार श्री. राजेश जेम्स बर्नाड, रा. क्वार्टर नं. १५४/६६, न्यु सोमवारी पेठ, रघुजी नगर, नागपूर यांनी त्यांचे आईचे मृत्युची तारखेची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांची आई नामे जर्मिना जेम्स बर्नाड यांचा मृत्यु दि. ०७/०६/२०११ रोजी नागपूर येथे घरी झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वत: जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

## सायटेशन/पब्लिक जाहीर नोटीस

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. ३७/२०२५**

पे.ता. १७-११-२०२५ प्रोसेस क्र. ११९०/२०२५
दिनांक ०९/१०/२०२५

अर्जदार : १) श्रीमती सिता काशीनाथ अमृते, वय-७२ वर्षे, रा. मु. खंडाळा (गंगानेर), पो. चाचेर, तह. मौदा, जि. नागपूर-४४११०६. २) श्री. दौलत काशीनाथ अमृते, वय-५९ वर्षे, रा.मु. खंडाळा (गंगाने), पो. चाचेर, तह. मौदा, जि. नागपूर-४४११०६. ३) सौ. छाया घनश्याम मायवाडे, वय-५५ वर्षे, रा.मु. धनलक्ष्मी बँकेजवळ, गरोबा मैदान, नागपूर, तह. जि. नागपूर-४४०००८. ४) सौ. उर्मिला प्रकाश महादुले, वय-४३ वर्षे, रा.मु. प्लॉट क्रं. २, टॉप फ्लोर, खामला रोड, व्यंकटेश नगर, राणाप्रताप नगर, नागपूर, तह.जि. नागपूर-४४०००२. ५) सौ. रंजना प्रकाश महादुले, वय-४९ वर्षे, रा.मु.पो. लाखनी, तह. लाखनी, जि भंडारा-४४१८०४

विरुद्ध

गैरअर्जदार : कोणीही नाही

मयतदार : श्री. काशीराम उर्फ काशीनाथ शंकर अमृते

सदरहू अर्जदारांनी कायदेशीर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम VIII१८२७ अन्वये या न्यायालयात कायदशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. श्री. काशीराम उर्फ काशीनाथ शंकर अमृते, हे मौजा-खंडाळा (गंगानेर), तह. मौदा, जि. नागपूर येथे वास्तव्यास होते. अर्जदारांनी मयतदार श्री. काशीराम उर्फ काशीनाथ शंकर अमृत ह्यांचा कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. श्री. काशीराम उर्फ काशीनाथ शंकर अमृत यांचा मृत्यु दि. २९/०४/२०२५ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क. स्तर मौदा, जि. नागपूर यांनी दिनांक १७/११/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता ठरविली आहे. या पब्लिक/जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा. जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशीर वारसान प्रमाणपत्र) मंजुर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. ०१/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशान्वये
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

## जाहिरनामा / सायटेशन नोटीस

**कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क- स्तर कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपूर**

एम.जे.सी. क्र. २६/२०२५ प्रोसेस क्र. १२९१/२०२५
पे.ता. १७-१०-२०२५ दिनांक ०४/१०/२०२५

Applicant : 1) Shri Prakash S/o Deorao Kewat, Aged-35 yearse, Occu. Labourer, R/o. Ward No.2, Pipri (Kanhan), Tah. Parseoni, Dist. Nagpur.
**V/S** Non Applicant : NIL

मयत Late Smt. Sarjabai Deorao Kewat, मयत दि. १७/०८/२००८ R/o. Ward No.2, Pipri (Kanhan), Tah. Parseoni, Dist. Nagpur. Late Deorao s/o Warloji Kewat, मयत दि. २०/०७/२००८

सदरहू अर्जदारांने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Smt. Sarjabai Deorao Kewat, मयत दि. १७/०८/२००८ R/o. Ward No.2, Pipri (Kanhan), Tah. Parseoni, Dist. Nagpur. यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारी कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांनी दि. १७/१०/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजत ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार कळवाव्या आणि ह्या लेखवरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य त कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास Late Smt. Sarjabai Deorao Kewat, मयत दि. १७/०८/२००८ R/o. Ward No.2, Pipri (Kanhan), Tah. Parseoni, Dist. Nagpur. यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## विदर्भ पाटबधारे विकास महामंडळ, नागपूर
## (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

**कार्यकारी अभियंता** आंभोरा उपसा सिंचन विभाग, भिवापूर ता- भिवापूर जि- नागपूर
(ई मेल: alidbhiwapur11@gmail.com दुरध्वनी क्र.०७१०६-२९९४९७.

**ई-निविदा सुचना क्र. ०७/२०२५-२६**

**Main Portal:https://mahatenders.gov.in**

महाराष्ट राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, आंभोरा उपसा सिंचन विभाग, भिवापूर ता- भिवापूर जि- नागपूर जलसंपदा विभाग, महाराष्ट शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मार्गविन आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचा जिल्हा | कामाची निविदा रक्कम | बयाना रक्कम | कोऱ्या निविदेचा रक्कम | पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा २ मधील डोंगरमौदा वितरिकेवरून निर्गमित डोंगरमौदा लघु कालवा ४ यावरील क्षतिग्रस्त बांधकामाचे (HPC, VRB व विमोचक) देखभाल दुरुस्तीची कामे. | नागपूर | रु १५.०९ लक्ष | रु. ०.१६ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| २ | आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा-२ अंतर्गत केशोरी लघुकालव्यावरील सा.क्र. १५०० ते २४०० मी. वर उंच भरावाच्या लांबीत मजबुतीकरणाची कामे. | नागपूर | रु ३७.७१ लक्ष | रु. ०.३८ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| ३ | आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा-२ अंतर्गत सावंगी वितरिकेच्या सा. क्र. ११७० मी. वरुन निर्गमित सावंगी लघु कालवा क्र. आर-२ च्या सा. क्र. १५०० मी. वरील क्षतिग्रस्त Fall cum VRB तसेच पाटचाऱ्यांवरील Drain Crossing चे देखभाल दुरुस्तीचे काम. | नागपूर | रु १५.३६ लक्ष | रु. ०.१६ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| ४ | आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा-२ मधील पाणी वापर संस्थेसाठी घनमापन पद्धतीने सिंचन करण्याकरिता संपूर्ण कालवा प्रणालीवर मोजमाप यंत्राचे बांधकाम. | नागपूर | रु ४६.८३ लक्ष | रु. ०.४७ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| ५ | आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा १ मधील चैत्यनेश्वर पाणी वापर संस्था, अडेगाव अंतर्गत अडेगाव लघुकालवा १,२,३,व मेंढा व गडपायली उपलघुकालव्यावरील क्षतीग्रास्त बांधकामाचे देखभाल दुरुस्तीची कामे. | नागपूर | रु ११.४८ लक्ष | रु. ०.१२ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था. | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| ६ | आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा-१ मधील पाणी वापर संस्थेसाठी घनमापन पद्धतीने सिंचन करण्याकरिता संपूर्ण कालवा प्रणालीवर मोजमाप यंत्राचे बांधकाम. | नागपूर | रु ४७.३६ लक्ष | रु. ०.४८ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था. | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| ७ | आंभोरा उपसा सिंचन योजनेतील बेलतूर वसाहतीतील उपविभागीय कार्यालय व वसाहतीतील सिवर लाईन व प्लंबिंग ची देखभाल दुरुस्तीची कामे व महिला व पुरुषांसाठी स्वच्छता गृहाचे बांधकाम. | नागपूर | रु १२.०८ लक्ष | रु. ०.१३ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था. | ०३ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| ८ | आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा २ अंतर्गत बोथली वितरिकेच्या सा. क्र. १६५० मी. वरुन निर्गमित बोथली लघु कालवा क्र. आर-२ चे टेलिंगचे काम काम व इतर देखभाल दुरुस्तीचे काम. | नागपूर | रु ३७.९४ लक्ष | रु. ०.३८ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| ९ | आंभोरा उपसा सिंचन योजनेतील टप्पा-१ व टप्पा-२ अंतर्गत पंपगृह परिसरातील पंपगृह व इतर इमारतीचे रंगरंगोटीची कामे. | नागपूर | रु ४०.२९ लक्ष | रु. ०.४१ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| १० | आंभोरा उपसा सिंचन विभाग अंतर्गत विभागीय कार्यालय व ६ उपविभागांच्या कार्यालयासाठी प्रत्येकी १ अकुशल चौकीदार पुरविणे | नागपूर | रु ११.३६ लक्ष | रु. ०.१२ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था. | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| ११ | मोखाबर्डी उपसा सिंचन योजने अंतर्गत तास वसाहतीत महिला व पुरुषांचे स्वतंत्र स्वच्छतागृहाचे बांधकाम | नागपूर | रु १२.१६ लक्ष | रु. ०.१३ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| १२ | मोखाबर्डी उपसा सिंचन योजने अंतर्गत तास वसाहतीला सुरक्षेच्या दृष्टिने उर्वरीत कंपाऊंड भिंतीचे बांधकाम व कार्यालय व गाड्यांचे व सभागृहाचे इतर देखभाल दुरुस्तीचे काम | नागपूर | रु ४६.२० लक्ष | रु. ०.४७ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन |
| १३ | मोखाबर्डी उपसा सिंचन योजनेच्या पंपगृह व परिसराकरीता सुरक्षेच्या दृष्टिने CCTV कॅमेरा बसविण्याचे काम | नागपूर | रु १२.३८ लक्ष | रु. ०.१३ लक्ष | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/- = रु.२,३६०/- | नागपूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता | ०३ महिने (पावसाळा कालावधी धरुन |

| | | |
|---|---|---|
| अ) ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. १०/१०/२०२५ वेळ १०.०० ते १७/१०/२०२५ वेळ १७.४५ पर्यंत. |
| ब) ई-निविदा सादर करण्याचा अंतिम कालावधी | :- | दि. १७/१०/२०२५ वेळ १७.४५ पर्यंत |
| क) निविदा पूर्व बैठक | :- | लागू नाही |
| ड) निविदा उघडणे : | :- | दिनांक २०/१०/२०२५ ( वेळ १२.०० वाजता) |

(सदर निविदा सूचना मध्ये काही बदल होत असल्यास फक्त वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

१) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई-निविदा कोरे प्रपत्र विकली जाणार नाहीत.

२) सविस्तर ई-निविदा सूचना महाराष्ट्रशासनाच्या इलेक्ट्रॉनिक टेंडर management http mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीसबोर्डवर पहावयास मिळेल.

३) या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेषण, मोजमाप नकाशे इ. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. निविदाकार प्रत्यक्ष कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार दर भरण्यास व काम पूर्ण करण्यास जबाबदार राहतील आणि याकरिता कोणताही प्रकारचे दावे (Claims) निविदाकारास देय राहणार नाही.

जावक क्र. /निली/२०२५

कार्यकारी अभियंता
आंभोरा उपसा सिंचन विभाग
भिवापूर

DGIPR-2025-26/No.-5/C3054

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# भारत-ब्रिटन संबंधांसाठी ब्रिस्क युगाची सुरुवात

## मुंबईची नव प्रभात

मुंबई शहरात उत्साहाचे वातावरण आहे, कारण युनायटेड किंगडमचे प्रधानमंत्री केअर स्टारमर यांच्या दुसऱ्या दिवसाच्या दौऱ्यामुळे सर्वांचे लक्ष या शहराकडे लागून राहिले आहे. ग्लोबल फिनटेक फेस्टच्या भव्य समारोपाकडे सगळ्यांच्या नजरा खिळल्या आहेत. भारत आणि यूके यांच्यातील वाढत्या मैत्रीचे हे जोरदार प्रदर्शन आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि प्रधानमंत्री स्टारमर आज एकत्र मुख्य भाषण देणार आहेत. ही भेट केवळ एक औपचारिक राजनयिक शिष्टाचार नाही, तर शतकानुशतके चाललेल्या सहकार्याच्या विकासाचा आणि दोन्ही देशांमधील जुन्या नात्यातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा कळस आहे.

--------------

**ऐतिहासिक वळण : कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप**

२०२५ हे वर्ष भारत आणि यूकेच्या संबंधांसाठी एक निर्णायक वळण ठरले आहे. अनेक शतकांचा इतिहास असलेल्या या संबंधाला आता औपचारिक कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिपचे रूप मिळाले आहे. भारत-यूके व्हिजन २०३५ या भागीदारीला मार्गदर्शन करत आहे, ज्यात दोन्ही देशांसाठी समान विकास आणि समृद्धीची योजना आहे.

दोन्ही राष्ट्रांमध्ये भक्कम राजकीय इच्छाशक्ती असल्याने हे संबंध अधिक दृढ झाले आहेत. यावर्षी जुलैमध्ये प्रधानमंत्री मोदी यांनी यूकेचा दौरा केला, त्यानंतर प्रधानमंत्री स्टारमर यांचा भारत दौरा या भागीदारीला नवी गती देत आहे.

हा दौरा दोन्ही देशांतील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण आणि मूर्त फायदे देण्याचे वचन देतो. उद्याचे (आजचे) भाषण, ज्यात १,००,००० हून अधिक जागतिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत, एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय मंचावर या भागीदारीची अविश्वसनीय क्षमता दर्शवणारा एक निर्णायक क्षण ठरेल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींसाठी, ज्यांच्या राजनयिक प्रवासात जगभरातील धोरणात्मक भागीदारांशी संबंध अधिक घट्ट करण्याचा समावेश आहे, हा क्षण भारताच्या जागतिक महासत्ता म्हणून उदयास येण्याचे प्रतीक आहे.

देशांतर्गत आर्थिक सुधारणांना पाठिंबा देण्यापासून ते जागतिक लोकशाही भागीदारांशी जोडणी साधण्यापर्यंत, प्रधानमंत्री मोदी यांच्या प्रयत्नांमुळे यूकेसोबतच्या या नूतनीकृत अध्यायाचा पाया रचला गेला आहे. यूके, ज्याचा भारताशी ऐतिहासिक आणि बहुआयामी संबंध आहे, आता समान भागीदार म्हणून पुढे आले आहे.

**आर्थिक वाढ आणि संधींसाठी इंजिन**

मुंबईतील या बहुप्रतिक्षित घोषणांचा आधार याच वर्षाच्या सुरुवातीला, २४ जुलै २०२५ रोजी, स्वाक्षरी झालेला व्यापक आर्थिक आणि व्यापार करार आहे. अनेक वर्षांच्या तीव्र वाटाघाटीनंतर हा महत्त्वपूर्ण करार व्यापार क्षेत्राचे स्वरूप बदलणार आहे. भारतीय ग्राहक, उत्पादक आणि निर्यातदारांसाठी हा करार नवीन संधींचे दरवाजे उघडेल, ज्यामुळे अनेक उद्योग आणि लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येतील.

या करारामुळे यूकेच्या बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या ९९ टक्के भारतीय वस्तूंवरील सीमाशुल्क संपुष्टात येईल. यात पारंपरिक भारतीय वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू, कृषी उत्पादने आणि ऑटोमोटिव्ह घटकांचा समावेश आहे. केवळ आकडेवारीच्या पलीकडे, या कराराचा उद्देश रोजगार निर्मिती करणे, नावीन्यपूर्णतेला प्रोत्साहन देणे आणि सर्व क्षेत्रांमध्ये समृद्धी वाढवणे आहे.

हा करार महत्त्वपूर्ण आकडेवारी दर्शवतो. द्विपक्षीय व्यापार सध्याच्या ४३ अब्ज पौंडांवरून वर्षाला २५.५ अब्ज पौंडांनी वाढण्याचा अंदाज आहे. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, या करारामुळे कालांतराने भारताच्या वार्षिक सकल राष्ट्रीय उत्पन्नात ५.१ अब्ज पौंडांची भर पडू शकते.

या आकडेवारीमागे कारागिरांपासून ते तंत्रज्ञान स्टार्टअप्सपर्यंत, जागतिक बाजारपेठांमध्ये पोहोचण्याची कोट्यवधी भारतीयांची स्वप्ने दडलेली आहेत.

हा करार ४८ तासांच्या आत मालाच्या मंजुरीसाठी सीमाशुल्क प्रक्रिया सुलभ करण्याचे वचन देतो, ज्यामुळे लहान आणि मध्यम उद्योगांना सामोरे जाव्या लागणाऱ्या लाल फितीच्या अडचणी कमी होतील. हे प्रधानमंत्री मोदी यांच्या व्यवसाय सुलभतेचे भारताला जगातील शीर्ष जागतिक व्यापार आणि गुंतवणूक केंद्र बनवण्याच्या दीर्घकाळच्या प्रयत्नांना प्रतिबिंबित करते.

प्रधानमंत्री मोदी यांच्या धोरणात्मक भाषणांमध्ये अनेकदा उद्धृत केले जाणारे व्यवसाय सुलभतेचे हे सूत्र या करारामुळे नव्याने महत्त्वाचे ठरते, कारण हा करार केवळ मोठ्या उद्योगांनाच नव्हे, तर विशेषतः भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या लहान आणि मध्यम उद्योगांनाही आधार देतो.

या कराराला यूकेमध्ये द्विपक्षीय पाठिंबा असल्याने राजकीय स्थैर्य सुनिश्चित होते, ज्यामुळे निवडणुकीच्या पलीकडेही या भागीदारीचे दीर्घायुष्य स्पष्ट होते. यूके ब्रेक्झिटनंतरच्या जागतिक दृष्टिकोनात भारताला किती महत्त्व देते, हे यातून दिसून येते.



ब्रिजेश सिंह (भा.पो.से.)
प्रधान सचिव तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क)

**हिंद-प्रशांतमध्ये सुरक्षा बंधन मजबूत करणे**

ही भागीदारी केवळ अर्थव्यवस्थेपुरती मर्यादित नसून, संरक्षण आणि सुरक्षेच्या क्षेत्रातही पोहोचली आहे जे व्हिजन २०३५ च्या रोडमॅपचा आधारस्तंभ आहे. हिंद-प्रशांत धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र बनत असताना, दोन्ही देशांनी मुक्त, खुले आणि स्थिर प्रदेशासाठी एक समान दृष्टिकोन जपला आहे.

अलीकडील नौदल सराव कोंकण २०२५ मध्ये हे चित्र स्पष्टपणे दिसले, जिथे भारताची आयएनएस विक्रांत आणि यूकेची एचएमएस प्रिन्स ऑफ वेल्स समन्वय साधून कार्यरत होती. ही कार्यात्मक समन्वयता दोन्ही सशस्त्र दलांमध्ये वाढती आंतरकार्यक्षमता आणि प्रादेशिक शांततेसाठी त्यांची दृढ वचनबद्धता दर्शवते.

भारतीय वायुसेनेसोबतच्या हवाई संरक्षण सरावाने या सहकार्याला पूरक बनवले आहे. ही त्रि-सेवा समन्वयता या भागीदारीच्या खोलीचे दुर्मिळ उदाहरण आहे. याव्यतिरिक्त, जुलै २०२५ चा संरक्षण औद्योगिक रोडमॅप खरेदीदार-विक्रेता गतिशीलता बदलून सह-विकास आणि संयुक्त उत्पादनाकडे एक मूलभूत बदल दर्शवतो. प्रधानमंत्री मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत या संकल्पनेशी जुळलेला हा रोडमॅप तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त संशोधन आणि भारताची देशांतर्गत संरक्षण उत्पादन क्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो.

यातून भारताला जागतिक संरक्षण नवोपक्रम आणि धोरणात्मक स्वायत्ततेत अग्रेसर भूमिका घेता येईल, तसेच मोठ्या प्रमाणात उच्च-कुशल रोजगार निर्माण होतील.

**लिव्हिंग ब्रिज : चिरस्थायी लोक-ते-लोक जोडणी**

धोरणात्मक करारांपलीकडे, लोक-ते-लोक जोडणीचा चिरस्थायी लिव्हिंग ब्रिज या भागीदारीचे हृदय आहे. यूकेमधील भारतीय डायस्पोरा (स्थलांतरित भारतीय समुदाय), जो तेथील लोकसंख्येच्या २.६ टक्के आहे आणि ६५,००० हून अधिक व्यवसायांचे मालक आहेत, हे अमूल्य सामाजिक-आर्थिक बंधन दृढ करतात.

२०२५ मध्ये पुन्हा पुष्टी झालेली उच्च शिक्षण पात्रतेची परस्पर मान्यता भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांसमोरील अडथळे दूर करते, प्रतिभा गतिशीलता आणि शैक्षणिक देवाणघेवाण वाढवते. जागतिकीकरणाच्या जगात जिथे कौशल्ये आणि ज्ञान सीमा ओलांडतात, तिथे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

व्हिजन २०३५ च्या शैक्षणिक विस्ताराचे उदाहरण युनिव्हर्सिटी ऑफ साउथम्प्टनच्या गुरुग्राम कॅम्पसच्या जून २०२५ मधील उद्घाटनातून दिसते. हा उपक्रम जागतिक प्रतिभेचे संगोपन करतो आणि दूरदृष्टीच्या शैक्षणिक सहकार्याचे प्रतीक आहे.

याला पूरक म्हणून, भारत-यूके ग्रीन स्किल्स भागीदारी नवीकरणीय ऊर्जा, शाश्वत शेती आणि पर्यावरणीय लवचिकतेमध्ये तरुणांची क्षमता विकसित करते - ज्यामुळे भविष्यातील जागतिक आव्हानांसाठी तयारी सुनिश्चित होते.

**तंत्रज्ञान, नावीन्य आणि मुंबईच्या फिनटेक फेस्टमधील सामायिक भविष्य**

या भागीदारीचे भविष्यवेधी लक्ष तंत्रज्ञान आणि नावीन्य आहे, जे ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. १०० हून अधिक देशांतील ८०० हून अधिक स्पीकर्ससह, हा उत्सव प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर यांच्या दृष्टिकोनासाठी एक आदर्श मंच प्रदान करतो.

डिजिटल पेमेंट आणि आर्थिक समावेशनात भारताची अग्रणी भूमिका यूकेच्या जागतिक वित्तीय परिसंस्थेचे पूरक आहे, ज्यामुळे अधिक गहन तांत्रिक सहकार्याचा मार्ग मोकळा होतो.

तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमाद्वारे, दोन्ही देश दूरसंचार, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) मध्ये संयुक्त उपक्रम आणि सेमीकंडक्टर आणि खनिजांसाठी महत्त्वपूर्ण पुरवठा साखळी सुरक्षित करण्यावर भर देतात. लवचिक, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली तयार करणे आता राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक वाढ जपण्यासाठी केंद्रस्थानी आहे.

हवामान कृती हा एक मुख्य आधारस्तंभ राहिला आहे. दोन्ही देश स्वच्छ ऊर्जा स्वीकार आणि ग्रीन फायनान्स बाजारपेठांना कुशल बनवण्यास गती देतात. बीपी (BP) आणि शेल (Shell) यांसारख्या यूकेच्या कंपन्यांची भारतातील स्वच्छ इंधन आणि इलेक्ट्रिक वाहन पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक या उद्दिष्टांच्या दिशेने उचललेली व्यावहारिक पाऊले दर्शवते.

हवामान आणि नावीन्य यावरील आपल्या अनेक भाषणांमध्ये, प्रधानमंत्री मोदी यांनी असा दृष्टिकोन मांडला आहे जिथे आर्थिक वाढ आणि शाश्वतता हातात हात घालून चालतात. ही द्विपक्षीय भागीदारी त्या दृष्टिकोनाला प्रतिबिंबित करते, ज्यामुळे ती जागतिक सहकार्यासाठी एक दीपस्तंभ ठरते.

**नव्या युगाची सुरुवात**

प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर आज आपले मुख्य भाषण देण्यासाठी सज्ज असताना, त्यांचा संयुक्त संदेश सामायिक मूल्ये आणि परस्पर लाभावर आधारित एका परिपक्व भागीदारीचे प्रतीक असेल. ही युती त्यांची एकत्रित आर्थिक ताकद, सुरक्षा सहकार्य, सांस्कृतिक संबंध आणि नावीन्यपूर्ण भावना यांचा फायदा घेते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अटळ धोरणात्मक दृष्टिकोनाच्या मार्गदर्शनाखाली, ही भागीदारी केवळ पुनरुज्जीवित झालेली नाही–तर एका नवीन युगासाठी तिची पुनर्कल्पना केली गेली आहे. एकत्र येऊन, भारत आणि युनायटेड किंगडम समृद्धी देण्यासाठी, सुरक्षा वाढवण्यासाठी आणि स्थिर आणि मुक्त जागतिक व्यवस्थेचे आधारस्तंभ टिकवून ठेवण्यासाठी सज्ज आहेत. त्यांची नूतनीकृत युती केवळ त्यांच्या लोकांचे भविष्यच नव्हे, तर आगामी दशकांमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधांचा मार्गही निश्चित करण्याचे वचन देते.

■ ■ ■

# लाडक्या बहिणीसाठी पुन्हा तोच विभाग रिकामा?



महायुती सरकारची बहुचर्चित मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा वादात सापडली आहे. महिन्याच्या हप्त्यासाठी कोट्यवधींचा निधी कुठून आणला गेला यावरून विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे.

सप्टेंबर महिन्याचा हप्ता मिळण्याची महिलांची आतुरतेने वाट पाहत असताना शासनाने पुन्हा एकदा सामाजिक न्याय विभागावरच डल्ला मारला आहे.

ही योजना सुरू झाल्यापासूनच आर्थिक ताण वाढत चालला असून, सरकारी कोषात निधीची कमतरता दिसू लागली आहे. विरोधकांच्या आरोपांमुळे आधीच टीकेच्या केंद्रस्थानी असलेल्या या योजनेला आता आणखी एक मोठा धक्का बसण्याची चिन्हं आहेत.


दरम्यान, योजनेसाठी तब्बल ४१०.३० कोटी रुपयांचा निधी सामाजिक न्याय विभागातून वळवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. हा निधी अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवगार्तील महिला लाभार्थ्यांसाठी वापरण्याच्या सूचना महिला व बालविकास विभागाला देण्यात आल्या आहेत.

मात्र संजय गांधी निराधार किंवा श्रावण बाळ योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेचा अतिरिक्त लाभ मिळणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यातील लाखो लाभार्थ्यांना अद्याप सप्टेंबरचा हप्ता मिळालेला नाही. याच पार्श्वभूमीवर वित्त विभागाने काही दिवसांपूर्वीच पत्रकाद्वारे निधी वितरणाची प्रक्रिया निश्चित केली होती. बुधवारी या निधीला अखेर मंजुरी देण्यात आली.

सामाजिक न्याय विभागाने मात्र महिलाव व बालविकास विभागाला स्पष्ट सूचना दिल्या आहेत की दुहेरी लाभ रोखणे अत्यावश्यक आहे.

हा प्रकार पहिल्यांदाच घडत नाही. याआधीही १,८२७ कोटी ७० लाख रुपयांचा निधी सामाजिक न्याय आणि आदिवासी विभागाकडून लाडकी बहीण योजनेसाठी वळवण्यात आला होता.



दिपक कैतके
मुंबई.

३१ जुलै २०२५ रोजीही याच विभागाचा निधी वापरण्यात आला होता. त्यावेळीच विरोधकांनी अजित पवारांना लक्ष्य करत टीकेची झोड उठवली होती.

**आता पुन्हा तोच खेळ**

निधीची तरतूद करताना सरकारची दमछाक होत असून, योजनाचाच पाया आर्थिकदृष्ट्या किती कमकुवत आहे, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या घडामोडींना राजकीय रंग मिळणार, यात शंका नाही.

# १३८ पदांसाठी एमपीएससीची भरती

एमपीएससी ग्रुप सी सर्व्हिसेस कम्बाइंड प्रिलिमिनी परीक्षा २०२५ ची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. अर्ज प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. या भरतीसाठी प्रिलिमिनी परीक्षा ४ जानेवारी रोजी होणार आहे. उमेदवार mpsc.gov.in या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन अर्ज करू शकतात.

रिक्त पदांची माहितीः

| पदनाम | पोस्टची संख्या |
| --- | --- |
| लिपिक टंकलेखक | ८५२ |
| कर सहाय्यक | ७३ |
| उद्योग निरीक्षक | ९ |
| तांत्रिक सहाय्यक | ४ |
| **एकूण पोस्टची संख्या** | **९३८** |

**शैक्षणिक पात्रताः**

लिपिक टंकलेखकः पदवी, मराठी किंवा इंग्रजी टंकलेखन कौशल्य.

कर सहाय्यकः पदवी, मराठी किंवा इंग्रजी टायपिंग स्पीड

उद्योग निरीक्षकः संबंधित क्षेत्रातील पदवीधर

तांत्रिक सहाय्यकः संबंधित क्षेत्रातील पदवीधर

**वयोमर्यादा**

किमानः १८ वर्षे

कमालः ३८ वर्षे

वयोमर्यादा ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी मोजली जाईल.

पगारः दरमहा १९,९०० - १,१२,४००

**शुल्क : पूर्वपरीक्षाः**

सामान्यः ३९४ रुपये

राखीव : २९४ रुपये

माजी सैनिकः ४४ रुपये

**मुख्य परीक्षाः**

सामान्यः ५४४ रुपये

राखीव : ३४४ रुपये

माजी सैनिकः ४४ रुपये

**निवड प्रक्रियाः**

लेखी परीक्षा

कागदपत्र पडताळणी

कौशल्य चाचणी




**करिअर कट्टा**

**आवश्यक कागदपत्रेः**

आधार कार्ड

स्वाक्षरी

पासपोर्ट आकाराचा फोटो

जात प्रमाणपत्र

नोंदणीकृत मोबाईल नंबर

मतदार ओळखपत्र

पत्त्याचा पुरावा

### ५० अप्रेंटिस पदांसाठी डीआरडीओमध्ये भरती

संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेने (DRDO) ५० अप्रेंटिस पदांसाठी भरतीची अधिसूचना जाहीर केली आहे. उमेदवारांनी training.pxe@gov.in या ईमेलवर अर्ज करावा.

### बिहारमध्ये २७४७ पदांसाठी भरती अधिसूचना जारी

बिहार टेक्निकल सर्व्हिस कमिशनने कनिष्ठ अभियंता पदांसाठी भरती मोहीम जाहीर केली आहे. इळरउ ने त्यांच्या अधिकृत वेबसाइट btsc.bihar.gov.in वर एक सूचना जारी केली आहे, ज्यामध्ये JE भरतीबद्दल महत्वाची माहिती दिली आहे.

टायपिंग कौशल्ये

पदवीधर, पदवी इ.

**अर्ज कसा करावाः**

mpsc.gov.in या अधिकृत वेबसाइटला भेट द्या. होम पेजवरील भरती २०२५ सूचना लिंकवर क्लिक करा.

नोंदणी करा आणि लॉग इन करा.

लॉगिन क्रेडेन्शियल्स मोबाईल नंबर आणि ईमेलवर पाठवा. युजर आयडी आणि पासवर्ड वापरून लॉगिन करा.

आवश्यक कागदपत्रे स्कॅन करा आणि अपलोड करा. शुल्क ऑनलाइन जमा करा. फॉर्म सबमिट करा. त्याची प्रिंटआउट घ्या आणि ती जपून ठेवा.

■ ■ ■

# भावनिक नात्याचं प्रतिक : करवा चौथ

करवा म्हणजे मातीचा कलश किंवा भांडे आणि चौथ म्हणजे चतुर्थी. कार्तिक महिन्यातील कृष्णपक्षाची चतुर्थी या दिवशी करवा चौथ साजरा केला जातो. या दिवशी विवाहित स्त्रिया सूर्योदयापासून ते चंद्रदर्शनापर्यंत उपवास धरून पतीच्या दीर्घायुष्याची व सुखी वैवाहिक जीवनाची प्रार्थना करतात. भारत हा सण-उत्सवांचा देश आहे. प्रत्येक प्रांतातील वेगवेगळ्या प्रथा-परंपरा येथे जपल्या जातात. त्यातही स्त्रीच्या सौभाग्यासाठी व पतीच्या दीर्घायुष्यासाठी साजरा होणारा करवा चौथ हा व्रतप्रधान सण विशेष महत्त्वाचा मानला जातो.

उत्तर भारतातील पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश या भागात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आता त्याचा प्रभाव महाराष्ट्रासह इतर राज्यांतही दिसून येतो. करवा चौथ ही केवळ धार्मिक परंपरा नसून पती-पत्नीतील भावनिक नात्याचे प्रतीक आहे.

या सणामुळे स्त्रियांच्या आयुष्यात श्रद्धा, संयम व कुटुंबाबद्दलची निष्ठा दृढ होते. स्त्रियांची सजावट, मेहंदी, नृत्य, गाणी या माध्यमातून आनंद व उत्साह निर्माण होतो. आजच्या काळात नवरा-बायको दोघेही एकमेकांसाठी उपवास करतात ही एक नवी सकारात्मक परंपरा उदयाला येत असुन या सणाला सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

आधुनिक काळातील बदल म्हणजे पूर्वी करवा चौथ हा सण फक्त पारंपरिक पद्धतीने ग्रामीण व शहरी घरांमध्ये साजरा होत असे. आता मात्र चित्रपट, मालिका, सोशल मीडियाच्या प्रभावामुळे या सणाची लोकप्रियता संपूर्ण देशभर वाढली आहे. शहरी भागात महिलांसाठी खास करवा चौथ समारंभ, फॅशन शो, मेहंदी स्पर्धा यांचे आयोजन केले जाते.

करवा चौथ हा सण स्त्रीच्या श्रद्धा, प्रेम आणि समर्पणाचा प्रतीक आहे. पतीच्या दीर्घायुष्यासाठी स्त्रिया करीत असलेले हे व्रत केवळ धार्मिक नसून कौटुंबिक ऐक्य व वैवाहिक जीवनातील बंध दृढ करणारा आहे. बदलत्या काळानुसार या सणाच्या पद्धतीत फेरबदल झाले असले तरी त्यामागचा मुख्य उद्देश आजही तितकाच जिवंत आहे, पती-पत्नीतील प्रेम आणि कुटुंबाचे सुख-समाधान.

करवा चौथशी निगडित अनेक कथा प्रचलित आहेत. त्यापैकी एक कथा सती सावित्रीची आहे. सावित्रीने आपल्या तपश्चर्येने मृत्यूदेव यमराजालाही पती सत्यवानाचे प्राण परत द्यावे लागले होते. त्यामुळे या व्रताचा संबंध पतीच्या आयुष्याशी जोडला गेला आहे.

दुसरी कथा पांडवांच्या काळाशी निगडित आहे. म्हणे, द्रौपदीनेही पती अर्जुनाच्या कल्याणासाठी करवा चौथचे व्रत केले होते. त्यामुळे पतीच्या सुरक्षिततेसाठी व सौख्यासाठी हे व्रत स्त्रिया आचरणात आणतात.

करवा चौथ व्रताची पद्धत म्हणजे सकाळची सुरुवात विवाहित स्त्री सूर्योदयापूर्वी ह्यसर्गीह्नवाचे भोजन करते. हे भोजन प्रामुख्याने सासरच्या



मंडळींकडून दिले जाते. तसेच, दिवसभर अन्न व पाणी न घेता उपवास केला जातो.

दिवसभर स्त्रिया सजतात, मेहंदी लावतात, नटतात. संध्याकाळचा पूजाविधीच्या वेळी करव्यामध्ये पाणी, धान्य भरले जाते. सखी-सोबती स्त्रिया एकत्र बसून पूजा करतात व आख्यायिका ऐकतात आणि शेवटी चंद्रदर्शन रात्री चंद्र उगवल्यावर त्याला चलणी अथवा जाळीदार वस्त्रातून पाहिले जाते. त्यानंतर पतीला त्याच चलणीतून पाहून पतीच्या हातून पाणी व अन्न घेऊन उपवास सोडला जातो.

करवा चौथ म्हटले की डोळ्यासमोर येते ते सुहागिन बायका, चंद्राला चलनीतून पाहणारी दृश्ये आणि पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना. पण आजच्या आधुनिक काळात हा सण फक्त पती-पत्नीपुरता मर्यादित राहिलेला नाही. आता तरुण प्रेमिके-प्रेमिकाही करवा चौथ साजरा करून आपल्या नात्यातील बंध अधिक घट्ट करतात.

प्रेमिकांसाठी करवा चौथ म्हणजे प्रेमाचे व्रत. दिवसभर न खाता-पिता एकमेकांसाठी उपवास करणे ही केवळ परंपरा नाही, तर एकमेकांसाठी असलेली काळजी आणि निष्ठा व्यक्त करण्याचा सुंदर मार्ग आहे. मुलगी आपल्या प्रियकराच्या यशासाठी, तर मुलगा आपल्या प्रेयसीच्या सुखासाठी प्रार्थना करतो.

आज सोशल मीडियाच्या युगात जोडपी हा दिवस खास बनवतात. गिफ्ट्स देऊन, चंद्र पाहून एकत्र व्रत सोडून आणि आयुष्यभर एकमेकांसोबत राहण्याच्या वचनांनी. करवा चौथ प्रेमिकांसाठी केवळ धार्मिक विधी नसून, तो प्रेम, विश्वास आणि एकत्रित आयुष्याची आशा जपणारा सण बनला आहे.

काही पारंपरिक विचारांचे लोक याकडे वेगळ्या नजरेने पाहतात, कारण करवा चौथ मूळतः वैवाहिक बंधनासाठी होता. मात्र बदलत्या काळात हा सण नात्यांमध्ये विश्वास, समर्पण आणि प्रेम वाढवणारा म्हणून तरुण पिढीत वेगळ्या अंगाने स्वीकारला जातो.

आजच्या पिढीसाठी करवा चौथ हा फक्त पती-पत्नीपुरता मर्यादित न राहता प्रेमिक-प्रेमिकांच्या नात्यातील भावनिक जवळीक वाढवणारा सण ठरत आहे. प्रेमात असलेली जोडपी हा दिवस आपापल्या पद्धतीने साजरा करून नात्यातील प्रेम, आदर आणि बांधिलकी अधिक दृढ करतात.

एकेकाळी एका नवविवाहित महिलेने आपल्या माहेरी असतांना हे व्रत केले. ती सुस्वरूप अशी युवती होती. तिने कठोरपणे आपला उपवास पालन केला. तिच्या तपाने तिला दीर्घायुष्य मिळाले. भावांनी जवळच्या डोंगरावर अग्नी प्रज्वलित केला आणि तिला सांगितले की चंद्र उगवला आहे. व्रताची समाप्ती करताना चंद्राचे दर्शन घेण्यासाठी ती तिथे गेली पण तिला लक्षात आले की भावांनी आपल्याला फसविले आहे. तिचे व्रत मोडल्याने तिच्या पतीच्या निधनाची बातमी तिला समजली.

ती बातमी कळताच ती आपल्या पतीच्या घरी निघाली. वाटेत तिला शिव पार्वती भेटले आणि त्यांनी तिला असे का घडले असावे हे कथन केले. पार्वतीने तिला आपल्या करंगळीच्या टोकातून थोडे रक्त दिले आणि आपल्या पतीच्या मुखावर शिंपडण्यास सांगितले.

भविष्यकाळात तिने अगदी कठोरपणे हे व्रत पाळण्याचा सल्लाही देवीने तिला दिला. सासरी पोहोचल्यावर तिने पार्वतीने दिलेले रक्त पतीच्या मुखावर शिंपडले आणि तो पुनरूज्जीवित झाला. त्यानंतर या महिलेने निष्ठेने करवा चौथ व्रत पालन केले आणि तिला सुख समृद्धी प्राप्त झाली अशी या व्रतामागील आख्यायिका आहे.

करवा चौथ हे हिंदू व्रत आहे. हे व्रत दिल्ली, हरियाणा, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, जम्मू, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश या प्रांतात केले जाते. आश्विन कृष्ण चतुर्थीच्या दिवशी विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी पूर्ण दिवस उपवास करतात. संध्याकाळी चंद्र उगवल्यावर चाळणीतून प्रथम चंद्राचे दर्शन व नंतर पतीचा चेहरा पाहतात. क्वचित अविवाहित स्त्रियाही आपल्या इच्छित पतीसाठी हे व्रत करतात.

सनातन धर्माच्या लोकांसाठी करवा चौथ व्रताचे विशेष महत्त्व आहे. विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी, उत्तम आरोग्यासाठी आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी हे व्रत करतात. तथापि हा उपवास खूप कठीण आहे, कारण या उपवासात अन्नाबरोबरच पाणी पिण्यासही मनाई आहे, म्हणजेच हा निर्जल उपवास ठेवण्याचा नियम आहे.

संध्याकाळी चंद्र देवाला जल अर्पण केल्यावरच हे वत मोडले जाते. करवा चौथ व्रताचे अनेक महत्त्वाचे नियम आहेत, त्यांचे पालन न केल्यास स्त्रियांना त्यांच्या पूजेचे पूर्ण फळ मिळत नाही.

यादिवशी गणपती आणि करवा देवी व्यतिरिक्त चंद्र देवाची पूजा करणे देखील महत्त्वाचे आहे. चंद्र देव हे वय, सुख, समृद्धी आणि शांतीसाठी जबाबदार ग्रह मानला जातो. करवा चौथच्या दिवशी चंद्र देवाची पूजा केल्याने वैवाहिक जीवन सुखी राहते. याशिवाय पतीचे वय वाढण्याची शक्यता ही वाढते.

देशातील अनेक राज्यांमध्ये करवा चौथ चा उपवास करक चतुर्थी व्रत म्हणूनही ओळखला जातो, करवा चौथ व्रताचे महत्वाचे नियम करवा चौथ उपवास सूर्योदयापूर्वी सुरू होतो आणि चंद्र उगवल्यानंतर समाप्त होतो. चंद्र देवाचे दर्शन घेऊनच हे व्रत मोडावे. वास्तुशास्त्रानुसार संध्याकाळी शिव परिवाराची पूजा करताना स्त्रीचे तोंड पूर्वेकडे असावे. या दिशेला तोंड करून पूजा करणे शुभ असते.

पारंपरिकदृष्ट्या करवा चौथ हा सण विवाहित स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्याच्या कामनेसाठी साजरा करतात. परंतु आधुनिक काळात, विशेषतः तरुणाईमध्ये, हा सण प्रेमिक-प्रेमिकांमध्ये देखील लोकप्रिय होत आहे.

पूर्वी करवा चौथ हा फक्त सौभाग्यवती स्त्रियांचा सण मानला जात असे. पण आता प्रेमात असलेल्या जोडपीदेखील एकमेकांप्रती निष्ठा, प्रेम आणि बांधिलकी दाखवण्यासाठी हा दिवस साजरा करतात.

या दिवशी अनेक तरुणी आपल्या बॉयफ्रेंडसाठी दिवसभर उपवास धरतात आणि त्याच्यासाठी सुख-समृद्धी व यशाची प्रार्थना करतात. काही तरुण मुलंही आपल्या प्रेयसीसाठी उपवास करतात, जेणेकरून नात्यात समानतेचा आणि परस्पर प्रेमाचा संदेश जाईल.

आजकाल सोशल मीडियाच्या प्रभावामुळे करवा चौथ इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅपवर प्रेमिके-प्रेमिके करवा चौथच्या शुभेच्छा देतात, फोटो शेअर करतात. एकत्र उपवास - काही प्रेमिके उपवास एकत्र धरतात आणि चंद्र पाहिल्यावर नाते अधिक दृढ करण्याची प्रतिज्ञा करतात.

बॉयफ्रेंड/गर्लफ्रेंड या दिवशी एकमेकांना खास भेटवस्तू व सरप्राईजेस देतात, ज्यामुळे हा दिवस संस्मरणीय ठरतो. पारंपरिक विधींची शाब्दिक नक्कल केली जाते, पण त्यामागे खरी भावना असते ती म्हणजे रोमँटिक अँगल एकमेकांवरील प्रेम आणि काळजी. सर्वांना करवा चौथ च्या हार्दिक शुभेच्छा.

■ ■ ■

## नागपूर निबंधक कार्यालयातील लाचकांड

# भ्रष्टाचाराचे पुरावे आढळल्याने अधिकारी निलंबित

### प्रशासनात उडाली खळबळ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये, तालुक्यांमध्ये जमीन खरेदी-विक्री व्यवहाराच्या कार्यालयात भ्रष्टाचाराचे प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत असतात. नागरिकांकडून नोंदणीसाठी अतिरिक्त रक्कम मागितली जाते, अशी अनेक तक्रारी समाजमाध्यमांवर व्हिडिओ आणि पोस्टच्या स्वरूपातही पसरतात.

मात्र, या वेळी थेट राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीच अशा भ्रष्टाचाराचा पदार्फाश केला आहे. नागपूरच्या खामला येथील दुय्यम निबंधक कार्यालयात त्यांनी अचानक धाड टाकत, थेट कारवाई करून संपूर्ण विभागाला हादरवून सोडले आहे.



या प्रकरणात महसूल मंत्री बावनकुळे यांनी सह दुय्यम निबंधक अ. तु. कपाले यांना थेट निलंबित करण्याचा आदेश दिला आहे.

या आदेशात नमूद करण्यात आले आहे की, मंत्र्यांनी भेट दिलेल्या कार्यालयात भ्रष्टाचाराचे पुरावे आढळल्याने संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करण्यात येत आहे. निलंबनाचे आदेश लागू असताना अ. तु. कपाले यांचे मुख्यालय अमरावती विभागीय कार्यालयात ठेवण्यात आले आहे.

सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

महसूल मंत्री बावनकुळे यांनी दोन दिवसांपूर्वी कोणतीही पूर्वसूचना न देता नागपूरच्या खामला परिसरातील दुय्यम निबंधक कार्यालयात अचानक भेट दिली. त्यांच्यासोबत काही पत्रकार आणि कॅमेरेही होते. मंत्र्यांनी कार्यालयातील कामकाजाची पाहणी करताना एका अधिकाऱ्याच्या टेबलाजवळ संशयास्पद हालचाली दिसल्याने त्यांनी थेट ड्रॉवर तपासला. तेव्हा सर्वांसमोरच रोख ५ हजार रुपये सापडले.

ही घटना पाहताच उपस्थितांमध्ये एकच खळबळ उडाली. बावनकुळे यांनी तत्काळ चौकशीचे आदेश दिले आणि पोलिसांनाही याची माहिती दिली. हा संपूर्ण प्रकार पत्रकारांच्या उपस्थितीत झाल्याने तो काही क्षणांतच समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आणि राज्यभरात चर्चेचा विषय ठरला.

**तक्रारींनंतर मंत्र्यांची कारवाई**

महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, या कार्यालयाबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी येत होत्या. जमीन नोंदणी, विक्री खरेदी किंवा कागदपत्रांच्या पडताळणीसाठी लाच मागितली जात असल्याच्या अनेक तक्रारी माझ्याकडे आल्या. त्यामुळेच मी स्वतः येऊन वस्तुस्थिती पाहण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या धाडीनंतरच भ्रष्टाचाराचे जाळे उघड झाले. बावनकुळे यांनी तत्काळ उपस्थित अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले. तसेच, रोख रक्कम पंचनामा करून जप्त करण्यात आली. अनेकांनी या कारवाईचे स्वागत केले

या धाडीदरम्यान उपस्थित कॅमेऱ्यांमुळे नागपूरच्या निबंधक कार्यालयातील भ्रष्टाचाराचे वास्तव संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. अनेक नागरिकांनी सोशल मीडियावर प्रतिक्रियांचा वर्षाव केला.

# २ सप्टेंबरचा काळा जीआर रद्द करा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

मराठा आरक्षणासाठी काढलेल्या जीआर विरोधात सकल ओबीसी समाजाने एल्गार पुकारला असून, उद्या नागपुरात ऐतिहासिक मोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

महायुतीच्या सरकारने ओबीसी आरक्षणात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत हा जीआर काढल्यामुळे समाजात प्रचंड आक्रोश आहे, अशी भावना काँग्रेस नेते आणि ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केली. हा जीआर त्वरित रद्द करावा ही समाजाची एकमुखी मागणी आहे. दोन सप्टेंबरचा जीआर रद्द न केल्यास सरकारला लोक फिरू देणार नाहीत, असा इशारा वडेट्टीवार यांनी दिला. तसेच उद्याचा मोर्चा सरकारचा खरा 'डीएनए' सिद्ध करणारा ठरेल, असेही ते म्हणाले.

मराठा आरक्षणासाठी काढलेला जीआर रद्द करावा, या मागणीसाठी उद्या नागपुरात विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वात सकल ओबीसी समाजाचा महामोर्चा काढण्यात येणार आहे. यशवंत स्टेडियम ते संविधान चौक दरम्यान हा मोर्चा निघणार आहे. यशवंत स्टेडियम परिसरात या मोर्चाची तयारी अंतिम टप्प्यात आलेली आहे. या मोर्चामध्ये मोठ्या प्रमाणात ओबीसी नेते आणि कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. विजय वडेट्टीवार यांनी आज मोर्चास्थळाची पाहणी करून तयारीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

उद्याचा ओबीसीचा मोर्चा ऐतिहासिक होईल. नागपुरात सकल ओबीसी समाजाच्या वतीने दोन सप्टेंबरचा काळा जीआर रद्द झाला पाहिजे, ही सर्व समाजाची एकमुखी मागणी आहे. ज्या प्रमाणात ओबीसीमध्ये घुसखोरी करण्यासाठी महायुतीच्या सरकारने दोन सप्टेंबरचा जीआर काढून ओबीसींच्या मानेवर सुरी चालवण्याचे पाप केले. त्यामुळे जनतेमध्ये प्रचंड आक्रोश आहे, असा संताप त्यांनी व्यक्त केला.

उद्या सकाळी साडेअकरा ते बारा वाजेदरम्यान मोर्चाची सुरुवात होईल. महाराष्ट्रातून अनेक ओबीसीचे नेते या मोर्चात येणार आहेत. सामाजिक चळवळीमध्ये ओबीसींच्या संघर्षामध्ये, ओबीसींच्या हक्कासाठी लढणाऱ्या संघटनांच्या प्रतिनिधींना सुद्धा मार्गदर्शन करण्यास आम्ही पाचारण केल्याचे ते म्हणाले.



**उद्याचा मोर्चा सरकारचा डीएनए सिद्ध करणारा**

आमचा डीएनए ओबीसी असल्याचे सांगणाऱ्या फडणवीस सरकारने, हा जीआर काढून त्यांचा डीएनए कोणता आहे, हे उद्या सिद्ध करणारा हा मोर्चा असणार आहे. २ सप्टेंबरचा काळा जीआर रद्द करा, ही आमची कालही मागणी होती, आजही आहे आणि उद्याही राहणार आहे. उद्याच्या मोर्चा ही फक्त सुरुवात आहे. जीआर रद्द न केल्यास महायुती सरकारला लोक फिरू देणार नाहीत. ३७५ जातींवर जो अन्याय चाललाय, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यास तुम्ही पात्र नाही, याचा जाब ओबीसी समाज मंत्र्यांना, आमदारांना, लोकप्रतिनिधींना जाब विचारेल, असा इशारा त्यांनी दिला. कोणत्याही पक्षाला मोर्चासाठी निमंत्रण द्यायला इथे कुणाचे लग्न किंवा बारसे नाही. हा ओबीसी समाजाचा मोर्चा आहे. जो ओबीसी हिताच्या रक्षणाचे बोलेल, त्याला इथे येण्यापासून कुणी थांबवण्याचे कारण नाही. त्यांनी खुशाल येऊन सहभागी व्हावे. मोर्चाचे नेतृत्व समाज करतोय. मी ओबीसीचा कार्यकर्ता म्हणून काम करतोय, एवढीच माझी भूमिका असल्याचे विजय वडेट्टीवार म्हणालेत.

# आता १३ ऑक्टोबरपासून एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

विद्युत क्षेत्रातील खासगीकरणाविरोधात राज्यातील महावितरण, महापारेषण, महानिर्मिती कंपनीतील अधिकारी- कर्मचारी महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अभियंता अधिकारी कृती समितीच्या नेतृत्वात बुधवारी मध्यरात्रीपासून संपावर गेले आहे.

त्यामुळे वीज यंत्रणा सलाईनवर असतांनाच महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीकडून एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागणीसाठी १३ ऑक्टोबरपासून आंदोलनाची घोषणा केली गेली आहे.

महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीच्या माहितीनुसार, एसटी कामगारांच्या न्याय मागणीसाठी १३ ऑक्टोबर २०२५ पासून मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथे रा. प. कामगारांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीकारिता धरणे आंदोलन सुरू केले जाईल. त्यानंतरही एसटी कामगारांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांची सोडवणूक न झाल्यास १४ ऑक्टोबरपासून नागपूर विभागातील संयुक्त कृती समिती विभागीय कार्यालय, विभागीय कार्यशाळा व सर्व आगारात बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले जाईल. टप्पा टप्पाने हे आंदोलन राज्यभरात होईल.

दरम्यान नागपूर विभागातील संयुक्त कृती समितीच्या वतीने एसटी महामंडळाचे नागपूरचे विभाग नियंत्रक विनोद चवरे आणि प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत गभने यांना निवेदन दिले गेले.

शिष्टमंडळात कृती समितीमधील महाराष्ट्र एस टी कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजय हट्टेवार, कामगार सेनेच्या राज्य महिला संघटिका यामिनी कोंगे, महाराष्ट्र मोटार फेडरेशनचे विनोद कुमार धाबर्डे, कास्टट्राईब संघटनाचे संग्राम जाधव, मकेश्वर, महाराष्ट्र परिवहन मजदूर युनियनचे मुन्ना मेश्राम, सुधाकर गजभिये, सोसायटी अध्यक्ष प्रशांत बोकडे, जेष्ठ नेते अरुण भागवत, मुरलीधर गुरपुडे, संघटनेचे विभागीय अध्यक्ष जगदीश पाटमासे, कृष्णकुमार शेरकर, शशिकांत वानखेडे, अतुल निंबाळकर, गजानन दमकोंडवार, प्रवीण अंजनकर, लक्ष्मीकांत चौधरी, डीमोले, नितेश साकरकर, शर्मा, संदीप गडकीने, रितेश देशमुख, दिनेश पारडकर यांच्या सह मोठ्या प्रमाणात कृती समितीचे सभासद उपस्थित होते. शिष्टमंडळाने एसटी महामंडळाने न्याय न दिल्यास आंदोलन आणखी तिव्र करण्याचा इशाराही दिला.

एसटी कामगारांच्या विविध मागण्यांवर शासनाने अनेक आश्वासने दिली. परंतु एकही पूर्ण केले जात नाही. त्यामुळे नाईलाजाने हे आंदोलन करावे लागत आहे. शासनाने एसटी कामगारांना न्याय न दिल्यास तिव्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. आता एसटी कामगारांवर अन्याय सहन केला जाणार नाही, असे महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीचे अजय हट्टेवार यांनी सांगितले.

## कॅण्डल लाईट प्रोटेस्ट मार्च

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ९ :

हातात मेणबत्त्या, डोळ्यांत अस्वस्थतेची ज्योत आणि ओठांवर संविधान वाचवा, लोकशाही वाचवा या घोषणा... अशा भावनिक वातावरणात चांदूर रेल्वे शहरात नागरिक, युवक, महिला, विद्यार्थी, कामगार सर्वजण एकत्र आले अन्यायाविरुद्ध आणि न्यायाच्या बाजूने!

चांदूर रेल्वे शहरात विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना व नागरिकांच्या संयुक्त विद्यमाने कॅण्डल लाईट प्रोटेस्ट मार्च काढण्यात आला. लडाखच्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करणारे पर्यावरणवादी सोनम वांगचूक यांच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवून रासुका अंतर्गत करण्यात आलेल्या अटकेचा तीव्र निषेध करण्यात आला. त्याचबरोबर भारताचे सरन्यायाधीश भुषण गवई यांच्यावर जोडा भिरकावून न्यायदेवता आणि भारतीय संविधानाचा अवमान करणाऱ्या घटनेचाही तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला.

## ओबीसीसाठी लढणारा योद्धा विजूभाऊ बोचरे यांचे आत्मबलिदान

■ महासागर प्रतिनिधी
आलेगाव (पातूर, अकोला), दि. ९ :

येथील प्रतिष्ठित ओबीसी नेते व महाराष्ट्र राज्याचे मंत्री छगनराव भुजबळ यांचे खंदे समर्थक, तसेच बाळासाहेब आंबेडकर यांचे विश्वासू अनुयायी असलेले विजय (विजू) बोचरे यांनी ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी टोकाचा निर्णय घेत आपले जीवन संपवले असल्याची दुःखद व संतापजनक घटना समोर आली आहे.

बुधवारी रात्री उशिरा आलेगाव बस स्थानक परिसरातील प्रवासी निवाऱ्यावर विजू भाऊ बोचरे यांनी आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता, त्यांच्या खिशात मुख्यमंत्री व राज्य सरकारला उद्देशून लिहिलेले ओबीसी आरक्षणाबाबतचे मागणीपत्र मिळाले. तसेच त्यांच्या डोक्यावर ओबीसी आरक्षण बचाव अशी पट्टी बांधलेली होती.

आत्महत्येपूर्वी त्यांनी सोशल मीडियावर ओबीसीचे आरक्षण वाचले पाहिजे, असा आशय असलेल्या पोस्ट व स्टेटस् टाकले होते. त्यांनी ओबीसी समाजाला न्याय मिळावा, आरक्षण टिकवण्यासाठी सरकारने ठोस भूमिका घ्यावी अशी मागणी त्या पोस्टमध्ये केली होती. ओबीसी समाजातील युवकांमध्ये संतापाची लाट असून, ओबीसीसाठी लढणाऱ्या या सच्च्या योद्ध्याला शासनाकडून काय न्याय मिळणार? असा प्रश्न सर्वत्र उपस्थित केला जात आहे.




स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, विजू भाऊ बोचरे हे समाजातील दुर्बल घटकांसाठी नेहमी झटणारे, सामाजिक न्यायासाठी कार्यरत राहिलेले आणि ओबीसी आरक्षण टिकवण्यासाठी नेहमीच लढा देणारे कार्यकर्ते होते. त्यांच्या निधनाने ओबीसी समाजात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

या घटनेचा पुढील तपास चान्नि पोलिसांकडून सुरू असून, शासनाने ओबीसी समाजाशी न्याय करावा अशी मागणी होत आहे.

## 'खजूर'मधून कोकेनची तस्करी २१.७८ कोटींचे ड्रग्ज जप्त

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

मुंबई विमानतळावर पुन्हा एकदा मोठी तस्करी उघडकीस आली आहे. महसूल गुप्तवार्ता संचालनालयाने कारवाई करत तब्बल २ किलो १७८ ग्रॅम कोकेन जप्त केले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जप्त कोकेनची किंमत २१.७८ कोटी रुपये आहे.

तस्करांनी कोकेनची तस्करी करण्यासाठी एक नवी शक्कल लढवल्याचे समोर आले आहे. त्यांनी खजुराच्या पॅकेटमधून खजूर बाहेर काढून त्यातील बिया काढून टाकल्या आणि त्यांच्या जागी कोकेन भरून तस्करी करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सुरक्षा रक्षकांनी हा डाव उधळून लावला.

डीआरआयने केलेल्या या कारवाईत सिएरा लिओनवरून आलेल्या एका प्रवाशासह, कोकेनची डिलिव्हरी घेण्यासाठी आलेल्या दुसऱ्या एका व्यक्तीलाही अटक करण्यात आली आहे. जप्त केलेली पावडर कोकेन असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आरोपींवर एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोकेन कुठून आणले होते, ते भारतात कुठे पोहोचवले जाणार होते आणि या तस्करीचे भारताशी आणखी कुठे कनेक्शन आहे, याचा कसून तपास सध्या पोलीस करत आहेत. विमानतळ सुरक्षा यंत्रणा आणि पोलिसांचे हे मोठे यश मानले जात आहे. विविध माध्यमातून ड्रग्ज आणण्याचे प्रकार यापूर्वीही उघडकीस आले आहेत.

## मुंबईतील महापालिका रुग्णालये व्हेंटिलेटरवर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

मुंबईतील महापालिका रुग्णालयांची दयनीय अवस्था दिवसेंदिवस उघड होत असून, महापालिकेचा ७ हजार कोटी रुपयांचा आरोग्य विभागाचा निधी नेमका जातो कुठे? असा संतप्त सवाल मुंबई काँग्रेस अध्यक्षा आणि खासदार वर्षा गायकवाड यांनी उपस्थित केला आहे.

त्यांनी विलेपार्ले येथील आर. एन. कूपर रुग्णालयाला भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. रुग्णालयातील अस्वच्छता, औषधांचा तुटवडा आणि कर्मचारीसंख्येची कमतरता पाहून त्यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दात निशाणा साधला.

माध्यमांशी बोलताना गायकवाड म्हणाल्या की, कूपर रुग्णालयाची अवस्था गेल्या अनेक महिन्यांपासून अत्यंत दयनीय आहे. रुग्णांसाठी योग्य सुविधा नाहीत, औषधांचा तुटवडा आहे, कर्मचारीसंख्या अपुरी आहे आणि मूलभूत सुविधांचा अभाव आहे. रुग्णालयात उंदरांचा सुळसुळाट झाला आहे. मुंबई मनपाकडे दरवर्षी आरोग्य विभागासाठी ७ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला जातो. मात्र, या निधीतून रुग्णालयांना काहीच मिळत नाही, असा आरोप गायकवाड यांनी केला.

## प्रेमी युगुलाची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ९ :

घाटंजी शहरापासून १५ किलोमीटर अंतरावरील जुनोनी शेतशिवारात एका अल्पवयीन प्रेमी युगुलाने विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली.

दुपारी शेतकरी आपल्या शेतातील विहिरीकडे गेले असता त्यांना विहिरीत दोन मृतदेह तरंगताना दिसले. सदर युगुल ५ ऑक्टोबरपासून घरातून बेपत्ता होते. मुलीच्या वडिलांनी ७ ऑक्टोबर रोजी घाटंजी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी तत्काळ शोधमोहीम सुरू केली होती. घटनास्थळी घाटंजी पोलिसांनी पंचनामा करून तपास सुरू केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली घाटंजी पोलिस तपास करीत आहेत.

## शिवसेना ठाकरे गटाचे रेवतकर अजित पवारांच्या राष्ट्रवादीत



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

नागपूर शहराच्या स्थानिक राजकारणात एक मोठी घडामोड घडली. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उपजिल्हाप्रमुख मुकेश रेवतकर यांनी आपल्या समर्थकांसह भंडारा येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केल.

पक्ष निरीक्षक राजेंद्र जैन, शहराध्यक्ष अनिल अहिरकर, कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष नानाभाऊ टाकसाळे, माजी मंत्री नानाभाऊ पंचबुद्धे, भंडारा जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे, महासचिव धनंजय दलाल, तसेच चंद्रकांत नायक, लक्ष्मण बालपंडे, ईश्वर कोल्हे आदी नेते उपस्थित होते.

मुकेश रेवतकर हे दक्षिण नागपूर मधील शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. रेवतकर यांच्या पक्ष प्रवेशामुळे नागपूर दक्षिण मतदारसंघात राष्ट्रवादीची ताकद वाढणार, असा विश्वास राजेंद्र जैन यांनी व्यक्त केला.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेते, कार्यकर्त्यांचे पक्षांतर वाढू लागले आहे. विरोधी पक्षातील कार्यकर्ते, नेते सत्ताधारी महायुतीतील घटक पक्षात प्रवेश करीत आहे. रेवतकर यांच्या राष्ट्रवादीतील प्रदेशाकडे याच अनुषंगाने बघितले जात आहे.

## लोकरंजन

### स्त्रीशक्तीचा उत्सव करणारा मराठी चित्रपट

## लग्न आणि बरंच काही

मराठी चित्रपटसृष्टीत एक आगळावेगळा आणि ऐतिहासिक टप्पा गाठला जाणार आहे. लग्न आणि बरंच काही हा नवा मराठी चित्रपट पूर्णपणे महिला शक्तीच्या बळावर साकार होणार आहे.

या चित्रपटाचे सर्व टप्पे स्त्रियांच्या कुशल हातांनी पार पाडले जाणार आहेत.या चित्रपटाचे दिग्दर्शन वेदांती दाणी करणार असून, निर्मितीचा मान डॉ संजना सुरेश पै आणि अंजली नान्नजकर यांच्याकडे आहे. कथा लेखिका यशश्री मसुरकर ह्या लिहिणार आहेत.

ह्या चित्रपटाचे छायाचित्रण स्मिता निर्मल करणार आहेत, तर संगीत दिग्दर्शन वैशाली सामंत करणार आहेत. अभिनयाच्या माध्यमातून या चित्रपटाला जिवंत रूप देणार आहेत लोकप्रिय आणि प्रतिभावान अभिनेत्री पूजा सावंत आणि शर्मिला राजाराम शिंदे.प्रत्येक पायरीवर महिलांचाच ठसा असलेला हा आगळावेगळा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीसाठी आणि महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने एक अभिमानास्पद पाऊल ठरेल.




महिलांच्या जीवनातील सूक्ष्म भावना, अनुभव, स्वप्नं आणि संघर्ष या चित्रपटाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच लग्नानंतरचं आयुष्य मुलीसाठी केवळ नव्या जबाबदाऱ्यांचं दार उघडत नाही, तर ते तिच्या जीवनप्रवासातील एक नवा अध्याय, नवी वाटचाल आणि नातेसंबंधांच्या नव्या ओळखींचा आरंभ ठरतो, हे सर्व लग्न आणि बरंच काही या सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे.

■ ■ ■

### एका लव्ह स्टोरीच्या अरेंज मॅरेजची गोष्ट

एव्हरेस्ट एंटरटेनमेंट प्रस्तुत प्रेमाची गोष्ट २ लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचा टिझर आणि गाणी आधीच चर्चेत असून नुकताच प्रदर्शित झालेला ट्रेलर पाहिल्यानंतर प्रेक्षकांची उत्सुकता आणखीच वाढली आहे..

ट्रेलरमध्ये लालितच्या आयुष्यात आलेली वळणं ठळकपणे दिसत आहेत. लग्न, घटस्फोट आणि त्यानंतर पुन्हा समोर आलेलं जुनं प्रेम. या सगळ्यामुळे त्याचं आयुष्य जणू एका वादळात सापडलं आहे. स्वतःच्या चुकांचा आणि नशिबाचा हिशेब करताना तो सगळ्याचा दोष देवाला देताना दिसतोय. परंतु देव त्याला खरंच नशिब बदलण्याची दुसरी संधी देणार का? आणि दिलीच, तरी लालितचं नशिब खरंच बदलेल का? याचं उत्तर प्रेक्षकांना चित्रपट पाहूनच मिळणार आहे.

चित्रपटात आजच्या काळातील प्रेमाचे वास्तव, त्यातील बदलती नाती, डिजिटल युगातील संवादाचे रूप आणि व्हीएफएक्स यांचा सुंदर मिलाफ यात आहे. आधुनिक तंत्रज्ञान, भावनांनी भरलेली कथा आणि सतीश राजवाडेंची खास प्रेमकथेची मांडणी या सगळ्यांचा अनोखा संगम प्रेमाची गोष्ट २ च्या ट्रेलरमधून दिसत आहे. एव्हरेस्ट एंटरटेनमेंटचे निर्माते संजय छाब्रिया आणि सह-निर्माते अमित भानुशाली यांचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प असून, दिग्दर्शनाची जबाबदारी सतीश राजवाडे यांनी सांभाळली आहे.




या चित्रपटात ललित प्रभाकर, ऋचा वैद्य, रिधिमा पंडित, स्वप्निल जोशी, भाऊ कदम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ह्यप्रेम आणि नशिबाचा हा जादुई प्रवास प्रेक्षकांना २१ ऑक्टोबर म्हणजेच दिवाळीच्या शुभमुहूर्तावर अनुभवायला मिळणार आहे.

■ ■

### जिद्द आणि सामर्थ्याच्या अदम्य प्रवासाची प्रेरणादायी गाथा आता मोठ्या पडद्यावर

श्रेयस तळपदे आणि एफ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. सादर करीत आहेत अशी कथा जी केवळ मनोरंजनापुरती मर्यादित नसून प्रत्येक स्त्रीच्या सामर्थ्याला, तिच्या सहनशीलतेला आणि तिच्या अदम्य धैर्याला उजाळा देणारी आहे.

दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर या चित्रपटाची नांदी संपन्न झाली. हा चित्रपट प्रत्येक स्त्रीमध्ये असलेल्या सुप्त शक्तीचे दर्शन घडवणार आहे.

असू देत लाख महिषासुर... पुरे आहे फक्त एक 'मर्दिनी' या संकल्पनेवर आधारित असलेला हा चित्रपट समाजातील वाईटाच्या विरोधात उभारी घेणाऱ्या एका सामान्य स्त्रीच्या अलौकिक शौर्याची गोष्ट सांगेल.

निर्माते श्रेयस तळपदे यांनी यावेळी सांगितले, प्रेक्षकांना नेहमीच काहीतरी वेगळं देण्याची परंपरा एफ्लुएन्स मोशन पिक्चर्सने कायम ठेवली आहे. पोस्टर बॉईज, बाजी आणि सनई चौघडे यांसारख्या अनेक चित्रपटांमधून मिळालेलं प्रेक्षकांचं अपार प्रेम या बॅनरच्या नावाला अधिकच उजाळा देतं. गुणवंतांना सदैव प्राधान्य देणाऱ्या या बॅनरने सई ताम्हणकर, तृप्ती डिंमरी, अनिता दाते यांसारख्या अनेक कलाकारांना तसेच कॅमेरामॅन आणि दिग्दर्शकांना प्रकाशझोतात आणलं आहे.

आता मर्दिनी या सिनेमाच्या निमित्ताने अजय मयेकर दिग्दर्शक म्हणून पहिल्यांदाच या नव्या प्रवासाला सुरुवात करणार आहेत. लवकरच या चित्रपटाचं भव्य चित्रिकरण सुरु होणार आहे.

मर्दिनी हा केवळ एक चित्रपट नसून प्रत्येक स्त्रीमध्ये दडलेल्या अंतर्गत शक्तीला साजरा करणारा एक उत्सव आहे. आशा आहे कि या सिनेमाला सुद्धा प्रेक्षक प्रेम देतील.

■ ■ ■



### श्रियाला भेटून पाणावले डोळे



मालिका म्हणजे प्रेक्षकांचं एक नवीन कुटुंब असतं. सन मराठीवरील 'इन्स्पेक्टर मंजू' या मालिकेला प्रेक्षकांकडून अफाट प्रतिसाद मिळत आहे. याआधी ८४ वर्षांचे आजोबा सत्या- मंजूची गोष्ट खरी आहे असं समजून थेट सेटवर पोहोचले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा मालिकेची गोष्ट खरी आहे असं समजून सत्या- मंजूला भेटण्याचा हट्ट करणारी चाहती समोर आली आहे.

मुंबईच्या जोगेश्वरीत राहणारी श्रिया नाईक ही सत्या-मंजूची मोठी चाहती आहे. श्रियाला डाउन सिंड्रोम हा आजार आहे. ती या मालिकेतील पात्रांना आपले खरे मित्र समजते. मालिकेत मंजूला गोळी लागल्यापासून श्रिया अस्वस्थ होत नेहमी साताऱ्याला जाण्याचा हट्ट आईबाबांकडे करत असते. तिला बरं वाटावं म्हणूनच मालिकेतील कलाकार सत्या आणि मंजूने थेट तिच्या घरी पोहोचून खास सरप्राईज दिलं. कलाकारांना समोर पाहताच श्रिया आनंदाने भारावून गेली.

यावेळी सत्या-मंजूने तिला एक सुंदर फोटो फ्रेम गिफ्ट केली ज्यात त्यांचा आणि श्रियाचा फोटो आहे. हा क्षण श्रियासाठी अविस्मरणीय ठरला. श्रियाच्या या प्रेमावर मंजू म्हणजेच अभिनेत्री मोनिका राठी म्हणाली की, मंजूला मिळणार हे प्रेम पाहून मी निशब्द आहे. सातारा ते मुंबई हा प्रवास पहिल्यांदा फार वेगळा होता. कारण आज मी आणि सत्या आमच्या एका फॅनला भेटण्यासाठी मुंबईला आलो आहोत. श्रिया आमच्या मालिकेतील प्रत्येक पात्रावर भरभरून प्रेम करते.

प्रत्येक भाग तिने बारकाईने पहिला आहे. ती म्हणाली, मम्मीसाहेबांना मी चांगलाच धडा शिकवेन. हे वाक्य ऐकून मला धक्का बसला. कारण ती मालिकेत इतकी गुंतली आहे. ती डाऊन सिंड्रोम या आजारात आहे आणि या सगळ्यात ती मंजूला तिची खास मैत्रीण मानते. हे सगळं ऐकून आणि आज प्रत्यक्षात तिला भेटून मी भरून पावले.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

महासागर

नागपूर वृत्तसागर

■ शुक्रवार, दि. १०, ऑक्टोबर २०२५ ■


# दरोड्याच्या तयारीतील टोळीला अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

नंदनवन पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीवर धाड टाकून ४ आरोपींना अटक केली. त्यांचे २ साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाले. पोलिसांनी अटकेतील आरोपींकडून घातक शस्त्रांसह १.८१ लाखांचा माल जप्त केला आहे. अफरोज शमशाद अंसारी (२४) रा. ठक्करवाडी, फय्याज इजाज अंसारी (२४) रा. गंगाबाग-पारडी, आदित्य भरत शर्मा (२०) रा. दुर्गानगर-भांडेवाडी आणि सय्यद साहील उर्फ फल्ली सय्यद जलाल (२१) रा. हसनबाग अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. फरार आरोपी फिरोज शमशाद अंसारी रा. ठक्करवाडी आणि शहबाज (२४) रा. हसनबाग यांचा शोध पोलिस घेत आहेत.

बुधवारी पहाटे ४.१५ वाजताच्या सुमारास नंदनवन पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान वाठोडा गावात एनआयटी मैदानाजवळील कच्च्या रोडवर ही असामाजिकतत्व शस्त्रास्त्रासह जमले असून ते काहीतरी मोठा गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी तेथे धाड टाकली. पोलिसांना पाहताच आरोपींमध्ये खळबळ उडाली. पोलिसांपासून वाचण्यासाठी त्यांनी पळ काढला. मात्र पोलिसांनी घेराबंदी करून चौघांना पकडले. त्यांचे दोन साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाले. अटकेतील आरोपींची झडती घेतली असता त्यांच्याजवळ चाकू, तलवार, गुप्ती, कटीनी, तिखट व दोरी सापडली. आरोपी कुठेतरी दरोड्याच्या टाकण्याच्या तयारीत होते.

# कफ सिरप प्रकरणातील दोषींना सोडणार नाही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

नागपूरः मध्य प्रदेशच्या छिंदवाडा जिल्ह्यात कफ सिरफ प्राशन करून मोठ्या संख्येने लहान मुले आजारी पडले. त्यापैकी काहींचा मृत्यू झाला. नागपुरातील विविध रुग्णालयांतही १६ मुले दगावली. दरम्यान नागपुरात उपचार घेत असलेल्या मुलांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव गुरूवारी नागपुरात आले. एम्समधील रुग्णांची पाहणी केल्यावर त्यांनी कफ सिरप प्रकरणातील दोषींना पोलीस सोडणार नसल्याचे सांगितले. याबाबत आपण जाणून घेऊ या.

मुख्यमंत्री मोहन यादव म्हणाले, कफ सिरपमुळे आजारी पडलेल्या मुलांची विचारपूस करण्यासाठी नागपूरमधील एम्स रुग्णालयाला मी भेट दिली. नागपूर प्रशासनासोबतच, एम्स प्रशासन देखील मुलांची पूर्ण काळजी घेत आहे. आम्ही रुग्णवाहिकेसह चांगल्या उपचारांसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा पुरवण्यास तयार आहोत. सरकार सर्व व्यवस्था करण्यास तयार आहे. ज्यांनी चूक केली आहे त्यांना पोलीस सोडणार नाहीत. सरकार दोषींवर कठोर कारवाई करणार आहे. या प्रकरणातील जबाबदार एकालाही सोडले जाणार नाही.



मुख्यमंत्री मोहन यादव यांनी केली एम्समधील रुग्णांची पाहणी

दरम्यान मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव गुरूवारी दुपारी नागपुरात पोहोचले. विमानतळावरून ते थेट नागपूरमधील एम्स हॉस्पिटलमध्ये गेले, जिथे मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील दोन मुले, जी कफ सिरप पिल्याने आजारी पडली होती, त्यांच्यावर उपचार केले जात आहेत. एम्सनंतर, मोहन यादव नागपूरमधील हेल्थ सिटी हॉस्पिटलला भेट देतील, जिथे एका मुलावर उपचार केले जात आहे. त्यानंतर नागपूरमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला (मेडिकल) भेट देतील, जिथे छिंदवाडा येथील दुसऱ्या मुलावर उपचार केले जात आहेत.

दरम्यान नागपुरात गेल्या महिनाभरात, मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील ३६ कफ सिरपशी संबंधित मुले उपचारासाठी दाखल झाली. त्यापैकी १६ मुलांचा मृत्यू झाला. छिंदवाडाच्या पारसिया तहसीलमधील मोहडोंगरी गावातील रहिवासी असलेल्या ३ वर्षीय मयंक सूर्यवंशी यांचे काल रात्री १२ वाजता नागपूरच्या मेडिकल रुग्णालयात निधन झाले. २६ सप्टेंबर रोजी मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे मयंक यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. पारसियाचे डॉक्टर अमित ठाकूर यांनी त्यांना कोल्ड्रिफ कफ सिरप लिहून दिले.

२४ सप्टेंबर रोजी कोल्ड्रिफ घेतल्यानंतर, मयंक यांची प्रकृती बिघडली आणि त्यांच्या कुटुंबियांनी त्यांना पुन्हा डॉ. अमित ठाकूर यांच्याकडे नेले. त्यांनी कोल्ड्रिफचा दुसरा डोस लिहून दिला. २५ सप्टेंबर रोजी त्यांची लघवी थांबली. त्यांची प्रकृती बिघडली आणि २६ तारखेला त्यांना नागपूरला दाखल करण्यात आले, जिथे काल रात्री उशिरा मयंक यांचे निधन झाल्याची माहिती मयंकचे वडील निलेश सुर्यवंशी यांनी दिली. याप्रसंगी त्यांना अश्रू अनावर झाले.

# विभागीय क्रीडा संकुलासाठी शंभर कोटी रुपये वितरीत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विदर्भातील क्रीडा क्षेत्रासाठी कटिबध्दता**

विदर्भातील खेळाडूंना आपल्या क्रीडा कौशल्यात अधिक निपुणता यावी, येथून आंतरराष्ट्रीय पातळीवरचे क्रीडापटू घडावेत या उद्देशाने मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुल येथे क्रीडा सुविधा विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शंभर कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे क्रीडा संकुलाकरीता मंजूर झालेला निधी वितरीत करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मानकापूर येथील क्रीडा संकुल येथे काही महिन्यांपूर्वी प्रत्यक्ष भेट देऊन विकास कामाबाबत आढावा घेतला होता. नागपूर महानगरात प्रत्येक प्रभागात व्यापक प्रमाणात उपलब्ध जागेप्रमाणे क्रीडा सुविधा देण्याचे निर्देश त्यांनी महानगर पालिका प्रशासनाला देऊन क्रीडा क्षेत्रावर विशेष भर दिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विभागीय क्रीडा संकुलाच्या कामाला गती देण्यासाठी विशेष पाठपुरावा करुन हा शंभर कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन घेतला आहे. शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणेच्या धर्तीवर नागपूर येथील विभागीय क्रीडा संकुलाला यापूर्वीच अद्ययावतीकरण व नुतनीकरण करुन त्यास राज्यस्तरीय क्रीडा संकुलाचा दर्जा देण्यात आलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील क्रीडा विकासाला प्राधान्य देण्यात येत आहे. या अनुषंगाने नागपूर येथील विभागीय क्रीडा संकुलाचे सुधारीत अंदाजपत्रकात अंतर्भूत असलेल्या विविध कामांपैकी इमारत बांधकामे व क्रीडा सुविधांच्या प्रस्तावास उच्चस्तरीय सचिव समितीच्या ११ मार्च २०२४ च्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. क्रीडा संकुलासाठी प्राप्त झालेल्या एकूण ७४६.९९ कोटी रुपयाच्या अंदाजपत्रकास एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे.

## ऑक्टेव्हमधून पूर्वोत्तर संस्कृतीचा मिलाफ : डॉ. रवींद्र सिंगल

# नॉर्थ इस्ट ऑक्टेव्ह सांस्कृतिक महोत्सवाला प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या माध्यमातून यापूर्वी अनेक महोत्सव आयोजित झाले. नागपूरकरांनी त्यांना उदंड प्रतिसाद दिला. अनेक वर्षांनंतर होणाऱ्या ऑक्टेव्ह-2025 महोत्सव होत असून यात खऱ्या अर्थाने पूर्वोत्तर राज्यांच्या संस्कृतींचा मिलाफ नागपूरवासियांना अनुभवता येणार आहे, असे प्रतिपादन पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांनी केले.



भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या मार्गदर्शनात पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नॉर्थ-ईस्ट फेस्टिवल "ऑक्टेव्ह" चे उद्घाटन डॉ. रवींद्र सिंगल यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ सिंघल यांनी प्रथम कार्यक्रमस्थळी लागलेल्या पूर्वांचल वस्तूच्या प्रदर्शनाचे फीत कापून उद्घाटन केले.

यावेळी दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या संचालिका आस्था कार्लेकर, उपसंचालक दीपक कुळकर्णी, लेखाधिकारी दीपक पाटील, पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र संचालक फुरकान खान व कार्यक्रम अधिकारी हेमंत मेहता उपस्थित होते. डॉ. सिंगल यांनी, हा महोत्सव देशभरात विविध ठिकाणी होणार आहे.

यानंतर ही संधी पुन्हा कधी मिळेल याची शाश्वती नाही. त्यामुळे पूर्वोत्तर संस्कृतीचे रंग, त्यातील भाव आणि दृढता अनुभवण्यासाठी नागरिकांनी अधिक संख्येने महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## सणासुदीच्या पार्श्वभूमीवर ११ व १२ ऑक्टोबर रोजी

# आपली बसची विशेष वाहतूक व्यवस्था

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९

आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर नागपूर महानगरपालिका परिवहन विभागाच्या आपली बस तर्फे शनिवार ११ ऑक्टोबर आणि रविवार १२ ऑक्टोबर रोजी विशेष बस वाहतूक उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश नागपूरकरांना सणाच्या काळात सुरळीत व सोयीस्कर प्रवास सुविधा उपलब्ध करून देणे आहे. प्रवाशी आपली बस सेवेला उत्तम प्रतिसाद देत आहेत. नुकतेच आपली बस ने ६ ऑक्टोबर रोजी प्रवाशी संख्येत विक्रमी नोंद केली आहे. एकाच दिवशी १ लाख ८२ हजार,१४८ प्रवाश्यांनी प्रवास केला आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात, उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक राजेश भगत यांच्या नेतृत्वात राबविण्यात आलेल्या विशेष उपक्रमानुसार शहरातील प्रमुख मार्गावर बस सेवा सकाळी ०६:०० वाजल्यापासून रात्री ९:३० वाजेपर्यंत (२१:३० तास) सुरू राहील.

सणासुदीच्या काळात बाजारपेठा, मंदिरे आणि विविध ठिकाणी होणाऱ्या गर्दीचा विचार करून ही व्यवस्था करण्यात आली आहे. आपली बस व्यवस्थापनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, सणाच्या दिवसांत खासगी वाहनांचा वापर कमी करून सार्वजनिक वाहतुकीचा अवलंब करावा, ज्यामुळे वाहतुकोंडीचा ताण कमी होईल आणि प्रदूषणातही घट होईल. प्रवासी एनएमसी चलो मोबाइल ॲपच्या माध्यमातून बसचे वास्तविक-वेळेतील स्थान आणि वेळापत्रक पाहू शकतात तसेच डिजिटल पेमेंटचा वापर करून सोयीस्कर प्रवासाचा आनंद घेऊ शकतात.

## माफसूचा जागतिक अंडी दिनानिमित्त

# ५००१-अंडा भुर्जीची तयारी १२ ऑक्टोबर रोजी




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू), नागपूर अंतर्गत असलेल्या नागपूर पशुवैद्यक "जागतिक अंडी दिन २०२५" साजरा करणार येत आहे. माफसू च्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आला आहे.दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात जागतिक अंडी दिन जगभरात साजरा केला जातो. या वर्षी जागतिक अंडी दिन २०२५ ची थीम "दे माईटी एग: पॅक्ड विथ नॅचरल न्युट्रिशन" आहे. यावर्षी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, भारतीय कुक्कुट विज्ञान संघटना आणि राष्ट्रीय अंडी समन्वय समिती यांच्या सहकार्याने, ५००१ अंडी वापरून "अंडा भुर्जी" तयार करण्याचा एक जागतिक विक्रम करण्याचा प्रयत्न करीत आहे. या कार्यक्रमाचे नेतृत्व प्रसिद्ध सेलिब्रिटी

**महाशेफ विष्णू मनोहर यांचा ऐतिहासिक विश्वविक्रम**

शेफ विष्णू मनोहर करतील. हा कार्यक्रम रविवार, १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ८:०० वाजता नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, सेमिनरी हिल्स, नागपूर येथे आयोजित केला आहे. भव्य उत्सवाचे साक्षीदार म्हणून प्राध्यापक विद्यार्थी, उपस्थमाला माफसु चे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, नागपूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी डॉ. विपिन इटनकर, नागपूरचे पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, सह इतर मान्यवर, स्थानिक प्रशासक आणि नागरिकांसह अंदाजे ३,५०० लोक सहभागी होतील अशी माहिती पत्रकार परिषदेत माफसू चे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी दिली. त्यावेळी उपस्थित प्रा.डॉ.मुकुंद कदम, डॉ.जयंत कोरडे , डॉ. राजेश लिमसे आदि उपस्थित होते.

# ४४०७ सफाई कर्मचाऱ्यांना मनपाच्या सेवेत सामावून घेणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९

**मनपातील लाड-पागे समितीच्या शिफारसींना मान्यता**

नागपूर महानगरपालिकेत सेवानिवृत्त झालेल्या किंवा मृत पावलेल्या सफाई कामगारांच्या वारसांना लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू करण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने आज (ता. ९) घेतला आहे. यामुळे शहरातील ४४०७ सफाई कर्मचाऱ्यांना लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार नागपूर महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेतले जाणार आहे. यामुळे सेवानिवृत्त झालेल्या किंवा मृत पावलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नागपूर महापालिकेत सफाई कर्मचारी म्हणून सामावून घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह आमदारांच्या पुढाकाराने हा प्रश्न मार्गी लागला आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या ४४०७ ऐवजदार कर्मचाऱ्यांसाठी सफाई कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करण्यास राज्य सरकारने या शासन निर्णयाने मान्यता दिली आहे. यात या ४४०७ सफाई कर्मचाऱ्याचाही समावेश आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासन डॉ. अभिजीत चौधरी यांनी या सफाई कर्मचाऱ्यांना नागपूर महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला होता. या प्रस्तावाला मान्यता देऊन राज्य सरकारने नागपुरातील सफाई कर्मचार्याच्या वारसांसाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. ऐवजदार कर्मचाऱ्यांना नियमित करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली अधिसंख्य पदे त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर आपोआप व्यपगत होत असल्याने त्यांच्या वारसांना नव्याने नियुक्ती देण्यास प्रशासकीय अडचणी निर्माण झाल्या होत्या. यामुळे नागपूर महानगरपालिकेत २० सप्टेंबर २०१९ ते १० मे २०२३ या कालावधीत पदावर सामावून घेण्यात आलेल्या व या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या किंवा मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना यापुढे लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काचा लाभ देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# दुचाकीच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**नागपूर** : कामावरून घरी जात असताना भरधाव असलेल्या मोटारसायकलस्वाराने जबर धडक दिली. यात गंभीर जखमी वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. प्रभाकर आनंद कुंभलवार (७३) रा. रामजी आंबेडकरनगर, आठवा मैल असे मृताचे नाव आहे. प्रभाकर हे अमरावती मार्गावरील पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या रोप वाटिकेत सुरक्षा रक्षकाचे काम करीत होते.अमरावती मार्गावर इस्रो दुर संवेदन केंद्राच्या भिंतीसमोर मागून भरधाव आलेल्या दुचाकी चालक दीपक शंकर चव्हाण (२४) याने त्यांना जबर धडक दिली.

# सरन्यायाधीशांवर झालेल्या हल्ल्याचा सावनेर बार असोसिएशनतर्फे निषेध




■ महासागर प्रतिनिधी सावनेर, दि. ९ :

दि. ८ ऑक्टोबर (प्रतिनिधी) – भारताचे मुख्य न्यायाधीश मा. बी. आर. गवई यांच्या संदर्भात नुकत्याच घडलेल्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यासाठी सावनेर बार असोसिएशनतर्फे दि. ७ ऑक्टोबर ला निषेध सभा घेण्यात आली.

या सभेचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ अधिवक्ता ॲड. आर. आर. ठावरे यांनी भूषविले. सभेमध्ये ॲड. पांडे, ॲड. विनोद कऊटकर तसेच तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. शैलेश जैन यांनी आपले विचार व्यक्त केले. वक्त्यांनी सदर घटनेची तीव्र शब्दांत निंदा करून न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्याची गरज अधोरेखित केली. सभी के संचालन सचिव ॲड. निंबाळकर यांनी तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष ॲड. सोनकुसरे यांनी केले. सभेच्या अखेरीस सर्व सदस्यांनी एकमताने ठराव पारित करून, दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी न्यायालयाचे कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार न्यायालयाला कळवून, न्यायालयीन कामकाजात वकिलांनी सहभाग घेतला नाही, व बंद पाळण्यात आला. तालुका वकील संघाच्या सभासदांनी नारेबाजी करून रोष व्यक्त केला. बंद यशस्वी करण्याकरिता ॲड. ठावरे, एड.पांडे, ॲड. गायधने, ॲड. .बाणाइत, एडवोकेट शर्मा तालुका बार चे अध्यक्ष ॲड. शैलेश जैन,उपाध्यक्ष ॲड. सोनकुसरे,सचिव एड. निंबाळकर, ॲड. पिसे, ॲड. खंगारे, ॲड. पुरे, एड.काळे ,एड. मनपे, ॲड. गोंधूळे, ॲड.माधुरी चौधरी, ॲड. उरकुडे, ॲड. शेंडे, ॲड. गजभिये, ॲड. महेश्वरी, ॲड. वांद्रे, सह तालुका वकील संघाचे सर्व पदाधिकारी आणि सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

# उड्डाणपुलावरून खाली पडल्याने तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ९ :

कामठी रोड उड्डाणपुलावरून खाली पडल्याने जखमी मोटार सायकलस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. कुणाल रमेश रंगारी (३०) रा. कुंभारे कॉलनी, कामठी असे मृताचे नाव आहे. गत २ ऑक्टोबरच्या रात्री २ वाजताच्या सुमारास कुणाल त्याच्या एमएच-४०/सीएल-०७१९ क्रमांकाच्या मोटारसायकलने घरी जात होता. कामठी रोड मेट्रो उड्डाणपुलावरून जात असताना ऑटोमोटिव्ह चौकाजवळ त्याचा तोल गेला. मोटारसायकल स्लीप होऊन पुलाच्या सुरक्षा भिंतीवर धडकली. ही धडकेमुळे कुणाल उसळला आणि थेट पुलावरून खाली पडला. स्थानिक नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. कपिलनगर पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्याला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती करण्यात आले होते. बुधवारी रात्री उपचारादरम्यान कुणालचा मृत्यू झाला. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# रामटेक येथे गोंगपाचा विविध मागण्यासह आरक्षण बचाव जनआक्रोश मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी रामटेक, दि. ९ :

गोंडवाना गणतंत्र पार्टी आणि संयुक्त कृती समितीच्या वतीने गुरूवारी आज दि.९ ऑक्टोंबरला रामटेक तहसील कार्यालय येथे विविध मागण्यासह आरक्षण बचाव महाजनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व गोंडवाना गणतंत्र पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजे वासुदेवशाह टेकाम यांनी केले. मोर्चा मार्ग गोटूल पेनठाणा-शितलवाडी-टी पॉईंट-बसस्टँड चौक-डॉ. आंबेडकर चौक-गांधी चौक मार्गे रामटेक तहसील कार्यालय येथे धडक मोर्चा काढण्यात आला.



यावेळी खालील विविध मागण्यासह मोर्चातील शिष्टमंडळाने रामटेक उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांना निवेदन दिले. मोर्चाच्या मागण्या अनुसूचित जमातींचे आरक्षण वाचविणे, आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात प्राधान्य, नोकरीतील अनुशेष भरणे, वन जमिनींचे पट्टे वाटप, तसेच बंजारा व धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करु नये,आदिवासी तसेच डोंगराळ भागामध्ये पर्यायी शिक्षक रुजु होइपर्यंत या भागातून बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करू नये. आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत वर्ग १ ली पासून त्वरीत प्रवेश देण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करावी. नोकरीतील आदिवासींचा अनुशेष त्वरीत भरण्यात यावा. आदिवासीना वनवासी संबोधना-यांवर ॲट्रासिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल करावे. आदिवासींच्या जमीनी लीजवर देण्याचा शासन निर्णय घेऊ नये यामुळे आदिवासी भूमीहीन व बेरोजगार होईल.

आदिवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांचा डी बी टी प्रक्रियाबंद करून जेवणाची व्यवस्था पूर्वीच्या प्रमाणे सुरू करावी. नागपूर जिल्ह्यात नुकतेच झालेल्या नुकसानीसाठी सरसकट पंचनामे करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी.

नॅशनल पेंच टायगर प्रकल्प येथे वारंवार वाघ व हिंसक प्राण्यांच्या हल्ल्यामुळे शेतक-यांचे बळी गेले असून लाखो पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या शेतीच्या संरक्षणासाठी झटका मशीन वाटप करण्यात यावे. अश्या विवाध मागण्यासह हजारोंच्या संख्येने भव्य विराट मोर्चा काढण्यात आला.

यावेळी गोंडवाना गणतंत्र पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजे वासुदेवशाह टेकाम, गोंगपा चे प्रदेशाध्यक्ष हरिष उईके, हरिशचंद्र सरियाम, निलकंट कुमरे, बाळकृष्णा वाडीवे, पितांबर कोकोडे, हिरामन कुमरे, रामचंद्र अडमाची, विजय कोकोडे,रामचंद्र धुर्वे,आनंद धुर्वे, ज्ञानसींग खंडाते,ऑल इंडीया आदिवासी ऐम्लाईज फेडरेशन नागपूर अध्यक्ष मधुकर उईके, ऑल इंडीया आदिवासी एम्वाईज फेडरेशन रामटेक अध्यक्ष मधुकर वरखडे, सचिव प्रदीप कुंभरे, दुर्गावती सरीयाम, गंगाताई टेकाम, मिराताई कुमरे, रेखाताई मडावी, नितेश गजाम, बंडू टेकाम, कैलास मसराम, राजेश सयाम, उमेश भांडारकर,शांता कुमरे, मुकेश पेंदाम सह या आंदोलनात हजारोंच्या संख्येने समाजबांधव, हितचिंतक आणि सामाजिक संस्था मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# तब्बल ९ तास चाललेली सभा अनेक मुद्द्यांवर गाजली

## आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने शिक्षण उपसंचालक यांच्यासोबत समस्या निवारण सभा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' या उपक्रमाअंतर्गत विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर यांच्यासोबत नागपूर विभागातील कार्यरत, सेवानिवृत्त शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारणार्थ समस्या निवारण सभा मंगळवार ७ ऑक्टोबर रोजी कै. आबासाहेब खेडकर सभागृह, जिल्हा परिषद, नागपूर येथे पार पडली. तब्बल ९ तास चाललेली सभा प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्य.) / वेतन पथक अधीक्षक भंडारा, वाढीव टप्पा वाढ अनुदान पत्र, प्रलंबित शालार्थ आयडी व अन्य मुद्द्यांवर गाजली.

सभा दुपारी १ वाजता सुरु झाली. सभेत प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. भंडारा व वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) भंडारा यांच्या नियमबाह्य व अनियमिततेच्या प्रकरणांवर चर्चा करण्यात आली. भंडारा जिल्ह्यातील शिक्षकांची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याने सभेत रोष व्यक्त करण्यात आला. हा विषय



बैठकीत सभेत चांगलाच गाजला. आमदार सुधाकर अडबाले यांच्या मागणीनंतर शिक्षण संचालक पुणे यांनी त्यांची चौकशी सुरु केली आहे.

नागपुरात शालार्थ आयडी घोटाळा उघडकीस आल्यानंतरपासून नवीन नियुक्त शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शालार्थ आयडी देण्यात आल्या नव्हत्या. तसेच आता शासनाने सर्व कागदपत्रे हे ऑनलाईन केल्याने आयडी मिळण्यास विलंब होत होता.

त्यामुळे सभेत आमदार सुधाकर अडबाले यांनी नागपूर विभागाचा जिल्हानिहाय आढावा घेतला. जिल्हानिहाय प्रलंबित प्रकरणे तात्काळ ऑनलाईन करून शालार्थ आयडी देण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण उपसंचालक यांना सूचना दिल्या.

खासगी अनुदानित शाळा/ तुकड्यांवर कार्यरत शिक्षकांना टप्पा अनुदान आदेश देण्यास विलंब होत असल्याने सभेत अनेक शिक्षकांनी रोष व्यक्त केला. वाढिव टप्पा अनुदान आदेश वितरीत करून वेतन अदा करा, अश्या सूचना आमदार अडबाले यांनी केल्या.

यावर शिक्षण उपसंचालक यांनी लवकरात लवकर आदेश वितरीत करू असे सांगितले. सभेत प्रलंबित मान्यता वर्धित व मंडळ मान्यता, प्रलंबित थकबाकी, वैद्यकीय देयके, अर्जित रजा रोखीकरण, वरिष्ठ / निवड श्रेणी, जीपीएफ परवाता / नापरतावा देयके, पेंशन केस, संचमान्यता, वैयक्तिक मान्यता, ग्रंथपाल थकबाकी, अनुकंपा प्रकरण, शिक्षक - कर्मचाऱ्यांचे समायोजन व अन्य अश्या तब्बल २०० च्यावर सामूहिक व वैयक्तिक समस्यांवर चर्चा करण्यात आली. प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना सभेत आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण उपसंचालक व सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), वेतन पथक अधीक्षक यांना दिल्या. तसेच माध्यमिक शिक्षण विभाग नागपूर येथील श्री. मेंढूलकर यांच्या आस्थापनेची चौकशी करण्याच्या सूचना आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण उपसंचालक डॉ. माधुरी सावरकर यांना दिल्या.

सभेला नागपूर विभागातील मोठ्या संख्येने शिक्षक, कर्मचारी यांची उपस्थिती होती. सभागृह पूर्ण भरगच्च भरून होते. ही सभा रात्री १० वाजून ५ मिनीटांनी संपली. गुरुवार ९ ऑक्टोबर रोजी कै. आबासाहेब खेडकर सभागृह, जिल्हा परिषद, नागपूर येथे सुरु असलेल्या प्राथमिक विभागाच्या बैठकीत नागपूर जिल्ह्यातील ६५ अंशतः अनुदानित शाळा / तुकड्यांना टप्पा अनुदान आदेश आमदार सुधाकर अडबाले यांच्या उपस्थितीत वितरीत करण्यात आले.

सभेला शिक्षण उपसंचालक डॉ. माधुरी सावरकर, शिक्षणाधिकारी, वेतन पथक अधीक्षक, माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, जयप्रकाश थोटे, प्रांतीय कोषाध्यक्ष भूषण तल्हार, विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, सुधाकर देशमुख, रवींद्र नैताम, सुनील शेरकी, विष्णू इटनकर, अनिल गोतमारे, सुरेंद्र अडबाले, ओमप्रकाश गुप्ता, अविनाश बडे,विठ्ठल जुनघरे, दिगांबर कुरेकार, जिल्हा कार्यवाह राजेश धुर्वे, अजय लोंढे, दीपक धोपटे, महेंद्र सालंकार, संजय बारकर, संदीप मांढरे, अरूण कराळे, विजय कोहळे, विजय गोमकर, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सपना तेलंगे व मोठ्या संख्येने नागपूर विभागातील विमाशि संघाचे पदाधिकारी, सदस्य, समस्याग्रस्त शिक्षक उपस्थित होते.

# महावितरण कंपनीतील कंत्राटी कामगारांना टुल किट वाटप



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ९ :

काटोल विभागातील कंत्राटी कामगारांना दि.०८ ऑक्टोबर २०२५ रोजी कार्यकारी अभियंता दिपक आघाव साहेब यांच्या हस्ते टुल किट वाटपाचा कार्यक्रम पार पडला.

यावेळी उपकार्यकारी अभियंता वर्षा जिवतोडे, उप व्यवस्थापक प्रशांत खरवडे, साहेब उप कार्यकारी अभियंता, संजय वाटवे तसेच जि ए डिजिटल सुपरवायझर सौरभ आवासरमोल, तांत्रिक कामगार युनियनचे राज्य सचिव प्रकाश निकम साहेब, सर्कल पदाधिकारी योगेश धांडे, झोन प्रसिद्धी प्रमुख शुभम गावंडे, तांत्रिक ॲप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशन राज्य कार्याध्यक्ष विक्की कावळे,जिल्हा अध्यक्ष मंगेश चिमोटे, जिल्हा उपाध्यक्ष आकाश गुप्ता,प्रसिद्धी प्रमुख नागपूर निलेश चक्रपाणी, काटोल विभाग अध्यक्ष पवन सौदागर, काटोल विभागातील कंत्राटी कामगार यांचा उपस्थित कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश निकम व आभारप्रदर्शन योगेश धांडे यांनी केले.

# निलडोह नगर पंचायतचे प्रभाग निहाय आरक्षण घोषीत

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ९ :

तालुक्यातील नगर पंचायत निलडोहचे प्रभाग निहाय आरक्षण नुकतेच जाहिर झाले असुन १७ पैकी ४अनुसूचित जाती, १ अनुसुचित जमाती व ५ नामाप्र करिता आरक्षित झाल्या आहे. ९ जागा महिलांकरिता आरक्षित आहे. अनुसूचित जाती करिता प्रभाग क्र. ४ ,६,९,१३ आरक्षित असुन ४ व ६ महिलासाठी आरक्षित आह. प्रभाग क्र.२ अनुसूचित जमातीच्या महिला करिता आरक्षित आहे. प्रभाग क्र. १, ३, ५, ८ व ११ नागरिकांच्या मागास प्रवगार्साठी आरक्षित झाले असुन त्या मध्ये प्रभाग क्र.३, ८ व ११ महिलांकरिता आरक्षित झाले आहे. उर्वरीत ७ प्रभाग खुल्या वगार्साठी असुन प्रभाग क्र. १०, १५ व १६ महिलासाठी आरक्षित आहे, तर प्रभाग क्र. ७, १२, १४ व १७ सर्वसाधारण आहे.

आरक्षण सोडतीची प्रक्रिया उपविभागीय अधिकारी सुरेश बगळे व मुख्याधिकारी योगीता डांगरे यांच्या उपस्थितीत निलडोह नगर पंचायतच्या सभागृहात पार पडली. या वेळी भाजपा, कांग्रेस, राकांपा, शिवसेना, वंचित आघाडी व बसपा आदी राजकीय पक्षाचे पदाधिकारी व गावकरी मोठ्या संख्यानी उपस्थित होते.

# सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. ९ :

श्री भिमादेवी नवयुवक सेवा मंडळाच्या वतीने नवरात्रोत्सवाच्या पर्वावर शालेय विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन भिवापूरकरांना मनोरंजनाची मेजवानीच दिली. बऱ्याच वर्षानंतर आयोजित या कार्यक्रमाला रसिकांनी चांगलीच दाद दिली. विजयादशमीच्या दिवशी या स्पर्धांमधील विजेत्यांचा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

यावेळी आयोजित समूह नृत्य स्पर्धेत 'अ' गटात एकूण सहा शाळांनी सहभाग घेतला होता. त्यात सार्यटिफिक कान्व्हेंट व इंग्लीश मिडीयम स्कूल भिवापूरने सर्वांग सुंदर असे नृत्य सादर करुन प्रथम क्रमांक पटकावला. एज्युकेशन सोसायटी गर्ल्स हायस्कूलने द्वितीय तर राष्ट्रीय विद्यालयने तृतीय क्रमांक मिळविला. बी. ई. एस. एच. कान्व्हेंट व कनिष्ठ महाविद्यालयाला प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. 'ब' गटात



दोन शाळांनी सहभाग नोंदविला. त्यात धमार्पूर प्राथमिक शाळेने प्रथम तर कशिदा रंभाड ग्रुपने द्वितीय क्रमांक पटकाविला.

एकल नृत्य स्पर्धेत 'अ' गटात सात स्पर्धक सहभागी झाले होते. लावण्या देशमुख प्रथम, स्वस्तिका शेंडे द्वितीय तर कशिदा रंभाड तृतीय आली. 'ब' गटात सहभागी पाच स्पर्धकांपैकी सोनू नागरिकरने प्रथम क्रमांक पटकावल तर हर्षदा भजभूजे व अंजली मोटघरे अनुक्रमे द्वितीय व तृतीय आले. बक्षीस वितरण कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ठाणेदार जयप्रकाश निर्मल, मंडळाचे अध्यक्ष गोविंद गुप्ता, शहर भाजपा अध्यक्ष अनिल समर्थ, राकेश पौनिकर, कृष्णकुमार गुप्ता, मधुकर देव्हारे, राजन गुप्ता, बाजार समितीचे संचालक राहुल गुप्ता, बंडू उरकुडकर, बंटी गुप्ता, मनोहर बोरकर,देविदास बडगे, माजी मुख्याध्यापक पंढरी हिवसे, नारायण गुप्ता, प्रकाश गुप्ता, लेखराम उरकुडकर आदी उपस्थित होते.

# डॉ. हरिभाऊ आदमने महाविद्यालयात वाणिज्य विभागाची कार्यशाळा



■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. ९ :

कै.डॉ.हरिभाऊ आदमने कला वाणिज्य महाविद्यालय सावनेर. येथे वाणिज्य विभागातर्फे सी.डी.एस.( आय.) एल. आणि बॉम्बे स्टॉक एक्चेंजं यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील एन.ई.पी. अभ्यासक्रमातील स्टार्टअप विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे प्रमुख वक्ते नागपूर येथिल डॉ.आंबेडकर महाविद्यालयाचे कायदा विभागाचे प्रा.सागर तवर उपस्थित होते. यावेळी विचारपीठावर वाणिज्य विभागप्रमुख प्रा.डॉ.प्रशांत पाटील उपस्थित होते.

यावेळी प्रा.सागर तवर यांनी एक्सप्लोरिंग द सेक्युरिटीस मार्केट ॲन्ड करियर अपारच्युनिटीज या विषया अंतर्गत विद्यार्थ्यांना जीवनात आर्थिक बचत तसेच शेअर मार्केटच्या माध्यमातून सुरक्षित गुंतवणुकीला प्रोत्साहीत करून त्यातून रोजगाराच्या दृष्टीने मिळणाऱ्या संधीचे अध्ययन आणि त्याची आवश्यकता विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. कार्यशाळेतील उपस्थित विद्यार्थ्यांच्या प्रश्नोतरांनी वक्त्यांच्या चर्चेत अधिकच भर घातली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वीरेंद्र जुमडे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शनातून सदरहू कार्यशाळेचे आयोजन केले गेले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण गुणासोबतच व्यावसायिक कौशल्य अभिमुखता अंगीकारने ही काळाची गरज असल्याचे कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्रा.डॉ. प्रशांत पाटील यांनी कार्यशाळेची रूपरेषा मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. प्रफुल जोहर यांनी केले. प्रा. बावणे सर यांनी उपस्थित मान्यवर वक्ते आणि विद्यार्थ्यांचे कार्यक्रम यशस्वीतेच्या योगदानाबद्दल आभार व्यक्त केले. या कार्यक्रमात वाणिज्य विद्याशाखेसोबतच कला शाखेचेही विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

महाविद्यालयातील वाणिज्य शाखेसोबतच कला शाखेचे प्रा. डॉ. मिलिंद साठे, प्रा.डॉ. अरविंद पुनवटकर, प्रा. डॉ. दिनेश किमटा,प्रा. डॉ. सचीन वैद्य, प्रा.डॉ.अर्चना पाटील, प्रा.डॉ. विकास सावंत, प्रा.डॉ. प्रगटसिंघ बावरा, प्रा.डॉ.प्रमोद लेंडे व शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते.

# उखळी येथे तोंडखुरी-पायखुरी लसीकरण शिबीर



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ९ :

पशुसंवर्धन विभाग हिंगणा तालुक्याच्या वतीने उखळी येथे तोंडखुरी- पायखुरी लसीकरणाच्या शिबिर आयोजित करण्यात आले.पशुपालकांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिरात हिंगणा तालुक्यातील सहा डॉक्टरांची चमू उपस्थित होती. संपूर्ण भारताला या आजारापासून मुक्त करण्याची मोहीम सुरू असल्याकारणाने दर सहा महिन्यांनी या आजाराचे लसीकरण केले जाते.सदर आजारापासून जर आपण पशुंना वाचवू शकलो तर गाव खेड्यातील शेतकरी बांधवांना आर्थिक भुर्दंड पडणार नाही.

निरोगी पशु असल्यास मानवाचे सुद्धा आरोग्य निरोगी राहू शकते, हा संदेश देत पशुसंवर्धन विभागाची चमू गावोगावी जाऊन लसीकरणाचे महत्त्व सांगून व लसीकरण करीत आहे. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. अश्विन कुमार मेश्राम, डॉ. राजेंद्र निखाते,डॉ. यामीनी बावणे, वैशाली कडू, सुरज गोखले, वर्षा चाकूनदे, उत्पल डांगोरे आदी पशुवैद्यकांनी परिश्रम घेतले.

# मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातून अमृत भारत एक्सप्रेसचा नवीन रेल्वे मार्गावर प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

भारतीय रेल्वेने 15294/15295 मुजफ्फरपूर-चारलापल्ली-मुजफ्फरपूर अशी क्रमांकित नवी साप्ताहिक अमृत भारत एक्सप्रेस गाडी सुरू करण्याची घोषणा केली आहे. या गाडीच्या नियमित सेवा 14 ऑक्टोबर 2025 पासून सुरू होतील. ही गाडी मुजफ्फरपूरहून 14 ऑक्टोबर 2025 (मंगळवार) रोजी आणि चारलापल्लीहून 16 ऑक्टोबर 2025 (गुरुवार) रोजी सुटणार आहे. ही नवीन सुपरफास्ट एक्सप्रेस गाडी नागपूर विभागातून धावणार असून, या विभागातील प्रवाशांना याचा थेट लाभ होणार आहे.

गाडी क्रमांक 15294 मुजफ्फरपूर-चारलापल्ली अमृत भारत एक्सप्रेस ही मुजफ्फरपूर स्टेशनवरून सकाळी 10.40 वाजता (14 ऑक्टोबर 2025, मंगळवार) सुटेल आणि चारलापल्ली स्टेशनवर 15 ऑक्टोबर 2025 (बुधवार) रोजी रात्री 23.50 वाजता पोहोचेल.

बल्लारशाह जं.- आगमनः 17.10 वाजता ` प्रस्थानः 17.15 वाजता (बुधवार). नागपूर- आगमनः 12.30 वाजता ` प्रस्थानः 12.35 वाजता (बुधवार) गाडी क्रमांक 15295 चारलापल्ली- मुजफ्फरपूर अमृत भारत एक्सप्रेस ही चारलापल्ली स्टेशनवरून 16 ऑक्टोबर 2025 (गुरुवार) रोजी पहाटे 04.05 वाजता सुटेल आणि मुजफ्फरपूर स्टेशनवर 17 ऑक्टोबर 2025 (शुक्रवार) रोजी सायंकाळी 17.00 वाजता पोहोचेल.

नागपूर आगमनः 13.25 वाजता ` प्रस्थानः 13.30 वाजता (गुरुवार). बल्लारशाह - आगमनः 10.15 वाजता ` प्रस्थानः 10.20 वाजता (गुरुवार) हाजीपुर, सोनपुर, पाटलिपुत्र, दानापुर, आरा, बक्सर, पं. दीनदयाळ उपाध्याय, प्रयागराज चौकी, सतना, जबलपुर, नरसिंहपुर, पिपरिया, इटारसी, नागपुर, बल्लारशाह, सिरपुर कागजनगर, बेल्लमपल्ली, रामागुंडम, पेद्दापल्ली आणि काजीपेट. ही नवीन अमृत भारत एक्सप्रेस गाडी बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या राज्यांना जोडणारी असून प्रवाशांना आरामदायी, वेगवान आणि सोयीस्कर प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देईल.

# देवकीबाई बंग विद्यालयात विद्यार्थ्यांनी कृतीतून साजरा केला लोकशाहीचा उत्सव

## विद्यालयातील विद्यार्थी परिषदेची निवडणुक व शपथ ग्रहण उत्साहात पार पडले



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ९ :

स्थानिक स्व. देवकीबाई बंग इंग्रजी माध्यम विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे नुकत्याच 2025 या शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थी परिषदेची निवडणुक लोकशाहीचा जागर करत उत्साहात पार पार पडल्या पार पडलेल्या. निवडणुकीत विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनीही सहभाग घेतला. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया उत्साहपूर्ण वातावरणात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. विद्यार्थ्यांनी प्रचारापासून मतदानापर्यंत जबाबदारीची जाणीव ठेवून सहभाग नोंदवला.

विद्यालयाचे प्राचार्य यांनी निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची भूमिका निभविल्याने विद्यार्थ्यांना लोकशाहीतील निवडणुकीत अपेक्षित असलेली पारदर्शकता आणि प्रामाणिकपनाचे धडे विद्यार्थ्यांना मिळाले. अगदी मतपेट्या व्यवस्थित सीलबंद करणे. शिक्षकांच्या उपस्थितीत मतमोजणी करून निवडणुकीचा निकाल जाहीर करेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ही विद्यार्थ्यांना जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतीय लोकशाहीतील निवडणुकांचे महत्व विद्यार्थ्यांनी जाणून घेतले.

निवडून आलेल्या विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांनी विद्यालयातील प्रत्येक उपक्रमात सहभागी होऊन प्रामाणिकपणा, संघभावना व निष्ठेने कार्य करण्याची शपथ घेतली. त्यात विद्यालयाचे कॅप्टन म्हणून दामिनी काकडे व धवल सोनटक्के, उप कॅप्टन म्हणून सोयम देशमुख व आरुषी राखुंडे, क्रीडा कॅप्टन म्हणून चैतन्य कुकडकर व यामिनी आदमाने, शाळा परिषद प्रमुख सिद्धी तिवसकर व सांस्कृतिक विभाग कॅप्टन म्हणून सेजल कुकडे यांचा समावेश आहे.

विद्यालयात अशा निवडणुकांमधून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना आणि लोकशाही मूल्यांची जपणूक होते, हीच खरी शिक्षणाची दिशा आहे. विचार व्यक्त करत संस्थेच्या उपाध्यक्षा अरुणा बंग, कोषाध्यक्ष महेश बंग, प्राचार्य नितीन तुपेकर यांनी सर्व विजयी उमेदवारांचे तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शाळेतील व शालेय जीवनानंतरच्या लोकशाही संवर्धनाकरिता शुभेच्छा दिल्या. तर या संपूर्ण विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकिची जबाबदारी ईशानी मित्रा, अतुल कटरे,दीपक कान्हेरकर, लक्ष्मी शेंबेकर,सोनम लारोकर, सुषमा भलावी, ऋतुजा भोंडगे आदी शिक्षकांनी परिश्रमाने पार पडली.

# रत्नाफिन कॅपिटलची नागपूर आणि उत्तर भारतातील मानेसर येथे नवीन शाखा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

रत्नाफिन कॅपिटल जी आरबीआय-नोंदणीकृत आणिक्रिसिल ए+मानांकित एनबीएफसी आहे. कंपनीने पश्चिम भारतात वसईआणि नागपूरयेथे दोन नवीन शाखा उघडून आपला विस्तार केला आहे. तसेच, उत्तर भारतात मानेसर येथे प्रवेश करून उत्तरेकडील बाजारपेठेत पाऊल टाकले आहे.

व्यापार, उत्पादन आणि सेवा क्षेत्रांचे महत्त्वपूर्ण समूह असलेल्यापश्चिम भारताचा प्रदेश हा एमएसएमईसाठी एक महत्त्वाचा



वाढीचा बाजार आहे. रत्नाफिनच्या वसई आणि नागपूर येथील नवीन शाखा या व्यावसायिक केंद्रांना थेट सेवा देतील आणि लहान व मध्यम उद्योगांच्या आर्थिक गरजांनुसार अनुरूप क्रेडिट सोल्युशन्स उपलब्ध करून देतील.

एमएसएमईना सक्षम करण्याच्या आपल्या ध्येयाचा भाग म्हणून, रत्नाफिनने आगामी वर्षात २० हून अधिक शाखांचीभर घालण्याची योजना आखली आहे. याद्वारे, संपूर्ण भारतात५०० हून अधिक ठिकाणीसेवांचा विस्तार करण्याचे लक्ष्य आहे.

या महत्त्वाच्या टप्प्याबद्दल बोलताना, रत्नाफिन कॅपिटलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मालव देसाई म्हणालेः "पश्चिम भारत हा नेहमीच उद्योजकीय ऊर्जेचं केंद्रबिंदू राहिला आहे, नागपूरचे उत्पादन क्षेत्र आणि वसईचे व्यापारी जाळे याचे उत्तम उदाहरण आहे.

या दोन्ही ठिकाणी शाखा सुरू करून आम्ही त्या प्रगतीचा भाग बनलो आहोत. त्याचवेळी, मानेसरमधील आमचा प्रवेशउत्तर भारतातील ऑटोमोटिव्ह आणि औद्योगिक केंद्रांसाठीमार्ग उघडतो. आणखी २० शाखा सुरू करून ५०० पेक्षा जास्त ठिकाणी पोहोचण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. व्यवसाय जिथे खऱ्या अर्थाने चालतात, तिथेएमएसएमईंना वित्तपुरवठा पोहोचवण्याच्या आमच्या वचनबद्धतेवर आम्ही ठाम आहोत.

# रोगनिदान शिबिराचा २०६ नागरिकांना लाभ

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ९ :

कन्हान शहर विकास मंच आणि सह्याद्री संस्था नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने खदान नंबर सहा येथे आयोजित भव्य मोफत आरोग्य रोगनिदान शिबाराचा २०६ नागरिकांनी लाभ घेतला.

बुधवार (दि.८) ऑक्टोबर रोजी कन्हान शहर विकास मंच आणि सह्याद्री संस्था नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने खदान नंबर सहा येथे शिव मंदिर जवळ भव्य मोफत आरोग्य रोगनिदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित मंच चे मार्गदर्शक भरत साबळे, नारायण गजभिए, टेकाडी ग्रामपंचायत सरपंच विनोद इवनाते, डॉ.आयुषी डंभारे, डॉ.माधुरी चेरेकर, डॉ.किर्ती, सह्याद्री संस्थेचे डी आर पी नितेश नागदेवे सह आदि



मान्यवरांचा हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपीता महात्मा गांधी, माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. शिबीरात ईंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालय नागपुर, माधवबाग हॉस्पीटल, एबीओ आई ईंस्टीट्यूट, लता मंगेशकर हॉस्पीटल येथील डॉक्टर आणि चंमुच्या सहकार्यानें एकुण २०६ नागरिकांच्या जनरल चेकअप, ईसीजी, एक्स-रे, बीपी, शुगर, दातांचे चेकअप, डोळे चेकअप, एच.आय.व्ही, एस.टी.आय आणि टी.बी चेकअप सह आदि विविध आरोग्याची तपासणी करण्यात आली. शिबीर कार्यक्रमात पारशिवनी ग्रामीण रुग्णालयाच्या कौन्सिलर सुवर्णा गिरी, टीबी डिपार्टमेंट रंजु घोडमारे, आरोग्य सहायक हंसराज, सामाजिक कार्यकर्ता राम दुलारे राम बदन जयस्वाल आदि नागरिक उपस्थित होते.

# गौतमबुद्ध विहार, मायानगर येथे वर्षावास समापन सोहळा संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

प्रभाग क्र. ७ इंदोरा मधील मायानगर येथील गौतमबुद्ध विहारात वर्षावास समापन व भिक्षूंना भोजनदानाचा कार्यक्रम संपन्न झाला. समारंभात भन्ते विरायानंद यांच्या उपस्थितीत सामूहिक बुद्धवंदना करण्यात आली. या प्रसंगी नागपूर शहर कॉंग्रेस कमिटीचे सचिव कुणाल निमगडे, अध्यक्ष निता भैसारे, सुचित्रा भोवते, नलिनी अंबादे, माधुरी मोटघरे, तसेच परिसरातील अनेक उपासक-उपासिका उपस्थित होते. कार्यक्रम संयोजनात आशा मोरे, लिला टेंभुर्णे, कविता बडगे, सरूआई नदेश्वर आदींचा सक्रिय सहभाग होता.शांत, सात्विक आणि सामाजिक ऐक्य वाढवणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# रोहित सुधीर पारवे यांचा कामगारांच्या आरोग्यासाठी पुढाकार

## उमरेड एमआयडीसी परिसरात सुसज्ज मल्टिस्पेशॅलिटी कामगार रूग्णालय उभारणीसाठी आरोग्यमंत्र्यांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी, उमरेड, दि. ९ :

भारतीय जनता युवा मोर्चाचे माजी कार्याध्यक्ष रोहीत सुधीर पारवे यांनी महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे नागपूर जिल्ह्यातील उमरेड एमआयडीसी परिसरात मल्टिस्पेशॅलिटी कामगार रुग्णालय उभारण्याची मागणी केली आहे.



उमरेड एमआयडीसी हे नागपूर जिल्ह्यातील सर्वात वेगाने विकसित होणारे औद्योगिक क्षेत्र आहे. सध्या या भागात शेकडो उद्योग कार्यरत असून हजारो कामगार आणि अधिकारी वर्ग येथे कार्यरत आहे. मात्र, या परिसरात आपातकालीन व गंभीर वैद्यकीय सेवांची सुविधा उपलब्ध नाही, अशी खंत रोहीत पारवे यांनी आपल्या निवेदनात व्यक्त केली आहे.

त्यामुळे एखाद्या अपघाताची व आरोग्य आपत्कालीन परिस्थितीची वेळ आली तर उद्योग क्षेत्रातील कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना नागपूर शहरात धाव घ्यावी लागते. त्यामुळे औद्योगिक उत्पादनावर परिणाम होतो आणि कामगारांच्या आरोग्यावर ताण येतो, असे रोहीत पारवे यांनी सांगितले आहे. रोहीत पारवे यांनी उमरेड एमआयडीसी परिसरात मल्टिस्पेशॅलिटी कामगार रुग्णालय उभारण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे केली आहे. या उपक्रमामुळे उमरेड व आसपासच्या औद्योगिक क्षेत्रातील सुमारे २०,००० ते २५,००० कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना थेट लाभ मिळेल, असे रोहीत पारवे यांनी नमूद केले आहे.

तसेच, या रुग्णालयाच्या उभारणीमुळे स्थानिक रोजगाराच्या संधी वाढतील, आरोग्यसेवा बळकट होईल आणि औद्योगिक उत्पादनक्षमता वाढेल, असा त्यांचा विश्वास आहे. औद्योगिक क्षेत्रातील कामगार व अधिकारी वर्गामध्ये रोहीत पारवे यांच्या या सामाजिक व आरोग्यविषयक पुढाकाराचे स्वागत करण्यात येत असून, हा निर्णय कामगार वर्गाच्या हिताचा आणि विकासाभिमुख दृष्टिकोन दाखवणारा आहे, अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

# श्री विश्वनाथ बाबा महाविद्यालयाचे जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत सुयश



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

येथील श्री विश्वनाथ बाबा ज्युनियर कॉलेजचे जिल्हा स्तरीय मैदानी स्पर्धेत १९ वर्षीय वयोगटातील विद्यार्थी आर्या कुरडकर २०० मीटर व ४०० मीटर मैदानी स्पर्धेत द्वितीय, सागर पारधी ८०० मीटर मैदानी स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त करून विभागीय स्तरावरील स्पर्धेकरिता निवड झालेली आहे. विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेत निवड झाल्याने संस्थेचे अध्यक्ष श्यामकुमार जयस्वाल, संस्थेचे सचिव राजेश जयस्वाल, प्राचार्य राजेश बिडवाईक, पर्यवेक्षक राजीव वाल्दे, क्रीडा शिक्षक विवेक चौधरी, प्रा. अशोक डोंगरकर, प्रा. सुधाकर लडके, प्रा. बलदेव राठोड, जयकिशोर जैस्वाल संदीप उपासे, इंदिरा मोहतकर, चव्हाण, विजया बोरकुटे, आखरे, खुशी गणवीर, किर्ती चौके, सतीश जैस्वाल, विजय जैस्वाल, उमेश दडमल, स्वप्नील जैस्वाल, अशोक जांभळे, दिलीप तळहांडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाडीत अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव तथा स्मारक समितीतर्फे पुतळा प्रांगणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त अनुयायांनी अभिवादन केले. सर्वप्रथम माजी जि.प.सदस्य दिनेश बन्सोड, माजी माजी नगरसेवक दिनेश कोचे, प्रमोद भवरे यांनी तथागत बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सम्राट अशोक यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले.

माजी ग्रा.पं. सदस्य कंठीराम तागडे यांनी पंचशील ध्वज फडकविला.दिलीप भोरगडे यांनी सामुदायिक बुद्ध वंदना घेतली.

यावेळी समितीचे पदाधिकारी प्रकाश गजभिये, राजेश जंगले, मनोज भांगे,भीमराव कांबळे, गौतम तिरपुडे, आशिष नंदागवळी, किशोर नागपूरकर, ईश्वर उके, प्रेम ठवरे, भीमराव शेंडे, प्रभाकर ठवरे, अशोक मेश्राम, देवा दिवे, पंडित भोरगडे, मनोज भागवतकर, जितेंद्र बागडे, देवा राऊत, गजानन बन्सोड, मनोज जगताप, नितीन वाघमोडे, प्रवीण तावडे, सचिन खोब्रागडे, अनिल वानखेडे, जितेंद्र पानतावणे, राजकुमार मेश्राम उपस्थित होते. संचालन समितीचे पदाधिकारी राजेश जंगले यांनी केले.

# कौटुंबिक हिंसाचार व लैंगिक छळ विषयावर कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. ९ :

पीपल्स वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय कळमेश्वर येथील समाजशास्त्र विभागाअंतर्गत विद्यार्थ्यांकरिता कौटुंबिक हिंसाचार व लैंगिक छळ याविषयावर कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालय करण्यात आले. या कार्यशाळेत ईंडियन प्राइड एनजीओच्या प्रमुख.डॉ मिनल गेडाम यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदशन केले. त्यांनी समाज आणि एनजीओ ची भूमिका यावर आपली भुमिका विशद केली. कार्यशाळेचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे यांनी भुषविले होते.





कळमेश्वर पोलीस स्टेशन येथील समुपदेशन केंद्राच्या प्रमुख गीता दळवी यांनी याप्रसंगीकौटुंबिक हिंसाचार आणि लैंगिक छळ यावर मार्गदर्शन केले, त्या म्हणाल्या की, आजच्या विकसित भारतात सुद्धा महिलांना कौटुंबिक हिंसाचाराचा सामना करावा लागतो, बाहेर पडत असताना सहानुभूतीच्या द्वारे पुरुष महिलांशी जवळीक साधतात यापासून महिलांनी दूर राहिले पाहिजे असे आवाहन त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ राजेंद्र कांबळे यांनी पाणी फाउंडेशन,हेल्पेज इंडिया या विषयी माहिती दिली. याप्रसंगी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन पाहुण्यांच्या हस्ते पार पडले.

एनएसएस स्थापना दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेचे पुरस्कार वितरण प्रमुख पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. कार्यशाळेचे संचालन प्राध्यापक मंजुषा कापसे यांनी तर प्रास्ताविक डॉक्टर मंजुषा ढोबळे यांनी केले तर आभार प्राध्यापक निधी गुप्ता यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता प्रा सुकन्या घाटोळे, प्रा.महेश देवघरे, प्रा.चेतन ठवरे, प्रा.राजेश घोडेस्वार यांनी परिश्रम घेतले.

# वडधामना वर्धमान सैनिकी शाळेचे यश

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

वडधामना येथील वर्धमान सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींनी जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत मुलींच्या भालाफेक या क्रीडाप्रकारात १७ वर्ष वयोगटात मयुरी मोरेकर व १९ वर्ष वयोगटात साधना पटोरकर यांनी सुवर्णपदक पटकाविले. तसेच उंचउडीच्या १७ वर्ष वयोगटात श्रावणी कांबळे हिने कास्यपदक मिळविले. याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा व्यास, संस्थाध्यक्ष प्रकाश सावळकर, क्रीडा शिक्षक महेश येलुरे, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

# कामठी नगरपरिषदेच्या निवडणुकीत तेजस संस्था माजी नगरसेवक एम.ए. जब्बार यांना नगराध्यक्षपदासाठी उभे करणार

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ९ :

नगरपरिषदेच्या निवडणुका जाहीर होताच, वर्तमानपत्रांनी निवडणुका जवळ येताच जनतेला आठवणाऱ्या व्यक्तींबद्दल बातम्या देण्यास सुरुवात केली. तेजस संस्थेच्या कामाकडे पाहता, त्यात मोफत आंतरधर्मीय सामूहिक विवाह, भुकेल्यांना मासिक अन्न वाटप, विद्यार्थ्यांना कपडे, पुस्तके, शालेय गणवेश, बूट आणि इतर साहित्य वाटप, दरवर्षी गरिबांना ब्लँकेट आणि कपडे वाटप यांचा समावेश आहे. गेल्या आठ वर्षांपासून संघर्ष म्हणून इतर अनेक कामे केली जात आहेत. कामठीमध्ये तरुणांसाठी प्रशिक्षण केंद्र, कामठीमधील १००



तरुण प्रत्येक भरती मोहिमेसह केंद्रात कार्यरत आहेत, खेळाचे मैदान, सरकारी शाळांचे बळकटीकरण आणि कामठीमध्ये वृद्धाश्रम स्थापन करणे. प्रत्येक विभागात स्वतःचे उमेदवार स्थापित करून एक नवीन इतिहास घडवण्याचे संस्थेचे उद्दिष्ट आहे.

शहराध्यक्ष पदासाठी संघटनेकडून माजी नगरसेवक आणि विदर्भ गोल्डन न्यूजपेपरचे संपादक एम.ए. जब्बार यांना उमेदवारी देण्यात येणार आहे. त्यांनी १९९२ ते १९९७ पर्यंत काम केले. ते शहर नगरसेवक होते. आणि त्यांना प्रशासकीय अनुभव आहे. १९८७ ते २०२५ पर्यंत शहरातील मूलभूत समस्यांकडे कोणीही लक्ष दिले नाही. त्यांच्या पाठिंब्यासाठी जनतेने आशीर्वाद द्यावेत असे आवाहन आम्ही करतो. ॲडव्होकेट मनोज सत्य नारायण शर्मा, ॲडव्होकेट आकाश सफेलकर, सुनील ठाकूर, बाबू बैस, अरुण कडबे, प्रदीप बासनिक, आनंद मेश्राम, शशिकांत रामटेके, मिजवान रहमान, नवाब भाई इलेक्ट्रिक वाले, अब्दुल कय्युम, सुधीर शंभरकर आदींनी केले.

# एकविरा मतिमंद मुलांचे बालगृह येथील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या डेकोरेटीव दिव्यांच्या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ९ :

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक द्वारा संचालित सेंटर फॉर आऊटरीच प्रोग्राम तर्फे विविध प्रशिक्षणे व सामाजिक कार्य करण्यात येते याच अंतर्गत दि. ८ ऑक्टोंबर २०२५ रोजी एकविरा मतिमंद मुलांचे बालगृह, काचुरवाही येथील विद्यार्थ्यांमार्फत दिवाळी निमित्य तयार करण्यात आलेल्या डेकोरेटीव दिव्यांचे प्रदर्शन परमपुज्य गोळवरकर गुरुजी शैक्षणिक परिसर, रामटेक येथे क.का. संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु, डॉ. अतुल वैद्य यांच्या प्रेरणेने लावण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन अधिष्ठाता, शिक्षणशास्त्र संकाय प्रो. ललिता जोशी व डॉ. अनिल कुमार, संचालक, सेंटर फॉर आऊटरीच प्रोग्राम यांनी केले. या प्रदर्शनात विविध प्रकारचे रंगबेरंगी आकर्षक दिवे ठेवण्यात आले होते. या प्रदर्शनाला अधिकारी, विभाग प्रमुख, अधिकारी तसेच विद्यापीठात कार्यरत सर्व कर्मचार्यांनी दिवे खरेदी करून तसेच सर्वांत जास्तप्रमाणात



विद्यार्थ्यांनी दिवे खरेदी करुन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या मदत झाली.

याप्रसंगी उपस्थित एकविरा मतिमंद मुलांचे बालगृह येथील विशेष शिक्षक यांनी हे प्रदर्शन यशस्वी करण्याकरिता विभागाचे व विभागातील कर्मचार्यांचे आभार व्यक्त केले व यापुढेही अशाप्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाद्वारे करावे जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल व त्यांना रोजगारही प्राप्त होईल असे प्रतिपादन केले. या प्रदर्शनाच्या यशस्वितेकरिता नलिनी इंगळे, मनिषा सहारे यांचे सहकार्य लाभले.

# वाडीत महात्मा गांधी जयंतीनिमित्त माल्यार्पण कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त वाडी शहरातील बायपास मार्गावरील महात्मा गांधी चौकात त्यांना अभिवादन करून कार्यक्रम साजरा करण्यात आला. समाजात सत्य, अहिंसा आणि समानतेचा संदेश पोहोचवणाऱ्या महात्मा गांधीजींच्या विचारांचा आजही प्रसार करण्याची गरज असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.



कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले. या प्रसंगी नागपूर तालुका ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश कोकाटे, जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे महासचिव दुर्योधन ढोणे, माजी सरपंच भीमराव लोखंडे, महासचिव अनिल पाटील, वाडी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शैलेश थोराणे, वाडी शहर महिला काँग्रेस कमिटी अध्यक्षा अरुणा पगाडे, गौतम तिरपुडे, तालुका उपाध्यक्ष अशोक गडलिंगे, महासचिव योगेश कुमकुमार, नीता मडावी, अरुण पगाडे, सेवक पाटील, बंडू आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात वक्त्यांनी गांधीजींच्या सत्याग्रह, स्वावलंबन आणि ग्रामस्वराज्य या संकल्पनांचा उल्लेख करत त्यांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. सामाजिक सलोखा, स्वच्छता आणि अहिंसेचा संदेश देणारे गांधीजी हे केवळ भारताचेच नव्हे, तर संपूर्ण जगाचे प्रेरणास्थान असल्याचे त्यांनी नमूद केले. शेवटी उपस्थित कार्यकर्त्यांनी वन्दे मातरम या घोषणांसह गांधीजींच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प केला.

# बालजगतमध्ये आकाश कंदील कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

दीनदयाल शोध संस्थान, बालजगत, लक्ष्मीनगर येथे शनिवार दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळात आकाश कंदील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यात ६ वर्ष ते १५ वर्षे वयोगटातील मुलांना सहभाग घेता येईल. इच्छुकांनी बालजगत कार्यालयात संपर्क साधावा. कार्यालयीन वेळ सकाळी ९:०० ते ११:३०, सं. ४:३० ते ६:३० आहे.

# "दक्षता जागरूकता" विषयावर कार्यशाळेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

०८ ऑक्टोबर २०२५ रोजी "मोहीम २०२५" अंतर्गत, "रेल्वे सेवक (शिस्त आणि अपील) नागपूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात "नियम, १९६८" या विषयावर एक महत्त्वाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. च्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता प्रमुख पाहुणे होते. बिलासपूरचे उपमुख्य कार्मिक अधिकारी ए. बी. एस. नेहरू हे प्रमुख वक्ते म्हणून





उपस्थित होते. प्रमुख वक्ते नेहरू यांनी त्यांच्या सविस्तर व्याख्यानात म्हटले की, "रेल्वे सेवक (शिस्त आणिभारतीय रेल्वे कर्मचाऱ्यांचे वर्तन, शिस्त आणि दंडात्मक प्रक्रिया नियंत्रित करण्यासाठी अपील) नियम, १९६८. हे अतिशय महत्त्वाचे आयोजन नियम आहेत. या नियमांचा उद्देश रेल्वे संघटनेत शिस्त राखणे आहे. न्यायाचा अधिकार राखणे, तसेच कर्मचानांना निष्पक्ष सुनावणी आणि बचावासाठी पूर्ण संधी प्रदान करणे.

त्यांनी सांगितले की या नियमांनुसार, किरकोळ आणि मोठ्या शिक्षेची तरतूद आहे, ज्याविरुद्ध कर्मचारी कारवाई करू शकतात. निर्धारित वेळेच्या आत अपील करा. ही व्यवस्था सुनिश्चित करते की शिस्तभंगाची कारवाई पारदर्शक, निष्पक्ष आणि कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे रक्षण करणारी असावी. वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी उदय कुमार भारती यांनी प्रमुख पाहुणे आणि प्रमुख वक्त्यांचे स्वागत केले. या कार्यशाळेच्या माध्यमातून रेल्वे कर्मचाऱ्यांना शिस्त आणि आवाहन शिकवले जाईल.

# सरन्यायाधीश गवई यांच्यावरील भ्याड हल्लाच्या निषेधार्थ

## युवक जागृती मंडळाचे एसडीपीओ व एसडीओ यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. ९ :

भारताचे सरन्यायाधीश भुषण गवई सर यांच्या वरील भ्याड हल्लाचा निषेधार्थ युवक जागृती मंडळ व समता सैनिक दलाच्या संयुक्त विद्यमाने समाजसेवी सुधाकर बागडे यांच्या नेतृत्वात एसडीओ संपत खलाटे व सहायक पोलिस अधीक्षक सागर खर्डे यांना रोज गुरुवारला निवेदन देऊन भारताचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांना निवेदन पाठवण्याची विनंती करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश यांना एका वकिलाने भ्याड हल्लाचा प्रयत्न केला या घटनेचा आंबेडकरी समाज जाहीर निषेध करतो. सरन्यायाधीश हे दलित समाजातुन येत असल्यामुळे हा हल्ला जाणून बुजून करण्यात आला आहे.

या समोर दलित समाजातील





कलेक्टर, डॉक्टर व क्लास वन अधिकाराच्यावर देखील असाच प्रकार भ्याड हल्लाची भिती निर्माण झाली आहे. त्या सर्वांना सुरक्षा पुरवावी व अशी घटना परत होणार नाही याची सरकार ने दखल घ्यावी व सरन्यायाधीश यांना पंतप्रधान व राष्ट्रपती यांना पुरविण्यात येत असलेली सुरक्षा पुरवावी असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी युवक जागृती मंडळाचे अध्यक्ष सुधाकर बागडे,समाजसेवी सेवकदास सोमकुंवर, समता सैनिक दलाचे अध्यक्ष विजय कापसे, भिमराव डंभारे, सिल्लोरी शाखा समता सैनिक दलाच्या अध्यक्षा रंजना गौरखेडे, अनुप गजभिये, शांताराम ढोके, अखिल भारतीय सफाई मजदुर संघके अध्यक्ष सचीन लिडर, विठ्ठलदास जनबंधु, रोहनी गौरकर, संगिता रामटेके, सरला बागडे रविंद्र गजभिये विक्की शेंडे यांच्यासह युवक जागृती मंडळ, समता सैनिक दल व आंबेडकरवादी उपस्थित होते.

# वंजारी महाविद्यालयात ऑरा फोरम इन्स्टॉलेशन कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

गोविंदराव वंजारी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाने २०२५-२०२६ शैक्षणिक वर्षासाठी बी.टेक. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑरा फोरम इन्स्टॉलेशन कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, जबाबदारी आणि सक्रिय सहभागाची भावना निर्माण करणे होते. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि इतर उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांनी त्यांचा सक्रिय सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे आयोजन अमर सेवा मंडळाचे सचिव आणि आमदार ॲड. अभिजित वंजारी, तसेच कोषाध्यक्षा डॉ. स्मिता वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. महाविद्यालयातील मान्यवरांचे आणि नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

# सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर अरगुलेवार यांचा आमदार अभिजित वंजारी यांच्याकडून सन्मान

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ९ :

तेजस बहुउद्देशीय संघटनेचे अध्यक्ष म्हणून जनतेची सेवा करणारे चंद्रशेखर अरगुलेवार यांना नागपूर येथील सुरेश भट सभागृहात झालेल्या एका प्रतिष्ठित समारंभात 'गौरव सन्मान' प्रदान करण्यात आला. गोविंदराव वंजारी फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा हा प्रतिष्ठित पुरस्कार त्यांना आमदार अभिजित वंजारी, प्रसिद्ध प्रमुख वक्ते प्रा. युजवेंद्र महाजन आणि लोकप्रिय अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी प्रदान केला. केंद्रीय पोलिस दलातील हवालदार पदाचा राजीनामा देऊन समाजसेवेचा मार्ग निवडणाऱ्या अरगुलेवार यांना २०१७ पासून अनेक पुरस्कारांनी सन्मानित



करण्यात आले आहे. त्यांचे कार्यक्षेत्र बहुआयामी आहे.

ज्यामध्ये तरुणांना रोजगार, मोफत सामूहिक विवाह, गरजूंना मासिक अन्न आणि किराणा मालाचे वाटप, वैद्यकीय मदत, मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप आणि रक्तदान यासारखी महत्त्वाची कामे यांचा समावेश आहे. मृत्यूनंतर, पती-पत्नीने त्यांचे संपूर्ण शरीर नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाला दान केले आणि त्याहूनही मोठे काम म्हणजे संत गाडगेबाबा ग्रंथालयाला स्वतःचे घर दान करणे. असे म्हटले जाते की देशात अरगुलेवार सारखा समाजसेवक नाही.

# आपले निरुपयोगी साहित्य मनपाच्या केंद्रात जमा करा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

दिवाळीपूर्वी घरोघरी होणाऱ्या स्वच्छतेनंतर निघणारा अनुपयोगी वस्तूंचा कचऱ्याचा निपटारा करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियान येत्या १२ ऑक्टोबरपासून राबविण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर शहर स्वच्छ राखण्यासाठी या अभिनव उपक्रमाअंतर्गत शहरातील १०२ ठिकाणी दिवाळीतील अनुपयोगी वस्तू संकलन केंद्रांमध्ये संकलनाची व्यवस्था केली जाणार आहे.

दिवाळीनिमित्त घरोघरी स्वच्छता केली जाते. आपले शहर हे देखील आपले घरच आहे. स्वच्छते दरम्यान घरातून निघणाऱ्या वस्तूंचे संकलन करून त्याचा पुनर्वापर करण्याचा महत्त्वाचा निर्णय नागपूर महानगरपालिकेने स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियानांतर्गत घेतला आहे. घरातून निघणाऱ्या वापरात नसणाऱ्या वस्तूंचा स्वीकार करण्यासाठी मनपाने दहाही झोन कार्यालय, झोन निहाय १०२ कचरा






संकलन/स्वीकार केंद्रे उभारण्याचा निर्णय घेतला असून, नागरिकांसाठी येत्या १२ ते १८ ऑक्टोबर दरम्यान ही विशेष सोय करण्यात आली आहे. या कालावधीत नागरिकांनी आपल्या जवळच्या केंद्रावर वर्गीकृत स्वरूपातील कचरा आणून द्यावा व आपल्या शहराला स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक साकारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले.

यासंदर्भात अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन अभियानाचा आढावा घेतला आहे. यावेळी उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

**मोठ्या वस्तूंसाठी घरपोच वाहन व्यवस्था**

दिवाळीच्या स्वच्छते मध्ये निघणाऱ्या निरुपयोगी वस्तू उदा. अलमारी, पलंग, फर्निचर, सोफा सेट आदी तत्सम वस्तूसाठी केंद्रावर आणण्यासाठी नागरिकांच्या मागणीनुसार मनपाद्वारे विशेष वाहन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी अभियानाबद्दल वसुमना पंत यांनी सांगितले की, केंद्र शासनाच्या 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' या मोहिमे अंतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारे १२ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. अभियानांतर्गत येत्या १२ ऑक्टोबरपासून शहरातील १० झोनमध्ये कार्यालय आणि आरआरआर केंद्र या ठिकाणी दिवाळीतील निरुपयोगी वस्तू दान केंद्र सुरू होणार आहेत. तसेच १४ ऑक्टोबरपासून मनपाच्या हजेरीचे ठिकाण, विविध शाळा व समाज भवन येथे सुरू होणार आहे. तर १६ ऑक्टोबरपासून शहरातील ४० निवडक ठिकाणी केंद्र सुरू करण्यात येतील. तरी नागरिकांनी आपल्या घरातील पुनर्वापरण्याने येणाऱ्या किंवा निरुपयोगी वस्तू/साहित्य जसे कपडे, लाकडी वा प्लास्टिकच्या वस्तू, घरातील भांडी, खुर्च्या, खेळणी, कपाट, चपला /जोडे, पुस्तकांची रद्दी, या संकलन केंद्रांमध्ये जमा करून गरजूवंताना लाभ देण्यास सहकार्य करावे, असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

नागरिकांनी कपडे, वर्तमानपत्रांची रद्दी, पुस्तके, प्लास्टिकच्या वस्तू किंवा मुलांची खेळणी व इतर वस्तूंच्या संकलनासाठी कचरा दान केंद्रांमध्ये चार रंगाच्या कुंड्यांमध्ये अनुपयोगी वस्तू संकलित केला जाणार आहे. यात लाल, पिवळ्या, हिरव्या व निळ्या रंगाच्या कुंड्या राहणार आहे.

लोकांमध्ये स्वच्छतेबद्दल अधिक जनजागृती व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम गेल्या काही वर्षांपासून यशस्वीपणे राबविला जात आहे. पर्यावरणपूरक दिवाळी सण साजरा करण्यासाठी नागपूरकरांनी या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

## कामांवर विनाविलंब रूजू व्हा

**महावितरणकडून वीज कर्मचाऱ्यांना आवाहन**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीच्या सर्व मागण्यांशी सुसंगत भूमिका महावितरणच्या व्यवस्थापनाने यापूर्वीच बैठकीमध्ये स्पष्ट केली आहे. तरीही सात वीज कर्मचारी संघटनांनी दि. ९ ऑक्टोबरपासून ७२ तासांच्या संपाला सुरवात केली आहे. वीज ही अत्यावश्यक सेवा आहे व नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम म्हणजेच मेस्मा लागू करण्यात आला आहे. त्यानुसार हा संप बेकायदेशीर असल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. राज्याच्या ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक घेतली आहे. तीत खाजगीकरण व पुनर्रचनेसह संयुक्त कृती समितीच्या इतर सर्व मुद्द्यांशी सुसंगत व सकारात्मक भूमिका व्यवस्थापनाने स्पष्ट केली आहे. त्याचे लेखी इतिवृत्त संयुक्त कृती समितीला देण्यात आले आहे. हा संप टाळण्यासाठी संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबत व्यवस्थापनाने वेळोवेळी प्रत्यक्ष चर्चा केली आहे. मात्र सर्वच मागण्यांशी पुरक असलेली स्पष्ट भूमिका जाहीर करूनही संयुक्त कृती समितीने संपावर जाण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. सध्या महाराष्ट्र अतिवृष्टी व पूर परिस्थितीच्या संकटातून सावरत आहे. त्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत आहेत. या पार्श्वभूमिवर संपामध्ये सहभागी झालेल्या सर्वांनी शासकीय कर्तव्य बजावण्यासाठी आपापल्या कार्यालयांमध्ये विनाविलंब रूजू व्हावे.

# प्रथम कठीण चिवरदान व उपसंपदा समारोह

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. ९ :

देशातील पहिले महासी विपश्यना ध्यान केंद्राच्या वतीने प्रथमच कठीण चिवरदान व उपसंपदा समारोह २०२५ चे आयोजन ११ ऑक्टोबर २०२५ रोजी बँक्वेट हॉल ऐम्पीरियन ग्रँड फेस-१ कोतेवाडा येथे करण्यात आले आहे. भव्य दिव्य या कार्यक्रमात देश विदेशातील भिखू मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहेत. या समारोहाची जय्यत तयारी करण्यात येत आहे,अशी माहिती (ता.९) परिषदेत भंतेजी कंम्माट् ठाण आचार्य सय्याडो वण्णास्वामी यांनी दिली.

समारोहाची माहिती देताना त्यांनी पुढे सांगितले की, भगवान गौतम बुद्धांनी सांगितलेल्या नियमानुसार भिखू संघाचे कार्य सुरू आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ मध्ये नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर हजारो बांधवांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. यानंतरच खऱ्या अर्थाने या धमाची वाटचाल सुरू झाली. त्यांच्या विचारानुसार व प्रेरणा घेऊन सर्व कार्य सुरू आहे.



कोतेवाडा येथे प्रथमच अश्विन पौर्णिमा ते कार्तिक पौर्णिमा या एक महिन्याच्या दरम्यान प्रथम कठीण चिवरदान व उपसंपदा समारोहाचे आयोजन करण्यात येते.

या समारोहात विदेशातून, म्यानमार ११, व्हिएतनाम येथून ३ व भारतातून १५ भंतेजी येणार आहेत. समारोहात ६०० ते ७०० उपासक व उपासिका उपस्थित राहणार आहेत.

समारोहाच्या अध्यक्षस्थानी आचार्य वोन्नास्वामी महाथेरो तर प्रमुख अतिथी म्हणून अत्यदस्सी महाथेरो ( अरुणाचल प्रदेश) , प्रमुख मार्गदर्शक डॉ.उत्तमसारा भंतेजी, विशिष्ट प्रवक्ता नंदसारा भंतेजी, डॉ.लेडिन्हे सोनं भंतेजी उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे प्रायोजक मिलिंद पाटील व परिवार आहे. समारोहाला उपासक व उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी सरते शेवटी केले. यावेळी महाथेरो मणीजोत,श्रामणेर त्राणतिक्ख, श्रामणेर ध्यानश्री, श्रामनेर अनिच्चा, महानंदा पाटील, अरविंद बाळके, डॉ.सोनाली बारमाटे, श्रुती सालवणकर उपस्थित होते.

# २.७१ लाखांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

कार्यक्रमात सामील होण्यासाठी बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत रोकड व दागिन्यांसह एकूण २ लाख ७१ हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना लकडगंज पोलिस ठाण्यांतर्गत वर्धमाननगरात घडली. या प्रकरणी पोलिसांनी गुलशन दिगंबर काळे (२७) रा. वैष्णोदेवी चौक, वर्धमाननगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गत रविवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास गुलशन घराला कुलूप लावून कुटुंबासह यवतमाळच्या वणी येथे राहणाऱ्या नातेवाईकाकडे कार्यक्रमासाठी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटात ठेवलेली १ लाख ७ हजारांची रोकड व सोन्याचे दागिने असा एकूण २,७१,५०० रुपये किंमतीचा माल चोरून नेला. सायंकाळी २२.३० वाजताच्या सुमारास काळे कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घरच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता रात्री ९.४५ वाजताच्या सुमारास ३ ते ४ आरोपी घरात शिरून चोरी करताना दिसले.

# मनपाची 'स्वच्छ मोहल्ला स्पर्धा'

## मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

स्वच्छ, सुंदर, व हरित नागपूर साकारताना शहरातील रहिवासी परिसरांना स्वच्छ भारत अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेने अधिक स्वच्छ आणि आरोग्यपूर्ण बनवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मनपातर्फे "स्वच्छ मोहल्ला स्पर्धा" आयोजित करण्यात आली असून, विजेत्या मोहल्ल्यांना विकासकामांसाठी तब्बल १ कोटी ६३ लाखांचा बक्षीस निधी दिला जाणार आहे. स्पर्धेसाठी गुरूवारपासून (ता.९) आवेदन करण्यासाठी नोंदणी सुरू करण्यात आली

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात स्वच्छ मोहल्ला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पात्र मोहल्लांनी स्पर्धेत मोठ्या संख्येत सहभागी होत स्पर्धा यशस्वी करावी असे आवाहन वसुमना पंत यांनी केले आहे.

**विजेत्यांना मिळणार तब्बल १ कोटी ६३ लाखांचा विकास निधी**

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मोहल्ल्याची पात्रता निश्चित करण्यात आली आहे. यात ज्या मोहल्ल्यांमध्ये २०० ते ५०० घरे आहेत, ते या स्पर्धेसाठी अर्ज करू शकतात. मोहल्ल्यातील स्वच्छतेचे मोजमाप करताना केवळ कचरा व्यवस्थापनच नाही, तर सामाजिक सहभाग आणि नागरिक कर्तव्ये यावरही भर दिला जाईल. घराघरांतून ओला, सुखा आणि धोकादायक कचरा १०० टक्के वेगळा करणे. तसेच ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करणे, सिंगल-यूज प्लास्टिकवर पूर्णपणे बंदी आणि आरआरआर तत्त्वाचा प्रभावी वापर. मोहल्ल्यातील बाग, सार्वजनिक स्थळे, पार्किंग, स्वच्छता व योग्य देखभाल करणे, रस्त्यावरच्या विक्रेत्यांना व दुकानदारांना कचरापेट्या उपलब्ध करणे, 'ब्लॅक स्पॉट्स' (कचरा टाकण्याची ठिकाणे) हटविणे व त्यावर देखरेख ठेवणे, तसेच 'रेड स्पॉट' (थुंकी) नियंत्रण व निर्मूलन करणे, नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये स्वच्छता जनजागृती करणे आणि कचरा व्यवस्थापनातील नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणे, बांधकामावरील ढिगाऱ्याचे व्यवस्थापन आणि रस्त्यांची स्वच्छता, या मोहल्ल्याचे मूल्यांकन विविध निकषांवर आधारावर केले जाणार आहे.

नागपूर महानगरपालिकेने या स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसे ठेवली असून, विजेत्या मोहल्ल्यांना ही रक्कम केवळ पारितोषिक म्हणून न देता, विकास निधी म्हणून दिली जाणार आहे. यात प्रथम बक्षीस तीन मोहल्ले प्रत्येकी २५ लाख असे एकूण ७५ लाख रुपयांचे, द्वितीय बक्षीस पाच मोहल्ल्यांना १० लाख प्रमाणे एकूण ५० लाख रुपयांचे तृतीय बक्षीस सात मोहल्ल्यांना प्रत्येकी ५ लाख प्रमाणे एकूण ३५ लाख असे १५ मोहल्ल्याकरिता एकूण १ कोटी ६० लाख रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. तरी नागरिकांनी मोठ्या संख्येत सहभाग घ्यावा असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त नाविन्यपूर्ण उपक्रम व जलद गतीने काम करणाऱ्या तीन मोहल्यांना प्रत्येकी १ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे.

# महासम्राट बळीराजा रथयात्रेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

महासम्राट बळीराजा राष्ट्र सेवा संघ द्वारा दि. ११ ऑक्टोबर पासून १४ ऑक्टोबर पर्यंत महासम्राट बळीराजा रथयात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. तीर्थक्षेत्र गुरुकुंज मोझरी (ता. तिवसा) ते शिवतीर्थ उमरी, तह. सावनेर अशी ही रथयात्रा अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर या चार जिल्ह्यातून मार्गक्रमण करेल.

वं. तुकडोजी महाराजांना पुण्यतिथी दिनानिमित्त अभिवादन करून यात्रेचा शुभारंभ राष्ट्रीय प्रबोधनकार सत्यपाल महाराज, खासदार बळवंतजी वानखेडे, आ. संजय खोडके, माजी आ. यशोमतीताई ठाकूर, आमदार बच्चूजी कडू, आ. सुलभाताई खोडके, आमदार राजेश वानखेडे, रविंद्र शिंदे प्रेमकुमार बोके यांचे शुभहस्ते होईल.

बळीराजाच्या कायार्चा प्रचार प्रसार व्हावा व राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागृत व्हावी या हेतूने विविध संघटनांच्या सहकार्याने




रथयात्रेचे आयोजन केले आहे.

रथयात्रेमध्ये महासम्राट बळीराजाच्या मूतीर्चा रथ, जिजाऊ शिवबा मूतीर्चा रथ, झांकी, ढोल ताशा, पथनाट्य, गाण्यांचा कार्यक्रम हे यात्रेचे विशेष आकर्षण असेल. अशी माहिती पत्रकार परिषदेत प्रा. अभिविलास नखाते यांनी दिली.

रथयात्रेसाठी अभिविलास नखाते सेवकराम राऊत, योगराज धानोरकर, उपस्थित होते. रथयात्रेसाठी दिनेश इंगोले, नरेंद्र गद्रे, पांडुरंग भोंगाडे, प्रमोद वैद्य, उमेश कोराम, भगवान चांदिकर, सुजित मेश्राम, सचिन पराये, जितेंद्र पर्वते, प्रशांत येनगंदेवार, अथक परिश्रम घेत आहेत.

# विशेष कार्यकारी अधिकारीपदी अभिजीत मुजूमदार नियुक्त

■ महासागर प्रतिनिधी,
वानाडोंगरी, दि. ९ :

डिगडोह नगर परिषद परिसरातील राय टाऊन न.१ गाळे धारक मेंटनेंस सोसायटीचे संचालक अभिजीत उमेशचंद्र मुजूमदार यांची कार्य कुशलता व उल्लेखनीय समाज कार्य लक्षात घेता शासनाने विशेष नगरपरिषद डिगडोह येथे कार्यकारी अधिकारी पदी नुकतीच निवड केली.



मुजूमदार यांनी आपल्या निवडीचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे, आमदार समीर मेघे यांना दिले असुन मुजूमदार यांना निवडी बद्दल माजी उपसरपंच तथा भाजपा डिगडोह शहर अध्यक्ष कैलाश गिरी, राय टाऊन न.१ गाळे धारक मेंटनेंस सोसायटीचे अध्यक्ष अनिल शर्मा, मांजी जि. प. सदस्य अर्चनाताई गिरी, माजी जि. प. सदस्य अंबादास उके, माजी प. स. उपसभापती सुरेश काळबांडे, भाजपा जिल्हा मंत्री विनोद ठाकर,भाजपा अजामो डिगडोह मंडळ अध्यक्ष लिलाधर दाभे, सार्वजनिक पुजा मंडळ हिंगणा, एमआयडिसीचे सर्व पदाधिकारी आणि राय टाऊन गाळे धारक मेंटनेंस सोसायटीचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले.

# नागपूरकर भोसल्यांच्या इतिहासावरील सहा पुस्तकांचा भव्य प्रकाशन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

महाराजा ऑफ नागपूर ट्रस्ट व लाखे प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूरकर भोसल्यांच्या ऐतिहासिक कामगिरी व सांस्कृतिक वारशावर आधारित सहा पुस्तकांचा भव्य प्रकाशन सोहळा महालातील सिनियर भोसला पॅलेस येथे शुक्रवार, दि.10 ऑक्टोबर 2025 रोजी सायं. 6:30 वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या सोहोळ्यात उदय जोशी लिखित चार ऐतिहासिक कादंबऱ्या आदिपर्व, संघर्षपर्व, कलहपर्व, ऱ्हासपर्व तसेच डॉ.भालचंद्र हरदास लिखित महालची भ्रमंती व धर्मभूषण श्रीमंत राजे लक्ष्मणराव महाराज भोसले या दोन ग्रंथांचे प्रकाशन होणार आहे.

पुस्तकांचे प्रकाशन डॉ.मोहनजी भागवत, सरसंघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या शुभहस्ते होणार असून, प्रमुख उपस्थिती परमपूज्यनीय आचार्य जितेंद्रनाथ स्वामी महाराज, श्रीनाथ पीठाधीश्वर, अंजनीग्राम-सुर्जी यांची लाभणार आहे.

अशी माहिती पत्रकार परिषदेत बोलताना महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्रीमंत डॉ.राजे मुधोजी महाराज भोसले व प्रकाशक चंद्रकांत लाखे यांनी नागरिकांना व साहित्य प्रेमींना सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. त्यावेळी भालचंद्र हरदास, लेखक उदय जोशी आदि उपस्थित होते.

# सुमीत नागदवने झाले

## महाराष्ट्र शास्त्रांग मार्शल आर्टचे अधिकृत रेफरी




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

औरंगाबाद येथील संभाजीनगरमध्ये नुकताच वसंतराव नाईक महाविद्यालयात महाराष्ट्र शास्त्रांग मार्शल आर्टचा राज्यस्तरीय रेफरी सेमिनार पार पडला. या सेमिनारमध्ये नागपूरचे प्रख्यात कराटे प्रशिक्षक सुमीत नागदवने यांची महाराष्ट्र राज्याचे अधिकृत शास्त्रांग मार्शल आर्ट रेफरी म्हणून निवड करण्यात आली आहे.

सुमीत नागदवने हे सेंट क्लारेट स्कूल, नागपूर येथे मागील २० वर्षांपासून क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत असून, नागपूर शहरात मार्शल आर्टचे प्रशिक्षण देत आहेत. त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना आत्मरक्षणाचे धडे दिले असून, विविध स्पर्धांमध्ये मार्गदर्शन केले आहे.

या सेमिनारला महाराष्ट्र शास्त्रांग मार्शल आर्ट संघटनेचे सचिव मिलिंद काटमोरे, राष्ट्रीय कोच व रेफरी गर्व खोसला, अध्यक्ष ॲड सोपान शेजवल, तसेच मुख्य अतिथी म्हणून जिल्हा क्रीडाधिकारी बाजीराव देसाई आणि क्रीडाधिकारी मुकुंद वाडेकर उपस्थित होते. सुमीत नागदवने यांच्या या नियुक्तीबद्दल सीमा नागदवने, सेन्साई किरण यादव, सेन्साई विनोद डहारे, सेन्साई जावेद शेख, राहुल बारमाटे, अपेक्षा नागदवने, राहुल यादव, क्योशी हरीश चौबे, रेन्शी प्रमोद जांभुलकर, रेन्शी देवानंद पानतावणे,तौफिक शेख आदींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मेहंदीबाग रेल्वे अंडर पास ब्रीजच्या आत बाराही महिने सांडपाणी

■ प्रदीप पौनिकर,
नागपूर दि.९

प्रभाग क्र.५ च्या अंतर्गत मेहंदीबाग रेल्वे अंडर पास ब्रिजच्या आतमध्ये बाराही महिने सांडपाणी साचलेले असणे ही एक गंभीर समस्या आहे. या समस्येचे त्वरित निराकरण होणे आवश्यक आहे जेणेकरून नागरिकांना होणारा त्रास कमी होईल आणि आरोग्याच्या समस्या टाळता येतील. अंडर पास ब्रिजच्या आतमध्ये सांडपाणी साचल्यामुळे दुर्गंधी आणि अस्वच्छता निर्माण होते. सांडपाण्यामुळे मलेरिया, डेंग्यू सारखे आजार पसरण्याची शक्यता आहे. सांडपाणी साचल्यामुळे वाहतूक सुरळीत होत नाही आणि नागरिकांना अडचणी येतात.

**समस्येचे निराकरण न झाल्यास आम आदमी पक्षाचा आंदोलनाचा इशारा**



अंडर पास ब्रिजच्या आतमध्ये निचरा व्यवस्थेची त्वरित सुधारणा करावी जेणेकरून सांडपाणी साचणार नाही. अंडर पास ब्रिजची नियमित स्वच्छता केली पाहिजे आणि सांडपाणी योग्य मार्गाने नेण्याची व्यवस्था करावी.प्रशासनाने या समस्येचे त्वरित निराकरण करण्यासाठी कारवाई करावी अन्यथा आम आदमी पक्षाचा वतीने मनपा प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. यावेळी प्रदिप पौनिकर, किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल,संदीप साखरे, किशोर मौंदेकर, केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, दिलीप रामटेककर, राजू दुधे, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते, कृष्णा पाठराबे, प्रिती पौनिकर, स्वाती तारवानी, अंशु बिरेवार, अमोल उके, संजू पटले, राजकुमार किटाळीकर, जयघोष कोटांगले, गोविंदा केळवदकर, चेतन निखारे, अरुण गुणारकर, बाबुराव निमजे व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**महासागर**
**प्रभाग वार्ता**

# बेझनबागमध्ये पाण्याची पाइपलाइन फुटली; वाहतुकीस अडथळा

■ प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि. ९

प्रभाग क्रमांक ७ अंतर्गत येणाऱ्या इंदोरा परिसरातील कडबी चौकाजवळ, मेट्रो स्टेशनच्या जवळील बेझनबाग येथे पाण्याची मुख्य पाइपलाइन फुटल्याने संपूर्ण परिसरात पाणी साचले असून, रस्त्यावर मोठा खड्डा तयार झाल्यामुळे नागरिकांना व वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

पाइपलाइन फुटल्यानंतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून, वाहतुकीस गंभीर अडथळा निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, प्रशासनाने वेळेवर लक्ष न दिल्यास हा खड्डा अधिक खोल होऊन अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो.या समस्येवर तातडीने कारवाई करण्याची मागणी जयकुमार रामटेके, राजेश राऊत, शैलेंद्र मेश्राम, शैलेश बेहेरे, रविंद्र वालदे, हेमराज जांभूळकर, हरीश सहारे आणि निलेश जनबंधू यांनी केली आहे. त्यांनी नागपूर महानगरपालिकेचे लक्ष वेधून तत्काळ दुरुस्तीचे काम हाती घेण्याची मागणी केली आहे.स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी तत्काळ पाहणी करून योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.



**तातडीने कारवाई होण्याची नागरिकांची मागणी**